




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ६ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०








## ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट, परवानेही रद्द!

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यात शाळेबाहेर सकस आहाराचे आदेश दिले आहेत, त्याचे पालन सुरू आहे. फूड सेफ्टी आयुक्तांना लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही काळासाठी किंवा वेळेसाठी बंदी घालण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त



तुकाराम मुंढे यांनी दिले. ॲनालाग पनीर म्हणून नॉन डेरी पनीर विकल जाते. त्याचे विपरीत परिणाम लक्षात घेउन राज्यात ३० जुलै रोजी नोटीफिकेशन काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक वाहतूक आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली असून, ५५ कोटींचे ॲनालाग पनीर नष्ट केल्याचे मुंढे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ॲनालाग पनीरवर एका वर्षासाठी बंदी आहे, पुढे लागली तर ही बंदी वाढविली जाईल, असेही मुंढेंनी स्पष्ट केले. विभागाकडे अनेक तक्रारी होत्या, त्यावर चर्चादेखील सविस्तर झाली. विधिमंडळ सभागृहातही चर्चा झाली. त्यानंतर मार्केटमधून पनीरचे ३०८ नमुने घेतले होते. त्यामध्ये ८९ सबस्टँडर, ३८ असुरक्षित आढळले. ३२ टक्के नमुन्यांमध्ये सुरक्षितता नसल्याचे समोर आले, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली. पनीर हा दुधाचा पदार्थ आहे. पण ॲनालाग पनीरमध्ये नाना दुग्धजन्य पदार्थ आढळले. अशा स्थितीत लोकांची दिशाभूल होते म्हणून असे आदेश दिले आहेत. छुप्या पद्धतीने हे ॲनालाग विकले जाउ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे सगळे आदेश उत्पादक प्रक्रिया करणारे, वाहतूकदार, वितरक, विक्रेते यांच्यावर बंधनकारक आहेत. त्यामुळे हाटेलही ॲनालाग वापरू शकत नाहीत. या ॲनालाग पनीरमध्ये प्रोटीनपेक्षा वनस्पती चरबी आढळली आहे, स्निग्धांश जास्त आहेत, म्हणून हे आदेश काढण्यात आले आहेत. अनालाग पनीरसाठी कोणतेही स्टँडर्ड नाही, अशी माहिती मुंढे यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

**दंडात्मक कारवाई होणार-**आम्ही ३०८ ठिकाणांवरून पनीरचे नमुने घेतले होते, त्यातील ३५ टक्के नमुने घातक होते. आता आगामी काळात विशेष मोहीम राबवणार आहोत, जिथे गोदामे आहेत, तिथे तपासणी होणार आहे. आता आगामी काळात आस्थापनांनी दुधाच्याच पनीरचा वापर करावा, कुणी बनावट पनीर विकताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करणार आहोत.

**आरोग्याशी तडजोड नाही -**ॲनालाग आणि पनीरबाबत विशेष तपासणी मोहीम राबवणार असून संशयित उत्पादनांचे नमुने घेउन पुढील कारवाई होईल. याबाबत सगळ्या अधिका-यांना कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्राहकांना ओरिजनल पनीर मिळावे, यासाठी प्रयत्न असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होणार नाही, असा इशारा मुंढेंनी दिला.

**५५.७२ कोटींचा माल नष्ट**

राज्यात २५ मेपासून ३१ जुलैपर्यंत राज्यात ३१३७ आस्थापनाची तपासणी केली असून ७६४ आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावण्यात आली. तसेच १६५ आस्थापनांचा परवाना निलंबित करण्यात आला. आतापर्यंत २८,६६,०९६ किलो ग्रॅम माल नष्ट करण्यात आला. त्याची किंमत ५५.७२ कोटी रु पये आहे. तसेच राज्यात ८९० हाटेलची तपासणी केली असून ३२९ हाटेल्सला सुधारणा नोटीस बजावल्या तर ११६ हाटेलचे परवाने निलंबित केले.

### सावर्डीजवळ भीषण अपघात

## भरधाव ट्रकने कामगारांना चिरडले
## चालकासह तिघांचा जागीच मृत्यू, तिघे गंभीर

**नांदगाव पेठ /प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्गावरील सावर्डी नजीक असलेल्या रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ बुधवारी (दि. ५) दुपारी सुमारे १.३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात ट्रक चालकासह तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे गंभीर जखमी झाले. महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू असताना हा भीषण अपघात घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.प्राथमिक माहितीनुसार, आयआरबी कंपनीच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू होते. यावेळी साहित्याने भरलेला आयआरबी कंपनीचा ट्रक एम एच २७ बी एक्स ७१९२ रस्त्याच्या कडेला उभा होता. दरम्यान एन एल ०१,क्यू. ४३२० क्रमांकाचा भरधाव ट्रक अचानक अनियंत्रित होउन उभ्या ट्रकवर जोरदार आदळला. धडकेनंतर ट्रकने रस्त्यावर




काम करणा-या कामगारांनाही फरफटत नेले. या भीषण अपघातात ट्रक चालक शिवचंद श्रीराम पाल (वय ३८, रा. भैदोही, उत्तर प्रदेश) याच्यासह मुकुंदराव श्रीरामजी गणोरकर (वय ५५) आणि देविदास पाटील (वय ५३, दोघेही रा. चित्तूर, ता. आष्टी, जि. वर्धा) यांचा जागीच मृत्यू झाला.तर भूषण पांडुरंग गणोरकर , दिलीप भरापे (रा. मोझरी) आणि अशोक उके हे तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रु ग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना तात्काळ रु ग्णालयात दाखल करण्यात आले, तर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. अपघातामुळे काही काळ राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

### ट्रकमध्ये अडकला चालकाचा मृतदेह

भरधाव ट्रकने उभ्या ट्रकला धडक दिल्यानंतर झालेल्या अपघातात ट्रकचालक शिवचंद श्रीराम पाल यांचा केबिन मध्येच मृत्यू झाला होता. अपघातामूळे चालकाचा मृतदेह काहीवेळ ट्रकमध्येच अडकून होता. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मोठ्या प्रयत्नानंतर कॅबिनमधून चालकाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

> रस्ता दुरु स्तीच्या कामादरम्यान भरधाव ट्रकने उभ्या वाहनाला धडक देत कामगारांना चिरडल्याने अतिशय दुर्दैवी अपघात घडला.पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना उपचारासाठी रवाना केले.रस्त्यावरील अपघातग्रस्त वाहने तातडीने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या.
>
> ■ **पुनीत कुलट** *,पोलीस निरीक्षक, नांदगाव पेठ*

### मोदींचा सल्ला-सोशल मीडिया वापरताना सावधगिरी बाळगा



### भाजपत सामील झालेल्या खासदारांना सांगितले

## संसदेत ओरडण्याची किंवा रागाने बोलण्याची गरज नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी त्यांच्या निवासस्थानी भाजपच्या सुमारे ३७ नवनिर्वाचित आणि इतर पक्षांमधून आलेल्या राज्यसभा खासदारांसोबत नाश्त्यावर चर्चा केली. या बैठकीत आम आदमी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसमधून नुकतेच भाजपमध्ये सामील झालेले नेतेही उपस्थित होते. पंतप्रधानांनी खासदारांना राजकीय तत्त्वज्ञान, संसदीय नैतिकता आणि वैयक्तिक आचरणाबद्दल मार्गदर्शन केले. सूत्रांनुसार, ही चर्चा खूप सौहार्दपूर्ण होती, ज्यात पंतप्रधानांनी खासदारांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली. पंतप्रधानांनी खासदारांना दिल्लीच्या राजकीय परिघाबाहेर पडण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की, त्यांनी केवळ लुटियन्स दिल्लीपुरते मर्यादित राहू नये.

पंतप्रधान मोदींनी खासदारांना दिल्लीत कोणाला भेटत आहेत आणि कोणासोबत बसत आहेत, याची काळजी घेण्याचा इशारा दिला. ते म्हणाले की, लेटरहेडचा वापर आणि आपले ⇨(पान २ वर)

## जंतर-मंतरवरील आंदोलकांसोबत राहुल यांची पत्रकार परिषद

### मुलीने सांगितले- भारत माता की जय म्हटल्यावर देशद्रोही म्हटले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या महिन्यात पेपर लीक प्रकरणाविरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या तीव्र आंदोलनात सहभागी झालेल्या तरु ण विद्यार्थ्यांची विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भेट घेतली. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांची पाठराखण केली. या विद्यार्थ्यांनी काहीही चुकीचे केलेले नाही. त्यामुळे त्यांनी कोणाचीही माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या तरु णांनी देशाच्या भविष्यासाठी संघर्ष केला असून मला त्यांचा अभिमान आहे,' अशा शब्दांत राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.राहुल गांधी यांनी ५ पीडित आंदोलक विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. २० जुलै रोजी जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान या विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यात आला होता आणि



आंदोलन संपल्यानंतरही त्यांना सोशल मीडिया धमकावले जात होते.विद्यार्थ्यांचे आभार मानताना राहुल गांधी म्हणाले, 'जंतर-मंतरवर आणि देशभरात अशा प्रकारे संघर्ष करणा-या हजारो तरु णांचे मी आभार मानतो. हे तरु ण आपल्या शिक्षण पद्धतीसाठी, संविधानासाठी आणि भारताच्या भविष्यासाठी लढले आहेत. आमच्या चर्चेत मुख्य मुद्दा हिंसाचाराचा होता. विद्यार्थ्यांनी सांगितले की त्यांनी स्वतः कोणतीही हिंसा केली नाही. उलट त्यांच्यावर अत्याचार झाले, त्यांना धमकावले गेले, त्यांच्यावर लाठ्या चालवल्या गेल्या आणि मारहाण करण्यात आली.' राहुल गांधी पुढे म्हणाले की, 'जेव्हा समाजात कोणावरही अन्याय⇨(पान २ वर)

## झारखंडमधील विद्यार्थ्यांचा आवाज संसदेपर्यंत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** झारखंडमधील भरती परीक्षांमध्ये घोटाळ्याचा आरोप करत आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांचा आवाज आता संसदेपर्यंत पोहोचला आहे. बुधवारी लोकसभेत पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी आंदोलक विद्यार्थ्यांचा उल्लेख करत विरोधकांवर निशाणा साधला.तर,



राज्यसभेत आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांच्या पंतप्रधान मोदींवरील विधानावरू न उपसभापती हरिवंश यांनी त्यांना मध्येच थांबवले. अशा प्रकारे दोन्ही सभागृहांमध्ये दिवसभर गदारोळ सुरू राहिला. लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू होताच विरोधी पक्षाचे खासदार फलक आणि घोषणापत्रे घेउन वेलमध्ये पोहोचले. गदारोळ वाढल्यावर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली. कामकाज सुरू झाल्यानंतर सुमारे एक मिनिटातच सभागृह दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी २ वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरू झाली, पण परिस्थिती बदलली नाही. विरोधक पुन्हा वेलमध्ये पोहोचले. गदारोळादरम्यान पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी आवश्यक कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवली. त्यानंतर बँकर्स बुक पुरावा विधेयक, २०२६ आवाजी मताने मंजूर झाले. यानंतर जगदंबिका पाल म्हणाले की, झारखंडमध्ये विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत, परंतु विरोधक त्यांचा आवाज उठवण्याऐवजी संसदेचे कामकाज थांबवत आहेत. ⇨(पान २ वर)

## आरोग्यसेवा ठप्प होण्याच्या उंबरठ्यावर

### डॉक्टरांकडून आकस्मिक सेवाही बंद करण्याचा इशारा

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील डाक्टरांच्या आंदोलनाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. नियोजित शस्त्रक्रिया आणि इतर गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद केल्यानंतरही सरकारने समाधानकारक निर्णय घेतला नाही, तर गुरु वार, ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून आकस्मिक वैद्यकीय सेवाही अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा इशारा खासगी आणि सरकारी डाक्टरांच्या संघटनांनी



दिला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्यसेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डाक्टर्स⇨(पान २ वर)











## सीजेपी दबावगट म्हणून काम करणार

**छत्रपती संभाजीनगर :** सध्या कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) दबावगट म्हणून काम करणार असून सध्याच्या घडीला भारताला अशाच एका प्रभावी दबावगटाची गरज आहे असे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी बुधवारी सांगितले.छत्रपती संभाजीनगर येथे सीजेपीच्या मुख्य कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी पत्रकारांशी बोलताना दिपके म्हणाले की, या बैठकीत माध्यमे आणि न्यायव्यवस्था यांसारख्या संस्थांवरील जनतेचा ढासळत चाललेला विश्वास हा प्रमुख चर्चेचा विषय असेल. याशिवाय इथेनाल मिश्रित इंधन आणि वाढती बेरोजगारी या मुद्द्यांवरही बैठकीत चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या तरी सीजेपी दबावगट म्हणूनच काम करेल, कारण सध्याच्या काळात देशाला अशा दबावगटाचीच गरज आहे असे दिपके यांनी सांगितले. सीजेपीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास यांनी सांगितले की, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे पुढेही पक्षाचे मार्गदर्शक राहतील आणि पक्ष त्यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन घेणार आहे.अलीकडेच नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आणि इतर परीक्षा गैरव्यवहारांविरोधात सीजेपीच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांविरोधात दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्यासाठी सीजेपी प्रयत्न करणार असल्याचे दास यांनी सांगितले. या मुद्द्यावर आम्ही सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा करत आहोत असे ते म्हणाले. देशभरातील अलीकडील विद्यार्थी आंदोलनांमध्ये जखमी झालेल्या आंदोलनकर्त्यांना कायदेशीर आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठीही आम्ही काम करत आहोत असेही दास यांनी सांगितले. सीजेपीचे आंदोलन देशातील विविध शहरांमध्ये पसरले. मात्र, काही ठिकाणी आंदोलने हिंसक झाली. त्यानंतर दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि बिहारमध्ये पोलिसांनी विद्यार्थी आंदोलनकर्त्यांवर कारवाई करत त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले.

## आंदोलनादरम्यान 'आयएसआय'चा हल्ल्याचा कट

**अमृतसर** : दिल्लीतील जंतर-मंतरवर मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उघडकीस आणत, पंजाब पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित दोन सीमापार दहशतवादी माड्यूल्सचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार अल्पवयीन मुलांसह एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अमृतसर पोलिस आयुक्तालयाने केलेल्या या कारवाईत आरोपींच्या ताब्यातून तीन बेकायदेशीर पिस्तूल, जिवंत काडतुसे, चार पेट्रोल बाम्ब, सीसीटीव्ही कॅमेरे आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त गुरप्रीत सिंग भुल्लर यांनी सांगितले की, ज्यावेळी जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते, त्याचवेळी आरोपी ट्रेनने दिल्लीत पोहोचले होते. पाकिस्तानस्थित हँडलरच्या निर्देशानुसार त्यांना पेट्रोल ⇨(पान २ वर)

# BHMS-CCMP डॉक्टरांच्या MMC नोंदणीला विरोध

## २ दिवसापासून IMA परतवाडा चे ४८ तास सेवा बंद आंदोलन




**अचलपूर/प्रतिनिधीः-** BHMS डॉक्टरांना CCMP कोर्स पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल MMC मध्ये नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात भारतीय वैद्यकीय संघटना IMA परतवाडा शाखेने आक्रमक भूमिका घेतली आहे. IMA परतवाडा आणि इतर विविध विशेषज्ञ वैद्यकीय संघटनांच्या पाठिंब्याने आज दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून ४८ तास वैद्यकीय सेवा बंद आंदोलन सुरू करण्यात आले होते.

तिसऱ्या दिवशी ही आज ६ ऑगस्ट रोजी शासन स्तरावर तोडगा न निघाल्याने आज ही अचलपूर तालुक्यातील खाजगी डॉक्टर ओपीडी सह आपत्कालीन सेवा बंद ठेवणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आय.एम.ए परतवाडा चे अध्यक्ष डॉ.स्वप्नील भेले यांनी दिली.

याबाबत अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना आय.एम.ए चा शिष्टमंडळ यांनी निवेदन ही दिले. IMA परतवाडा चे अध्यक्ष डॉ. स्वप्नील भेले आणि सचिव डॉ. आयुष सांगोले, डॉ.राजेश उभाड,डॉ.अश्लेष तिवारी , डॉ.किशोर काबरा, डॉ.मंगेश भगत , डॉ.अनंत पोरे, डॉ.रुपाली मुरले, डॉ.रोहिणी भेले आदी उपस्थितीत होते.

अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि तालुका आरोग्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, BHMS-CCMP डॉक्टरांना MMC मध्ये नोंदणी देणे म्हणजे सर्वोपचार म्हणजेच एलोपाथिक वैद्यकीय क्षेत्रातील दर्जा, प्रामाणिकरण आणि वैज्ञानिक आधाराला धक्का आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्य आणि रुग्ण सुरक्षिततेवर दीर्घकालीन गंभीर परिणाम होऊ शकतात.'आम्ही यासंबंधात शासकीय विभाग आणि मंत्रालयाकडे अनेकदा निवेदने, पत्रव्यवहार आणि पत्रकार परिषदांद्वारे आमची चिंता मांडली आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला आहे,' असे डॉ. स्वप्नील भेले म्हणाले.

IMA परतवाडा च्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की ,हा निषेध रुग्णांविरुद्ध नाही. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी, सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रातील वैज्ञानिक व नैतिक मानके जपण्यासाठी हा लढा आहे.

जर BHMS-CCMP डॉक्टरांच्या नोंदणी प्रक्रिया सुरू झाली, तर हे सेवा बंद आंदोलन अनिश्चित काळासाठी सुरू ठेवण्यात येईल, असा इशाराही IMA परतवाडा ने दिला आहे.

IMA ने शासन स्तरावर विनंती केली आहे की, CCMP अर्हता धारक डॉक्टरांना MMC मध्ये नोंदणी देऊ नये.आज ही तिसऱ्या दिवशी हे आंदोलन सुरू राहणार आहे.यामुळे रुग्णांना अनेक समस्या ना तोंड द्यावे लागत आहे .

# रेबीजमुक्त अमरावतीच्या दिशेने मोठे पाऊल

## श्वान आणि मांजरींचे मोफत लसीकरण शिबिर रविवारी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराला रेबीजमुक्त करण्याच्या उद्देशाने नेताजी क्रीडा मंडळ आणि सोपारिका फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ९ ऑगस्ट रोजी मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन रुक्मिणी नगर येथील नेताजी क्रीडा मंडळाच्या मैदानावर करण्यात आले आहे. ही माहिती आज बुधवार ५ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की, रविवार ९ ऑगस्टच्या सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे. यामध्ये १००० पाळीव प्राण्यांसह भटके श्वान आणि मांजरींचे लसीकरण केले जाणार आहे. हे शिबिर केवळ पशु कल्याणासाठीच नाही तर मानवी सुरक्षेसाठीही अत्यंत आवश्यक आहे. रेबीजचा धोका टाळण्यासाठी घरगुती आणि रस्त्यावरील श्वान आणि मांजरी यांचे लसीकरण करणे गरजेचे आहे. अमरावतीला रेबीजमुक्त करण्याच्या दिशेने हे पाऊल उचलण्यात येत आहे. या शिबिरामध्ये पशुप्रेमी आणि सामाजिक संस्था सहभागी होऊ शकतात. जास्तीत जास्त श्वान-मांजरींपर्यंत ही सुविधा पोहोचवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले. आपल्या पाळीव आणि परिसरातील भटक्या श्वानाने मांजरींना घेऊन या शिबिरमध्ये सहभागी व्हावे. पत्रकार परिषदेमध्ये नेताजी क्रीडा मंडळाचे अध्यक्ष नितीन देशमुख, बाळासाहेब वानखडे,मंगेश काटोल आणि सोपारिका फाउंडेशनचे अध्यक्ष, भार्गव चेंडे ,सोपान चेडे, प्रशांत मोतवर, सचिव सोपान चेंडे ,अनूप खरबडे आदि उपस्थित होते.

**१ व १० वरिल उर्वरित**

## संसदेत ओरडण्याची किंवा

आचरण खूप काळजीपूर्वक करावे. सोशल मीडिया आणि टीव्हीवरही त्यांनी खासदारांना खूप सतर्क राहण्याचा सल्ला दिला. पंतप्रधानांनी सांगितले की, टीव्हीवर कोणतीही चुकीची गोष्ट बोलू नका आणि नेहमी पूर्ण प्रतिष्ठा राखा. त्यांनी खासदारांना फेसबुक, इंस्टाग्राम आणि एक्स (ट्विटर) यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर सक्रिय राहण्यास, तरु णांशी जोडले जाण्यास आणि सरकारच्या कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यास सांगितले. यासोबतच, तरु णांना क्रीडा उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा सल्लाही दिला.

**संसदेत प्रतिष्ठा आणि संयम आवश्यक-** संसदीय चर्चेदरम्यान होणा-या तणावावर पंतप्रधानांनी सांगितले की, सभागृहातील चिंता बाहेर घेउन जाउ नका. ते म्हणाले की, सभागृहातील वातावरण कधीकधी तणावपूर्ण असू शकते, परंतु तुम्ही ते तुमच्यासोबत घेउन जाउ नये. ओरडण्याची किंवा रागाने बोलण्याची गरज नाही. तुम्ही सर्व पक्षाची भूमिका जाणता, त्यामुळे प्रत्येक मुद्द्यावर आपले म्हणणे शांतपणे मांडा. पंतप्रधानांनी खासदारांना सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोन्ही सदस्यांना जाणून घेण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की, सभागृहात तुमचे सहकारी कोण आहेत हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. त्यांनी खासदारांना संसदेच्या ग्रंथालयात दररोज किमान एक किंवा दोन तास घालवण्यासाठीही प्रोत्साहित केले.

**योग आणि वेळ व्यवस्थापनाचा मंत्र-** जेव्हा खासदारांनी पंतप्रधानांना त्यांच्या व्यस्त वेळापत्रकाचे आणि जबाबदा-यांचे व्यवस्थापन करण्याचे रहस्य विचारले, तेव्हा ते म्हणाले, 'मी वर्तमानात जगतो. आत्ता मी तुमच्याशी बोलत आहे, तर मी फक्त इथेच आहे.' त्यांनी खासदारांना सल्ला दिला की त्यांनी वर्तमानात राहावे आणि देशाच्या चांगल्या भविष्यासाठी काम करावे. पंतप्रधानांनी आपली दिनचर्या सांगताना म्हटले, 'मी फक्त ३.५ तास झोपतो, पण नेहमी योग करतो, ज्यामुळे मला व्यवस्थित काम करण्यास मदत होते. तुम्ही सर्वांनी निरोगी जीवनशैली अवलंबली पाहिजे आणि दररोज योग केला पाहिजे.'

**खासदारांनी शेअर केलेले अनुभव-** बैठकीनंतर भाजप खासदार अशोक मित्तल यांनी सांगितले की, पंतप्रधानांनी तरु णांशी जोडले जाण्यासाठी त्यांना लक्षपूर्वक ऐकण्याचा आणि नम्रपणे बोलण्याचा सल्ला दिला. खासदार विक्रमजीत सिंग साहनी म्हणाले की, पंतप्रधानांनी संसदेला गांभीर्याने घेण्यावर आणि ती सुरळीतपणे चालवण्यावर भर दिला.

भाजप खासदार राहुल सिन्हा म्हणाले की, पंतप्रधानांनी आम्हा सर्वांचे ऐकले आणि महत्त्वाचे मार्गदर्शन केले. खासदार सुष्मिता देव यांनी सांगितले की, पंतप्रधानांनी संसदेला एका विद्यापीठासारखे म्हटले, जिथे नेत्यांनी एकमेकांकडून शिकले पाहिजे. भाजप नेते तरु ण चुघ म्हणाले की, पंतप्रधानांनी पक्षीय राजकारणाच्या वर उठून सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा राखण्याचा धडा शिकवला.

## आरोग्यसेवा ठप्प होण्याच्या

(मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना यांनी संयुक्तपणे आंदोलनात सहभागी होण्याची घोषणा केली आहे. ५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ६ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत नियोजित आणि गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. याबाबत मुंबईत सरकारसोबत चर्चा सुरू असून त्यात अद्याप काही तोडगा निघाला नाही.

**आकस्मिक सेवा बंद करण्याचा निर्णय का?**

संघटनांचे म्हणणे आहे की, सरकारकडून ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ठोस आणि समाधानकारक निर्णय झाला नाही, तर त्यानंतर आकस्मिक (इमर्जन्सी) वैद्यकीय सेवांसह सर्व सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात येतील. हा निर्णय रुग्णांच्या हिताविरोधात नसून सरकारच्या निष्क्रिय भूमिकेमुळे घ्यावा लागत असल्याचा दावा डाक्टरांनी केला आहे.

डाक्टरांच्या प्रमुख मागण्या काय आहेत?

बीएचएमएस-सीसीएमपी नोंदणी प्रक्रियेबाबत स्पष्ट कायदेशीर आणि नियामक चौकट तयार करावी, ती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी तसेच निवासी डाक्टरांच्या प्रलंबित सेवा, प्रशिक्षण आणि कल्याणाशी संबंधित मागण्यांवर त्वरित निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

**सरकारवर कोणते आरोप करण्यात आले ?**

संघटनांच्या मते, अनेकदा सकारात्मक संवाद साधूनही सरकारने कोणतीही ठोस हमी दिलेली नाही. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, रु ग्णांची सुरक्षितता आणि राज्यातील आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास धोक्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**रु ग्णांवर काय परिणाम होउ शकतो ?**

सरकारने वेळेत तोडगा न काढल्यास केवळ नियोजित उपचारच नव्हे, तर आकस्मिक वैद्यकीय सेवांवरही परिणाम होउ शकतो. त्यामुळे गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त आणि तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

संयुक्त आंदोलनात कोण सहभागी आहेत?

या आंदोलनात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना सहभागी असून सर्व संघटनांनी एकत्रित भूमिका घेतली आहे.

## झारखंडमधील विद्यार्थ्यांचा

त्यांनी सदस्यांना सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन केले.

संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, सरकार प्रत्येक मुद्द्यावर चर्चेसाठी तयार आहे, परंतु विरोधकांना संसद चालू द्यायची नाही. अनेक विधेयके चर्चेविनाच मंजूर करावी लागली. याची जबाबदारी विरोधकांवर आहे.रिजिजू यांनी काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि डाव्या पक्षांवर राम मंदिराला विरोध केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, संसद परिसरात केलेल्या त्यांच्या आंदोलनासाठी त्यांनी देशाची माफी मागितली पाहिजे.सततच्या गोंधळानंतर लोकसभेचे कामकाज ६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

**राज्यसभेतही घोषणाबाजी झाली-** राज्यसभेचे कामकाजही सकाळी ११ वाजता सुरू झाले. सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी आवश्यक कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवली.

## जंतर-मंतरवरील आंदोलकांसोबत

होतो, तेव्हा एका जबाबदार नागरिकाच्या नात्याने त्या व्यक्तीचे संरक्षण करणे आपले कर्तव्य असते, ही मुख्य बाब या तरु णांनी मांडली. त्यामुळे तुम्ही जे केले ते अगदी योग्य होते. तुमच्यावर झालेल्या अत्याचाराबाबत माफी मागण्याचा कोणताही विषय येत नाही.'

याआधी एका पुस्तक प्रकाशन सोहळ्यातही राहुल गांधी यांनी परीक्षा पद्धती आणि रोजगाराच्या मुद्द्यावरून प्रशासनावर जोरदार निशाणा साधला होता. देशातील कोट्यवधी तरु ण पारदर्शक परीक्षा पद्धत आणि चांगल्या शिक्षण व्यवस्थेसाठी रस्त्यावर उतरत आहेत. तरु णांच्या या विषयाकडे दुर्लक्ष न करता मार्ग काढण्याची गरज आहे, कारण तरु णच देशाचे भविष्य आहेत, असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

## आंदोलनादरम्यान 'आयएसआय'चा

बाम्ब पुरवण्यात आले होते. मात्र, दिल्ली पोलिसांच्या उपस्थितीमुळे ते कट यशस्वी करू शकले नाहीत. पोलिसांनुसार, आरोपींना पेटीएमद्वारे आर्थिक मदतही मिळत होती. या निधीच्या स्त्रोताची आणि व्यवहाराची चौकशी केली जात आहे. दुस-या म?ड्यूलचे सदस्य परदेशात बसलेल्या हँडलर्सकडून ऑनलाइन सूचना घेत होते. त्यांच्या ताब्यातून चार पेट्रोल ब?म्ब, एक पिस्तूल, लाइटर आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात पोलिस ठाण्यांवर आणि सुरक्षा आस्थापनांवर हल्ल्याच्या कटाचाही खुलासा झाला.पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले की, आरोपींचा संपर्क पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित हँडलर्सशी होता. त्यांना पोलिसांवर हल्ला करण्याचे आणि जंतर-मंतरवर दहशत पसरवण्याचे निर्देश दिले जात होते.

तपासात असे समोर आले की, नेटवर्कच्या तारा दिल्लीतील जंतर-मंतरपर्यंत जोडलेल्या होत्या. हँडलर्सनी आरोपींना तिथे सामग्री उपलब्ध करून दिली होती आणि स्फोटाची योजना आखली होती, परंतु दिल्ली पोलीस आणि आरएएफच्या मोठ्या पथकाच्या उपस्थितीमुळे हा कट यशस्वी होउ शकला नाही.

## घरात काडतुसे टाकून खोट्या

पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३ तसेच आर्म्स ॲक्टच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान विवेक धनराज गायकवाड (वय ३१), गप्पू उर्फ ऋतिकेश संजय तरोडे (वय २८) आणि आकाश सुभाष सपकाळ (वय २४) या तिघांना अटक करण्यात आली. आरोपींकडे ही काडतुसे नेमकी कोठून आली, त्यांच्याकडे आणखी शस्त्रसाठा आहे का, तसेच या कटात अन्य कोणाचा सहभाग आहे का, याचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. नागरिकांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा फ्रेजरपुरा पोलिसांनी दिला आहे.

## राजस्थानातून एमडी ड्रग्ज पुरवठा

दिल्यानंतर राजापेठ पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेदरम्यान १ ऑगस्ट रोजी साहील राजेश मेहरा (वय २२, रा. शिवाजी संकुल, अकोली रोड, अमरावती) याला अटक करण्यात आली होती. त्याच्या ताब्यातून सुमारे ४१.५५ लाख रुपयांचा मेफेड्रॉन (एमडी), इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, इकोस्पोर्ट कार, दोन ॲपल मोबाईल, पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि अन्य वस्तूंसह एकूण ५३ लाख २९ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान अटक आरोपीने हा अंमली पदार्थ राजस्थानमधील एका व्यक्तीकडून व्हॉट्स ॲपद्वारे संपर्क साधून मागविल्याची माहिती दिली. त्यानुसार राजापेठ पोलिसांचे विशेष पथक राजस्थानमध्ये रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे रामनिवास जगदीशकुमार बिश्नोई (वय २२, रा. डुंगरवा, ता. बागोडा, जि. जालौर, राजस्थान) याला जालौर येथून ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणातील आणखी एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच पोलीस कर्मचारी मनीष करपे, पंकज खटे, रवि लिखितकर, शशीकांत शेळके, पवन तिवारी, अर्जुन कदम, रफिक खान, अंकुश काळे, पंकज गाठे, आकाश यादव, प्रशांत बोलोरकर आणि अमोल देशमुख यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## राजापेठमधील मोठी व्यावसायिक

सुरक्षा नियम २००२ नुसार मालमत्ता ताब्यात घेण्याची कारवाई केली. राजापेठ भागातील सर्वे नंबर ८८ मधील प्लॉट क्रमांक ३/३ वरील व्यावसायिक इमारत बँकेने ताब्यात घेतली आहे. या इमारतीत तळमजला अधिक ४ मजले असून एकूण क्षेत्रफळ ३४२२ चौरस फूट आहे. ही इमारत व्यंकटेश हॉस्पिटलच्या जवळ असून शहरातील मोठ्या व्यावसायिक ठिकाणांपैकी एक मानली जाते. या कारवाई दरम्यान बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. बँकेने प्रसिद्धी पत्रकाद्वारे नागरिकांना आणि संभाव्य खरेदीदारांना इशारा दिला आहे की, या मालमत्तेवर बँकेचा कायदेशीर दावा आहे. त्यामुळे या मालमत्तेशी संबंधित कोणताही आर्थिक व्यवहार करू नये. कोणी असे केल्यास तो स्वतःच्या जबाबदारीवर करेल आणि त्याची जबाबदारी पूर्णपणे बँकेवर राहणार नाही.एका मोठ्या रकमेच्या कर्ज थकबाकीमुळे झालेल्या या कारवाईमुळे शहरातील व्यापारी आणि कर्जदारांमध्ये खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसांपासून बँका एनपीए कमी करण्यासाठी आक्रमक झाल्या आहेत. त्यामुळेच अशा मोठ्या कारवाया वाढल्या आहेत. पोलिसांच्या उपस्थितीत ही संपूर्ण कारवाई शांततेत पार पडली.

## बेलोरा विमानतळावर

सर्पमित्रांना देण्यात आली.

माहिती मिळताच सर्पमित्रांची टीम पहाटे सुमारे ३ वाजता विमानतळावर दाखल झाली. आवश्यक खबरदारी घेत अजगराला पकडण्यासाठी रेस्क्यू मोहीम सुरू करण्यात आली. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर अजगराला कोणतीही इजा न करता सुरक्षितपणे पकडण्यात सर्पमित्रांना यश आले. त्यानंतर वन्यजीवांच्या अधिवासात, मानवी वस्तीपासून दूर असलेल्या सुरक्षित जंगल परिसरात त्याला सोडण्यात आले.

या रेस्क्यू मोहिमेत सर्पमित्र राहुल वानखडे, ऋतिक धोके तसेच एमएसएफ टीमच्या सदस्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या समन्वय आणि तत्परतेमुळे संपूर्ण मोहीम यशस्वी ठरली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा अन्य नुकसान झाले नाही.

दरम्यान, सर्पमित्रांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात साप अथवा अन्य वन्यजीव आढळल्यास घाबरून न जाता किंवा त्यांना इजा न पोहोचवता तातडीने प्रशिक्षित सर्पमित्र अथवा वन विभागाशी संपर्क साधावा.

## हिंगणे मसाला कंपनीतील ५९

उपलब्ध नसतानाही पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. त्यातून आशीष गोपाल रामटेके (३५, रा. सावर्डी), नितेश भीमराव गजभिये (२३, रा. चिंचोली गवळी, सध्या रा. सावर्डी) हे दोघे सुरक्षा रक्षक तसेच मोहम्मद शकील मोहम्मद लाईक (३३, रा. यास्मीन नगर, अमरावती) या भंगार व्यावसायिकाचा सहभाग निष्पन्न झाला. तिघांनाही अटक करून त्यांच्याकडून चोरीतील सर्व चार इलेक्ट्रिक मोटारींसह एकूण ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) यशवंत सोळंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक गणेश राऊत, पोहेकॉ सतीश देशमुख, पोलीस कॉन्स्टेबल वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सय्यद, निलेश साविकार आणि प्रफुल खोब्रागडे यांनी सहभाग घेतला.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळांच्या

बिघडविणारे आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी युवक काँग्रेस व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अमरावती यांच्या वतीने आज बुधवार दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदन देऊन ' जोडे मारो ' आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे संकेत बोके यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या या आंदोलनामध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिकात्मक फोटोला जोडे मारून यावेळी तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्राच्या महिला उपमुख्यमंत्री यांच्याविषयी आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य करणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला अशोभनीय असल्याने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीरपणे माफी मागावी , अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने देण्यात आला. सपकाळ यांच्या विधानाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी व आवश्यक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सुद्धा यावेळी करण्यात आली. या आंदोलनामध्ये आकाश हिवसे, प्रमोद धनाडे, मनीष पाटील, अभिषेक हजारे, बादल काळे,अभिमन्यू तायवाडे, शुभम पारोदे, संकेत अळसपुरे, प्रथमेश बोके, सार्थक खोरगडे, मनीष फाटे, नीरज खंडारे, सोमेश रोहणकर, हिमांशू गुप्ता , बबलू वाडेकर, सुजल तेलखडे, मनीष पेठे, हिमांशू गुप्ता, पंकज खंडाळकर, श्रवण भोरे, प्रतीक पाटेकर, अभिजित लोयटे , शिवराज पाटील, राहुल वाघ, निखिल आखरे , अजय बेहरे, अमोल गुल्हाने आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुथूट फिनकॉर्प प्रकरणात

मंगळवारी मोठ्या संख्येने ग्राहकांनी कर्जाची संपूर्ण परतफेड करूनही गहाण ठेवलेले दागिने परत मिळत नसल्याने शाखेत गर्दी केली. काही ग्राहकांनी भरलेली रक्कम कंपनीच्या संगणक प्रणालीत दिसत नसल्याचे सांगण्यात आल्याने संतप्त ग्राहकांनी शाखेत निषेध नोंदवत सिटी कोतवाली पोलिस ठाणे गाठले. या प्रकरणात शाखेतील एका जबाबदार अधिकाऱ्याच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात असून, तो संपर्काबाहेर असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. ग्राहकांकडून प्राप्त झालेली रक्कम अधिकृत प्रणालीऐवजी इतर माध्यमांतून व्यवहारात आणल्याचा आरोपही काही तक्रारींमध्ये करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. पोलिसांनी कंपनी व्यवस्थापनाला संशयित अधिकाऱ्याला चौकशीसाठी हजर करण्याचे निर्देश दिले असून, या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. गैरव्यवहाराची नेमकी व्याप्ती आणि आर्थिक नुकसानाचा आकडा कंपनीचा ऑडिट अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## तरूणांची गळफास घेऊन

फांसाला लटकलेले आढळले. हे पाहून त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. कुटुंबीयांनी तात्काळ घटनेची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट आढळली नाही. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शुभम यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले आणि दोन भाऊ असा परिवार आहे. शवविच्छेदनानंतर दुपारी २ वाजता हिंदू मोक्षधाम येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## IMA चा आज भव्य मोर्चा व

मोर्चाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. हा मोर्चा IMA महाराष्ट्र राज्याच्या राज्यव्यापी आंदोलनाचा एक भाग आहे.

## ऋषी बेलसरे यांचे निधन



**अचलपूर/प्रतिनिधीः-** स्वयंवर लॉन्सच्या मागे, फातिमा स्कूलसमोर राहणारे ऋषी (चेतन) दिलीपराव बेलसरे यांचे मंगळवार ४ ऑगस्ट रोजी विजेचा शॉक लागल्याने आकस्मिक निधन झाले. बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता त्यांच्या राहत्या घरून अंत्ययात्रा काढण्यात आली. अंत्ययात्रेत नातेवाईक, मित्रपरिवार, परिसरातील नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्या निधनाने परिसरात शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहे.

## महाडिबीटी २.० पोर्टलवर मॅट्रीकपूर्व आणि मॅट्रीकोत्तर ऑनलाईन, अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु

### विद्यार्थी व शाळा-महाविद्यालयांना अर्ज भरण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विमुक्त जाती,इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मॅट्रीकपूर्व ९ व मॅट्रीकोत्तर ११ शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया महाडिबीटी २.० पोर्टलवर सुरु करण्यात आली असून विद्यार्थी ,पालक व शाळा-महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी पोर्टलवर अचूक माहिती भरण्याचे आवाहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया अद्ययावत करण्यात आलेल्या महाडिबीटी २.० पोर्टलवर सुरु करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने अर्ज भरण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा लागणार आहे. लॉगिन टॅबवर उचित पर्यायांचा वापर करून आधार बेस लॉगिन करता येणार आहे. पात्र योजनेचा तपशील अद्यावत केल्यानंतर विभागनिहाय योजनांची यादी उपलब्ध होणार आहे त्यानुसार योजनेची निवड करून अर्ज करता येणार आहे. पोर्टलवर अर्ज भरताना जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचे रहिवासी, दिव्यांगत्व, कौटुंबिक उत्पन्न इ. माहिती काळजीपूर्वक भरावी लागणार आहे.

पोर्टलवर ऑनलाईल नोंदणी व अर्ज करण्यासाठी शाळा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याच्या सूचना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत करण्यात आल्या आहेत.

पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क न घेण्यासह महत्वाच्या महाविद्यालयांचे नाव, महाविद्यालयास मान्य असलेल्या अभ्यासक्रमांची नावे, अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमता, महाविद्यालयाच्या व अभ्यासक्रमाच्या मान्यतेचे विविध आदेश शुल्क, रचना इत्यादी माहिती पोर्टलवर मॅप करण्याचे आदेश संबंधित शैक्षणिक यंत्रणाना देण्यात आले आहेत. तसेच अधिक माहिती करिता ०२२-४११५०८००/१८००१०२५३११ अथवा helpdesk@mahadbt.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क करता येईल असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक सरिता बोबडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# बाकलीवाल कॉलनीत नियम धाब्यावर

## घराच्या परवानगीवर उभे राहते हॉस्पिटल-शोरूम ; ३ वर्षांपासून रस्ता बंद

### पालिकेचे दुर्लक्ष




■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील बाकलीवाल कॉलनीमध्ये एका व्यावसायिकाने गृहनिर्माण सोसायटीत घरबांधणीची परवानगी घेऊन व्यावसायिक संकुल उभारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या बांधकामामुळे मुख्य रस्ता बंद असून नागरिक हैराण झाले आहेत.

नगरपालिकेकडून केवळ घराच्या बांधकामाची परवानगी असताना संबंधित व्यावसायिकाने तेथे हॉस्पिटल व इलेक्ट्रिक मोटरसायकलचे शोरूम सुरू करण्याचा घाट घातला आहे. बांधकामाचे मटेरियल रस्त्यावरच पडून आहे. शिवाय रस्त्यावरच अवैध टिन शेड ठोकण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद झाला आहे.

पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचते. कॉलनीतून ये-जा करणाऱ्या नागरिकांसह शेजारी राहणाऱ्या रहिवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

स्थानिकांनी याबाबत नगरपालिकेकडे वारंवार लेखी-तोंडी तक्रारी केल्या. मात्र पालिका प्रशासन 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नियमबाह्य बांधकाम व रस्ता अडवून ठेवल्याप्रकरणी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी कॉलनीवासीयांनी केली आहे.

# अतिक्रमणावर नगरपरिषदेचा बुलडोझर

## मुख्याधिकारी अरविंद मुंढे ॲक्शन मोडमध्ये

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता नगरपरिषद प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारपासून शहरातील प्रमुख मार्गांवरील अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात करण्यात आली. कारवाईसाठी थेट बुलडोझर रस्त्यावर उतरल्याने अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली असून, कारवाईची धास्ती घेत अनेक व्यावसायिकांनी स्वयंप्रेरणेने आपली अतिक्रमणे हटविण्यास सुरुवात केली आहे.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पाटणी चौक, बसस्थानक परिसर, पोस्ट ऑफिस चौक, पुसद नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अकोला नाका, रिसोड रोड यासह प्रमुख मार्गांवरील रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर झालेले अतिक्रमण प्रशासनाच्या रडारवर आहे. अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत असून, वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका वाढत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने होत होत्या. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने कठोर भूमिका घेत अतिक्रमण हटाव कारवाईला सुरुवात केली आहे.

### कारवाईच्या धास्तीने व्यावसायिकांकडून स्वयंप्रेरणेने अतिक्रमण हटविण्यास सुरुवात



# बिल भरणारे मालेगावकर गप्प... अंधाराचे राज्य मात्र कायम!

## महावितरणला जाब विचारणार कोण?

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

रविवारी सायंकाळी सुमारे ६ वाजल्यापासून मालेगाव शहरातील अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना पुन्हा एकदा अंधारात रात्र काढावी लागली पाच ते सहा तास वीज गायब असतानाही वीजपुरवठा नेमका कधी सुरळीत होणार याबाबत महावितरणकडून माहिती मिळत नसल्याने संतापाचे वातावरण आहे.

जरासा पाऊस पडला की मालेगावची वीज व्यवस्था कोलमडते अशीच परिस्थिती पुन्हा पाहायला मिळाली. शहरात पाणी साचल्याने विंचू साप व इतर विषारी प्राण्यांचा धोका वाढला आहे. लहान मुले महिला वृद्ध आणि रुग्णांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. विशेष म्हणजे सोशल मीडियावर मात्र लाईन कधी येणार? आम्ही नियमित बिल भरतो, मग ही शिक्षा का? महावितरण झोपले आहे का? अशा संतप्त प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात उमटत आहेत. मात्र प्रत्यक्षात महावितरण कार्यालयावर धडक देणे अधिकाऱ्यांना जाब विचारणे किंवा संघटित आंदोलन उभारणे यासाठी पुढाकार घेणारे नागरिक दिसत नाहीत. फक्त मोबाईलच्या स्क्रीनवर राग व्यक्त करून प्रश्न सुटत नाहीत प्रशासन आणि महावितरण यांना जबाबदार धरण्यासाठी नागरिकांनी संघटितपणे आवाज उठवणे गरजेचे आहे अन्यथा प्रत्येक पावसाळ्यात मालेगावकरांना अंधार गैरसोय आणि प्रशासनाच्या अनास्थेचा सामना करावा लागणार हेच वास्तव राहील.

# वाशिममध्ये ओबीसी मंडल यात्रेचे स्वागत

# जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी एल्गार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी विदर्भातील ११ जिल्ह्यांतून मार्गक्रमण करणाऱ्या ओबीसी मंडल यात्रेचे मंगळवारी (दि. ४) सायंकाळी शहरात उत्स्फूर्त वातावरणात स्वागत करण्यात आले. पुसद नाका येथे फटाक्यांची आतषबाजी, घोषणाबाजी आणि जयघोषात यात्रेचे स्वागत करण्यात आले.

त्यानंतर शहरातून भव्य रॅली काढण्यात आली असून स्वागत लॉन येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांच्या नेतृत्वाखाली दि. ३ ऑगस्ट रोजी भंडारा येथून या मंडल यात्रेला प्रारंभ झाला. नागपूर, वर्धा आणि यवतमाळ मार्गे वाशिममध्ये दाखल झालेल्या यात्रेचे विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले. यावेळी 'एकच पर्व ओबीसी सर्व ', 'ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यानंतर यात्रेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकांना अभिवादन केले. शहरातून मार्गक्रमण करत स्वागत लॉन येथे जाहीर सभा पार पडली.

सभेच्या विचारपीठावर मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांच्यासह विलास काळे, डॉ. रवी जाधव, रामप्रभू सोनोने, प्रा. डॉ. अनिल राठोड आणि डॉ. रामकृष्ण कालापाड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी विलास काळे यांनी प्रास्ताविकातून मंडल यात्रेची भूमिका, उद्दिष्टे आणि जनजागृती मोहिमेची आवश्यकता विशद केली.

यावेळी इंजि. सिताराम वाशिमकर, प्रल्हाद पौळकर, शंकरराव वानखेडे, समाधान गिऱ्हे, मिलिंद सुर्वे, ज्ञानेश्वर वाशिमकर, सुनील जाधव, नागेश काळे, माधवराव शेवाळे, धम्मदास वाकुडे, वैभव उलेमाले, हनुमान सारसकर, गोकुळ आडे, रतनकुमार राठोड, विष्णू राठोड, बळीराम राठोड, कैलास राठोड, अजय सोनूनकर, संदीप चिखलकर यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान, बुधवारी सकाळी ही मंडल यात्रा मालेगाव व केनवड मार्गे मेहकरकडे रवाना झाली.

### स्वतंत्र कॉलम न दिल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा




# शेलूबाजार पोलीस चौकीतील एपीआयच्या बदलीची ग्रामस्थांची मागणी; पोलीस अधीक्षकांना निवेदन

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

मंगरुळपीर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या शेलूबाजार पोलीस चौकीत कार्यरत सहायक पोलीस निरीक्षक यांच्या बदलीची मागणी करत ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक, वाशिम यांना निवेदन सादर केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाच्या पद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी असून, सर्वसामान्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, शेलूबाजार परिसरात चोरी, दागिन्यांच्या दुकानांवरील चोरीचे प्रकार, चिडीमारी, महिलांची छेडछाड तसेच शाळा व महाविद्यालयांसमोर बुलेट मोटारसायकलींचे फटाके फोडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे महिला, विद्यार्थिनी, व्यापारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, गावातील कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे. गावात शांतता आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी संबंधित एपीआय यांची तातडीने बदली करून त्यांच्या जागी निष्पक्ष, प्रामाणिक व नागरिकांशी सौजन्यपूर्ण वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांकडे व्यक्त केली आहे.

# गर्भाधारणा पूर्व व प्रसव पूर्व निदान तंत्रज्ञान कायदयाचे विधी स्वयंसेवक यांना प्रशिक्षण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

### समाज जागृतीसाठी विधी स्वयंसेवक उतरणार मैदानात

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वाशीम वतीने दि.३ ऑगस्ट रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सभागृहात गर्भाधारण पूर्व व प्रसव पूर्व निदान तंत्रज्ञान कायदयाची प्रभावी पणे अंमलबजावणी व्हावी म्हणून जिल्ह्यातील विधी स्वयंसेवकांचे प्रशिक्षण संपन्न झाले.

यावेळी प्रशिक्षण कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधिश विद्यमान व्ही.जी.चौखंडे होते.तर प्रशिक्षण मार्गदर्शक म्हणून जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कायदा तथा परिविक्षा अधिकारी जिनसाजी मदन चौधरी होते.प्रशिक्षण कार्यक्रमांचे अध्यक्ष व्ही.जी चौखंडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की,समाजात मुलगा मुलगी समानतेचा विचार अधिक रुढ होणे ही काळाची गरज आहे.म्हणून पीसीपीएनडीटी कायदयाच्या काटेकोर अंमलबजावणी साठी विधी स्वयंसेवकांनी गावोगावी जाऊन जनतेपर्यंत कायदयाची जनजागृती करावी.व लींग निवडीस आळा घालण्यासाठी जनजागृतीचे माध्यम बनावे.आणि ज्यांनी कायदयाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई व कायदेशीर सविस्तर माहिती सांगितली. नंतर प्रमुख मार्गदर्शक संरक्षण कायदयाचे परिविक्षा अधिकारी जिनसाजी मदन चौधरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, १९९४ साली कायदा करून मुलगा कींवा मुलगी यासाठी कोणत्याही तंत्रज्ञानाद्वारे लींग चाचणी करणे हा गुन्हा ठरतो.शिवाय लींग चाचणी करणाऱ्या मशिनवर बंदी घालण्यात आली आहे.

# रिसोड पोलिसांची मोठी कामगिरी : सात वर्षांपासून फरार असलेल्या तीन आरोपींना अटक

■ प्रतिनिधी | रिसोड ■




पोलिसांनी फरार व न्यायालयाकडून वॉरंट असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल सात वर्षांपासून फरार असलेल्या तीन आरोपींना जेरबंद केले आहे. चोरीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये वॉरंट असलेल्या आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेतल्याने गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली.

जिल्हा पोलीस प्रशासनाच्या आदेशानुसार २९ जुलै रोजी फरार व पाहिजे आरोपी शोध मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे रिसोड पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने ग्राम व्याड (ता. मेहकर, जि. बुलढाणा) येथे छापा टाकून बाळू विठ्ठल चव्हाण (वय ४०, रा. वरुड, ता. रिसोड, जि. वाशिम) याला ताब्यात घेतले. हा आरोपी रिसोड पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या सात गुन्ह्यांमध्ये पाहिजे होता व अनेक वर्षांपासून फरार होता. याच मोहिमेत नितीन सुरेश पवार (रा. सिरसाळा, ता. मालेगाव, जि. वाशिम) यालाही ताब्यात घेण्यात आले.

# सद्गुरू सद्गुरु हेच परमेश्वराचे स्वरूप होय

## प.पू. सद्गुरू वडाळकर महाराजांचा उपदेश

■ प्रतिनिधी | कारंजा ■



'सद्गुरु हेच परमेश्वराचे स्वरूप होय , ' गुरु पौर्णिमे निमित्त गुरुचरित्राचे नायक सदगुरु माऊली श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांच्या जन्म व कर्म भूमीत संपन्न झालेल्या सोहळ्यात, प.पू. सद्गुरु प्रा.डॉ. श्री अनिल जी वडाळकर महाराज यांनी, असा उपदेश उपस्थित शिष्यांना केला. पुढे बोलताना गुरुदेव म्हणाले, ' सद्गुरुतच परमेश्वर असतो, पण लोकांना त्याची पारख नसते. ना गुरु ना भक्त तरी सर्वत्र गुरुपौर्णिमा उत्सव होतच असतो. त्यामुळे कोणालाही दैवी शक्तीचे दर्शन होत नाही. ज्यांना दैवी साक्षात्कार होतो, तेच खरे गुरु असतात . आणि असेच सद्गुरु खऱ्या भक्ताला ओळखतात व भक्तीत आणतात. सद्गुरूच दैवत आहे ,परब्रम्ह आहे. देव सुद्धा सदगुरूंचा आशीर्वाद घेत असतात. अनेक देवालयांमध्ये दर्शन घेणाऱ्यांची लाईन असते, त्यात देव नसतो कारण खरे भक्त नाहीत ते पर्यटक असतात. गुरु भक्त परंपरा विस्कळीत झालेली आहे, त्यामुळे देव देवळात नाहीतच. करंज नगरीत गुरु मंदिर आहे त्यात भर पडली ती सद्गुरु मठाची. वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथील सद्गुरूंचा मठ मानवाच्या कल्याणासाठी गुरुमाऊली श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या आज्ञेने स्थापन झालेला आहे. शृंगेरी मठात सिद्ध केलेल्या खडावा कारंजा येथील सद्गुरु मठात आहे. गुरु माऊली श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज शृंगेरी मठाचे शिष्य होते.सद्गुरु स्वामीजींच्या पदस्पर्शाने कारंजा भूमी पावन झालेली आहे. अनेक तीर्थक्षेत्र पवित्र राहिली नाहीत ,त्यातील पावित्र्य नष्ट होत आहे .

# २.०७ कोटींच्या बायोमायनिंगच्या कागदपत्रांचा खेळ ?

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावरील प्रश्नांची मालिका दिवसागणिक अधिकच गंभीर होत आहे. या प्रकरणातील वृत्तमालिकेनंतर संबंधित कंत्राटदाराला देण्यात येणाऱ्या देयकाच्या प्रक्रियेवर स्थगिती आल्याची माहिती समोर आली. त्याचबरोबर कामाशी संबंधित आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय कागदपत्रे सादर करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने कंत्राटदाराला पत्र दिले. त्यानंतरही कागदपत्रे न आल्याने पुन्हा स्मरणपत्रही बजावण्यात आल्याचे समजते. मात्र, इतक्या प्रक्रियेनंतरही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेली नसल्याची माहिती पुढे येत आहे.

■ एक पत्र... एक स्मरणपत्र... तरीही कागदपत्रे गुलदस्त्यातच! ■ 'दस्तऐवज नसताना काम पूर्ण'चा दावा कसा?
■ देयकाला ब्रेक, प्रशासनासमोर पडताळणीचे मोठे आव्हान ■ अकोटकरांना चौकशीची आता प्रतीक्षाच



संग्रहित छायाचित्र

दरम्यान, जर सर्व काम नियमानुसार झाले असेल, तर कागदपत्रे वेळेत सादर करण्यात अडचण काय? आणि जर कागदपत्रेच उपलब्ध नसतील, तर प्रत्यक्ष कामाची खातरजमा कोणत्या आधारावर करण्यात आली? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने अकोटकर विचारत आहेत.

### प्रशासनाच्या पत्रांनंतरही शांतता का?

नगर परिषद प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांची मागणी केल्यानंतरही संबंधित कंत्राटदाराकडून तत्काळ प्रतिसाद न मिळाल्याचे समोर येत आहे. एवढ्या मोठ्या सार्वजनिक प्रकल्पात मशिनरी, मनुष्यबळ, आरडीएफ, लिचेट व्यवस्थापन, वजनकाटे, वाहतूक, प्रयोगशाळा अहवाल, पर्यावरणीय नोंदी यांसारखे अनेक दस्तऐवज आवश्यक असतात. अशा परिस्थितीत ही कागदपत्रे वेळेत उपलब्ध न होणे, ही बाबच अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरत आहे.

**प्रश्न अनुत्तरितच...**

- कंत्राटदाराकडे आवश्यक कागदपत्रे वेळेत का उपलब्ध झाली नाहीत?
- दोन पत्रांनंतरही कागदपत्रे सादर न होण्यामागे कारण काय?
- आता सादर होणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी कोण करणार?
- पडताळणीपूर्वी देयकाचा कोणताही निर्णय होणार नाही ना?
- स्वतंत्र तांत्रिक चौकशी केली जाणार का?
- या सर्व प्रश्नांची अधिकृत उत्तरे मिळेपर्यंत बायोमायनिंग प्रकल्पावरील संशय कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### आता सादर होणाऱ्या कागदपत्रांची सत्यता कशी तपासणार?

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पडताळणी. समजा, कंत्राटदाराने आता कागदपत्रे सादर केली, तर ती प्रत्यक्ष कामाच्या कालावधीतीलच आहेत की नंतर तयार करण्यात आलेली आहेत, याची खात्री प्रशासन कोणत्या पद्धतीने करणार? संबंधित नोंदींची स्वतंत्र तांत्रिक तपासणी होणार का? की केवळ सादर झालेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेतला जाणार? याबाबत अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

### देयक थांबले... पण जबाबदारी कोणाची?

देयक प्रक्रियेला स्थगिती मिळणे ही एक प्रशासकीय बाब असली, तरी त्यामागील कारणांची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. जर कागदपत्रे पूर्ण नसतील, तर काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कोणत्या आधारावर देण्यात आले? आणि जर प्रमाणपत्र देण्यात आले नसेल, तर देयकाची प्रक्रिया सुरू कशी झाली? असे प्रश्नही उपस्थित होत आहेत.

### नगराध्यक्ष, सभापतींची भूमिका; डोलारा प्रशासनाच्या खांद्यावर

या संपूर्ण प्रकरणात नगराध्यक्षा व आरोग्य सभापती यांनी यापूर्वी प्रशासनाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता सर्वांची नजर प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागली आहे. सार्वजनिक निधीतील कोट्यवधी रुपयांच्या कामात कोणताही संशय राहू नये, यासाठी पारदर्शक चौकशी आणि सर्व नोंदी सार्वजनिक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### स्वच्छ भारत मिशनकडून चौकशीची मागणी

वाढत्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या स्वच्छ भारत मिशनच्या विशेष तांत्रिक पथकाकडून संपूर्ण प्रकल्पाची तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी काही नागरिक आणि माजी लोकप्रतिनिधींकडून पुढे येत आहे. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पूर्ण पारदर्शकता राखणे, हीच प्रशासनाची खरी कसोटी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

### (कायदेशीर सूचना)

या वृत्तातील सर्व बाबी उपलब्ध कागदपत्रे, संबंधित विभागाकडून प्राप्त माहिती, प्रशासनातील पत्रव्यवहार आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर आधारित आहेत. यातील कोणताही कथित गैरव्यवहार, आर्थिक नुकसान किंवा अनियमितता सक्षम चौकशी यंत्रणेने अद्याप सिद्ध अथवा पुष्टी केलेली नाही. संबंधित नगर परिषद, अधिकारी, लोकप्रतिनिधी किंवा कंत्राटदार यांची अधिकृत भूमिका प्राप्त झाल्यास तीही त्याच प्राधान्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५० ■ गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## निर्बंधांचा गाजावाजा : महागाईचा फटका; पनीरबंदीचा निर्णय जनतेसाठी की भ्रष्ट यंत्रणेसाठी संधी

### आता पनीर निर्बंधाने सामान्यांच्या खिशावर घाला पडणार का ?

### सुगंधित तंबाखू, दारूबंदीचा अनुभव ताजा

**वर्धा रवींद्र लाखे :** राज्यात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पनीरच्या विक्रीवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यभरात चर्चांना उधाण आले आहे. अन्नातील भेसळ रोखणे आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हा निर्णयामागील उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात या निर्णयाचा फटका कोणाला बसणार आणि फायदा कोणाचा होणार, हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

यापूर्वीही एफडीएने सुगंधित तंबाखूविरोधात धडक कारवाईचा गाजावाजा केला होता. मोठ्या प्रमाणात जप्ती, छापे आणि गुन्हे दाखल झाल्याची माहिती देण्यात आली. मात्र आजही वीस रुपयांचा खर्रा चाळीस रुपयांना खुलेआम विकला जात असल्याचे वास्तव कोणापासून लपलेले नाही. कारवाया झाल्या, पण काळाबाजार थांबला नाही. उलट दर वाढले आणि ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडला. त्यामुळे एफडीएचा फटका आणि नागरिकांना झटका अशीच परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आहे.



आता पनीरवर निर्बंध आणल्यानंतरही अशीच परिस्थिती निर्माण होणार का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. शहरातील हॉटेल, ढाबे आणि रेस्टॉरंटमध्ये १८० रुपयांना मिळणारी पनीरची भाजी उद्या ३०० ते ३५० रुपयांपर्यंत पोहोचली, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार पनीरची उपलब्धता कमी झाली, तर त्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या ताटावर आणि व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होणार, हे उघड आहे. निर्बंधांच्या नावाखाली कृत्रिम टंचाई निर्माण झाली, तर महागाईला आणखी खतपाणी मिळेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

वर्धा जिल्ह्यातील दारूबंदीचे उदाहरण आजही सर्वांसमोर आहे. कागदोपत्री दारूबंदी असली, तरी प्रत्यक्षात गावोगावी अवैध दारूची विक्री आणि वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. कायदा एकीकडे आणि वास्तव दुसरीकडे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मग पनीरबाबतही केवळ आदेश निघतील आणि प्रत्यक्षात काळाबाजार वाढेल, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

व्यापारी आणि हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, जर पनीरचा पुरवठा कमी झाला किंवा तपासणीच्या भीतीने विक्रेते मागे हटले, तर बाजारातील दर आपोआप वाढतील. त्याचा थेट परिणाम सामान्य ग्राहकांवर होईल. भेसळ रोखण्याच्या नावाखाली प्रामाणिक व्यापाऱ्यांनाच त्रास सहन करावा लागेल, तर बेकायदेशीर मार्गाने व्यवसाय करणारे मात्र अधिक सक्रिय होतील, अशीही चर्चा सुरू आहे.

राज्यातील अनेक निर्णयांची अंमलबजावणी कागदावरच मर्यादित राहिल्याची उदाहरणे ताजी आहेत. त्यामुळे केवळ आदेश काढून किंवा निर्बंध लावून प्रश्न सुटत नाहीत. सातत्यपूर्ण तपासणी, दोषींवर कठोर कारवाई, पारदर्शक यंत्रणा आणि राजकीय इच्छाशक्ती याशिवाय कोणताही निर्णय यशस्वी होऊ शकत नाही.

पनीरवरील निर्बंधही त्याच मार्गाने जाणार की खरंच भेसळखोरांवर वचक बसवणार, हे येणारा काळच ठरवेल. मात्र आजच्या घडीला सर्वसामान्य नागरिकांच्या मनात एकच प्रश्न घुमत आहे, भेसळ थांबणार की फक्त पनीर महागणार,

## नेपाळवरून आयात केलेले २.१० लाखांचे सोयाबीन तेल जप्त

### १,३१८ किलो खाद्यतेल संशयाच्या भोवऱ्यात

### एफडीएची वर्ध्यात मोठी कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने वर्धा शहरातील पटेल चौक परिसरातील मे. कादर भाई सन्स या व्यावसायिक प्रतिष्ठानावर धडक कारवाई करत तब्बल २ लाख १० हजार ८८० रुपयांचे १,३१८ किलो रिफाइंड सोयाबीन खाद्यतेल जप्त केले. प्राथमिक तपासणीत हे तेल नेपाळवरून आयात करण्यात आल्याचे समोर आले असून, टिन अस्वच्छ व गंजलेले असल्याने तेलाच्या शुद्धतेबाबत शंका निर्माण झाल्याने संपूर्ण साठा जप्त करण्यात आला.

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर अन्नभेसळ व निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांविरोधात कारवायांची मोहीम अधिक तीव्र केली आहे. त्याचाच भाग म्हणून मंगळवारी अन्न सुरक्षा अधिकारी रविराज धाबर्डे यांच्या नेतृत्वाखाली पटेल चौकातील मे. कादर भाई सन्स या प्रतिष्ठानाची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान 'सुपर सूर्या' ब्रँडचे १५ किलो क्षमतेचे ८८ टिन विक्रीसाठी ठेवलेले आढळले. पाहणीदरम्यान अनेक टिन गंजलेले व अस्वच्छ असल्याचे निदर्शनास आले. तसेच हे तेल नेपाळमधून आयात करण्यात आले असून बाजारभावापेक्षा कमी दरात विक्रीसाठी उपलब्ध असल्याने अधिकाऱ्यांना त्याच्या गुणवत्तेबाबत संशय आला. त्यामुळे अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार तेलाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आणि उर्वरित संपूर्ण साठा जप्त करण्यात आला.

एफडीएच्या या कारवाईमुळे शहरातील खाद्यतेल विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, निकृष्ट अथवा संशयास्पद अन्नपदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात विभागाची मोहीम अधिक तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.

### प्रयोगशाळेच्या अहवालानंतर होणार अंतिम कारवाई

जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित तेलाचा दर्जा निश्चित होईल. अहवालात त्रुटी आढळल्यास अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार संबंधित व्यावसायिकाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

पटेल चौकातील व्यावसायिक प्रतिष्ठानातून २.१० लाखांचे खाद्यतेल जप्त करण्यात आले आहे. तेलाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. अन्नपदार्थांच्या शुद्धतेबाबत नागरिकांना शंका असल्यास त्यांनी तातडीने एफडीएला किंवा ऑनलाइन पोर्टलवर तक्रार करावीवर

**प्रफुल्ल टोपले,** सहायक आयुक्त (अन्न), एफडीए, वर्धा

## सेलू बस स्थानकात शिवसैनिकांचे आक्रमक आंदोलन; चालक निलंबित

**सेलू जनमाध्यम :** विद्यार्थ्यांशी कथित गैरवर्तन करणाऱ्या एसटी चालकाच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिवसैनिकांनी बुधवारी सेलू बस स्थानकात आक्रमक आंदोलन केले.

आंदोलनादरम्यान संतप्त कार्यकर्त्यांनी काही बस कर्मचाऱ्यांना स्थानकातील खोलीत डांबून बाहेरून कुलूप ठोकल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला. तालुका प्रमुख अमर गुंदी व माजी उपनगराध्यक्ष चुडामण हांडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात संबंधित चालकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनाची तीव्रता वाढत असल्याचे पाहून वर्धा आगार प्रमुख सूरज बोबडे यांनी सेलू बस स्थानकात धाव घेत आंदोलकांशी चर्चा केली. घडलेल्या प्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त करत संबंधित चालकावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर प्रशासनाने चालकाच्या निलंबनासह



आंदोलकांच्या प्रमुख मागण्या लेखी स्वरूपात मान्य केल्या. बस स्थानकात बसेस न आणणाऱ्या चालकांवर शिस्तभंगाची कारवाई करणे आणि बायपास मार्गावर सकाळपासून कर्मचारी नियुक्त करण्याचेही लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर सुमारे दोन तासांनी खोलीत बंद करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची सुटका करण्यात आली. आठ दिवसांत दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसैनिकांनी प्रशासनाला दिला आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

### फ्लॉटसाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी; पार्डी येथील विवाहितेची लाडखेड पोलिसांत धाव

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** हुंड्यासाठी सतत मानसिक व शारीरिक छळ करून माहेरहून प्लॉट खरेदीसाठी पैसे आणण्याचा तगादा लावल्याप्रकरणी पती, सासू, सासरे आणि दोन नणंदांविरुद्ध लाडखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित विवाहित महिला ही वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घा.) तालुक्यातील पार्डी येथील माहेर असलेली असून हा प्रकार दारव्हा तालुक्यात उघडकीस आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विवाहानंतर आरोपींनी विवाहितेकडे वारंवार अधिक हुंड्याची मागणी केली. त्यास नकार दिल्यानंतर तिला मानसिक व शारीरिक त्रास देण्यात आला. आरोपींकडून वारंवार शिवीगाळ करण्यात येत होती. तसेच पती दररोज मद्यप्राशन करून मारहाण करत असल्याचा आरोप पीडितेने आपल्या तक्रारीत केला आहे. याशिवाय माहेरहून प्लॉट खरेदीसाठी पैसे आणावेत, यासाठी सातत्याने दबाव टाकण्यात येत असल्याचेही तिने पोलिसांना सांगितले.



सततच्या छळाला कंटाळून अखेर विवाहितेने लाडखेड पोलिस ठाणे गाठून संपूर्ण प्रकाराची तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पती प्रितमकुमार तायडे (३५), सासू वनिता तायडे (६६), सासरे परसराम तायडे (७०), नणंद साक्षी तायडे (२४) व प्रियंका तायडे (३३), सर्व रा. लाडखेड, ता. दारव्हा, जि. यवतमाळ, यांच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लाडखेड पोलिस करीत आहेत.

## इन्स्टाग्रामवरील वादातून विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला

### चाकूने वार करून अपहरणाचा प्रयत्न; नागपूरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** इन्स्टाग्रामवरील थट्टा-मस्करीतून सुरू झालेला वाद १६ वर्षीय विद्यार्थ्याच्या जीवावर बेतल्याची धक्कादायक घटना वर्ध्यात उघडकीस आली आहे. नागपूरहून आलेल्या सहा जणांनी विद्यार्थ्याला आर्वी नाका परिसरात बोलावून त्याच्यावर चाकूने हल्ला केला. त्यानंतर जबरदस्तीने चारचाकी वाहनात कोंबून अपहरण करत नागपूरला नेण्याचा प्रयत्न केला. वाटेत बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. मात्र, विद्यार्थ्याने आरडाओरड केल्याने आरोपींनी त्याला जखमी अवस्थेत रस्त्यावर फेकून पलायन केले. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध अपहरण, जीवे मारण्याचा प्रयत्न व अन्य गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.



जखमी अलंकार राऊत (१६) हा पवनार येथील रहिवासी असून वर्ध्यातील एका नामांकित शाळेत इयत्ता दहावीत शिक्षण घेत आहे. आरोपींमध्ये फैजान शेख, लाला खान आणि अन्य चार जणांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अलंकारचा मित्र हर्ष तिवाडे याने इन्स्टाग्रामवर थट्टेच्या स्वरूपात फैजान शेखचा फोटो पाठवून 'तो तुझ्यापेक्षा स्मार्ट आहे, असा संदेश पाठविला होता. त्यावर अलंकारने आपल्या दुचाकीचा फोटो पाठवत प्रत्युत्तर दिले. हा संदेश फैजानपर्यंत पोहोचल्याने त्याने अलंकारला फोन करून जाब विचारला. दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि काही दिवसांपासून हा वाद सुरू होता.

मंगळवारी रात्री फैजान आपल्या साथीदारांसह वर्ध्यात आला. त्याने अलंकारला भेटण्यासाठी बोलावले. आर्वी नाका येथे पोहोचताच आरोपींनी त्याच्यावर चाकूने वार केले आणि बेदम मारहाण केली. त्यानंतर त्याला कारमध्ये कोंबून डेहनकर ले-आऊटमार्गे यवतमाळ-नागपूर महामार्गावर नेण्यात आले. वाहनातही मारहाण सुरूच होती. तुला नागपूरला नेऊन संपवतो, अशी धमकी आरोपींनी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

जुनापाणी चौकाजवळ अलंकारने मोठ्याने आरडाओरड केल्याने आरोपींनी वाहनाचा वेग कमी करून त्याला रस्त्यावर फेकून दिले आणि पसार झाले. जखमी अवस्थेत अलंकारने आपल्या आत्येभाऊ अविष्कार देशमुख यांना फोन करून मदत मागितली. त्यांनी घटनास्थळी धाव घेत त्याला रामनगर पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## यादे रफी सुरसंगमचा ओम कराळे ठरला विजेता

### साहित्य कला शोधक मंच, पूजा शेंद्रे द्वितीय, तर विशिधा वाटकर तृतीय

**वर्धा जनमाध्यम :** महान गायक मोहम्मद रफी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साहित्य कलाशोधक मंचातर्फे आयोजित विदर्भस्तरीय फिल्मी गीत गायन स्पर्धा 'यादे रफी सुरसंगम' यंदाही दर्जेदार सादरीकरणामुळे रंगली. या स्पर्धेत अंजनगाव सुर्जी येथील ओम कराळे याने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळविले. सलग ४० वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत विदर्भातील अनेक होतकरू गायक-गायिकांनी सहभाग घेतला.



यवतमाळच्या अंध गायिका पूजा शेंद्रे हिने आपल्या सुरेल गायकीने परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांक मिळविला, तर वर्ध्यातील विशिधा वाटकर हिला तृतीय क्रमांक मिळाला. नागपूरच्या संवादिनी चहांदे व लाजरी भुरे यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक पटकावला. तसेच वैष्णवी निंबुळकर, तनुश्री सावरकर, हेमंत भिसे, अमोल भोगे, वेदा रोडे, प्रणाली डंभारे, अमित कावळे, समीक्षा मेश्राम व पूजा पोटे यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाला खासदार अमर काळे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी त्यांनी युवकांनी अपयशाने खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि सातत्याने पुढे वाटचाल करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल होते.

स्पर्धेचे आयोजन साहित्य कलाशोधक मंचाचे अध्यक्ष सुनील बुरांडे, कार्याध्यक्ष दिलीप मेने, उपाध्यक्ष गिरीश सावळकर, सचिव प्रभाकर उगेमुगे, कोषाध्यक्ष प्रशांत चवडे आणि सहकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रभाकर उगेमुगे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रशांत चवडे यांनी केले.

## तळेगाव येथे ८ ऑगस्टला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

### महसूलमंत्री व पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी दि.८ ऑगस्ट रोजी आर्वी विधानसभा क्षेत्रात आष्टी तालुक्यातील पी.आर. पाटील कॉलेज, तळेगाव (श्यामजीपंत) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, आमदार सुमित वानखेडे आणि जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.





या शिबिरास खासदार अमर काळे, आ.अभिजीत वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.अरुण लखानी, आ.समीर कुणावार, आ. राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे यांची प्रामुख्याने उपस्थिती असणार आहे. शिबिरामध्ये महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्रांचे वितरण, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, जिवंत सातबारा मोहिम, सिंदी विस्थापितांसाठी विशेष अभय योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनांशी संबंधित सुविधा, कुंभार समाजासाठी पारंपरिक व्यवसाय सवलती तसेच कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफीसह विविध महसूल सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

शिबिरात विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभही नागरिकांना एकाच ठिकाणी मिळणार आहे.

## वर्ध्यात 'सूर्यघर'ची हरित क्रांती

### १९ हजारांहून अधिक ग्राहकांच्या खात्यात १५३.१४ कोटींचे अनुदान

**वर्धा जनमाध्यम :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पंतप्रधान सूर्यघर–मोफत वीज योजना' अंतर्गत वर्धा जिल्ह्याने सौर ऊर्जा निर्मितीत उल्लेखनीय कामगिरी करत हरित ऊर्जेच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २१ हजार ७८३ ग्राहकांनी आपल्या घरांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले असून, त्यांची एकूण स्थापित क्षमता ७८.४४ मेगावॅट इतकी झाली आहे.



या योजनेचा सर्वसामान्यांना मोठा आर्थिक लाभही मिळत आहे. १९ हजार ८५६ ग्राहकांच्या बँक खात्यात थेट १५३.१४ कोटी रुपयांचे अनुदान जमा करण्यात आले आहे. तर २१ हजार १०५ ग्राहक एकूण १६२.८० कोटी रुपयांच्या अनुदानासाठी पात्र ठरले असून उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यातही निधी जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे वीज बिलात मोठी बचत होत असल्याने जिल्ह्यात या योजनेबाबत नागरिकांचा प्रतिसाद सातत्याने वाढत आहे. पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना देतानाच घरगुती अर्थसंकल्पावरील वीज बिलाचा भार कमी करण्यासाठी ही योजना प्रभावी ठरत असल्याचे चित्र आहे.

### ३ ते ४ वर्षांत गुंतवणूक वसूल

महावितरणच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या योजनेत १ किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये, तर ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.

सौर प्रकल्पासाठी केलेली प्रारंभिक गुंतवणूक अवघ्या ३ ते ४ वर्षांत वीज बिलातील बचतीतून भरून निघते. त्यानंतर पुढील २० ते २५ वर्षे ग्राहकांना अत्यल्प खर्चात किंवा जवळपास मोफत वीज उपलब्ध होते.

वर्धा जिल्ह्याच्या ग्रामीण आणि दुर्गम भागाच्या विकासासाठी कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीतून मोठ्या उद्योगांनी पुढे येणे आवश्यक आहे. मागास व दुर्गम गावांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन दिल्यास हरित ऊर्जा चळवळीला अधिक बळ मिळेल.

**-स्मिता पारखी,** अधीक्षक अभियंता, महावितरण, वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# लाल समुद्रात क्षेपणास्त्र हल्ल्यात भारतीय जहाज बुडाले; १३ भारतीय सुखरूप तर एक मृत्यूमुखी




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लाल समुद्रात येमेच्या पश्चिम किना-याजवळ क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर भारतीय मालवाहू जहाज बुडाले आहे. या जहाजावर १३ भारतीय आणि एक येमेनी नागरिक होता. या घटनेनंतर येमेनी लष्कराने सर्व १४ खलाशांची सुखरूप सुटका केली असून त्यांना वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. मंगळवारी ही घटना घडली. एमएसव्ही फैज नूरे औलिया असे या जहाजाचे नाव आहे.

**येमेच्या पश्चिम किना-याजवळ क्षेपणास्त्र हल्ला-** समोर आलेल्या माहितीनुसार, हुदैदह या बंदर शहराच्या दक्षिणेस सुमारे १३ नाटिकल अंतरावर या जहाजावर हल्ला झाला. हे बंदर हुतींच्या ताब्यात आहे. येमेनी नॅशनल रेझिस्टन्स फोर्सच्या गार्ड्स ऑफ रिपब्लिकने याबाबतचे निवेदन जारी केले आहे. क्षेपणास्त्र हल्ला झाल्यानंतर तटरक्षक दल आणि नौदल युनिट्सने खलाशांच्या सुटकेसाठी संयुक्त मोहीम राबवली. दरम्यान, मालवाहू जहाजावर झालेल्या या हल्ल्याचा भारताने तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

**केंद्रीय बंदर आणि जलमार्ग मंत्री सोनोवाल यांच्याकडून निषेध**

केंद्रीय बंदर आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी हल्ल्याचा निषेध करणारी एक पोस्ट एक्स या सोशल मीडिया हँडलवर लिहली आहे. क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे भारतीय जहाज बुडाले. भारतीय खलाशांच्या सुरक्षेसाठी आणि बचावलेल्या कर्मचा-यांना आवश्यक मदत पुरवण्यासाठी सर्व तातडीने पावले उचलण्याचे निर्देश डायरेक्टर जनरल मॅरिटाईम एडमिनिस्ट्रेशनला दिले आहेत, असे सोनोवाल यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. या हल्ल्याचा भारत तीव्र निषेध करतो. आमच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. सर्व १४ खलाशांची येमेनी तटरक्षक दलाने सुखरूप सुटका केली असून त्यांना मोखा बंदरात आणले आहे, असे सोनोवाल पुढे म्हणाले.

**परराष्ट्र मंत्रालयानेही जारी केले निवेदन-**भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने देखील याबाबतचे निवेदन जारी केले आहे. रियाधमधील भारतीय दूतावास या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे आणि खलाशांच्या सुरक्षिततेसाठी येमेनी प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधत आहे. भारतीय जहाजांवरील हल्ला चिंतेची बाब असल्याचे म्हणत व्यापारी जहाजांना लक्ष्य करणे थांबवण्याचे आवाहन भारताने केले आहे. इराण-समर्थित हुती बंडखोरांनी सौदी अरेबियाविरोधात नौदल नाकेबंदीची घोषणा केली आहे. यामुळे अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## गॅस सिलिंडरवर अतिरिक्त कर!

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला. अशातच आता आगामी काळात भारतातील एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. एका आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार केंद्र सरकार जवळपास ३.९९ लाख कोटी रुपये उभारण्याच्या योजनेवर विचार करत आहे. यासाठी



एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणा-या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समोर आले आहे. मात्र याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणा-या ग्राहकांवर अतिरिक्त शुल्क लादून सुमारे ४२ अब्ज डालर उभारण्याचा प्रस्ताव आहे. इराणमधील संघर्षामुळे भारतासमोर निर्माण झालेल्या उर्जा सुरक्षेच्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव पुढे आला असल्याचे सांगितले जात आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास भारताचा इंधन साठा कार्यक्रम केवळ कच्च्या तेलापुरता मर्यादित न राहता एलपीजी आणि एलएनजीपर्यंत विस्तारला जाण्याची शक्यता आहे.समोर आलेल्या अहवालानुसार इंधन साठवणूक कार्यक्रमावर पुढील १० वर्षांत सुमारे ४२ अब्ज डालर खर्च होण्याचा अंदाज आहे. यातील निम्म्याहून अधिक निधी इंधन साठवणूक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी खर्च केला जाईल तर उर्वरित रक्कम इंधनाचा साठा तयार करण्यासाठी वापरली जाणार असल्याची माहिती समोर आली. एलपीजीवर प्रतिकिलो १.२९ रुपये शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे घरगुती १४.२ किलोच्या सिलिंडरच्या किमतीत सुमारे १८ रुपयांची वाढ होउ शकते. त्याचप्रमाणे नैसर्गिक वायूवर प्रति स्टँडर्ड घनमीटर १.४३ रुपये शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. त्यातून दरवर्षी सुमारे १ अब्ज डालर महसूल मिळू शकतो.

## सावजी वादावर तुकाराम मुंढे म्हणाले, माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही



**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईः अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख तुकाराम मुंढे सध्या राज्यभर धडक कारवाई करत आहेत, ज्यामध्ये एनालाग पनीरवर (कृत्रिम पनीर) बंदी घालण्याचाही समावेश आहे. आज एका पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती देताना त्यांनी सांगितले की, ही बंदी एका वर्षासाठी लागू राहील. अमरावती येथील एका कार्यक्रमात नागपूरच्या प्रसिद्ध सावजी ) खाद्यपदार्थांबद्दल केलेल्या विधानामुळे निर्माण झालेल्या वादावरही त्यांनी ठाम भूमिका मांडली. मुंढे यांनी स्पष्ट केले की, माझे वक्तव्य नीट ऐका, ते व्यक्तिगत होते. त्यामुळे, माझ्या वक्तव्यावर माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. आरोग्याशी संबंधित एका कार्यक्रमात मुंडे यांनी टिप्पणी केली होती की, जर त्यांनी सावजी जेवण केले, तर त्यांना महिनाभर रुग्णालयात दाखल व्हावे लागेल. या विधानाला नागपूरमधील सावजी रेस्टारंट चालकांकडून विरोध झाला आणि त्यांनी मुंढे यांना अस्सल सावजी पदार्थांची चव घेण्यासाठी आपल्या घरी आमंत्रित केले. तसेच, सावजी हा केवळ एक खाद्यपदार्थ नसून ती एक सांस्कृतिक परंपरा आहे, असे म्हणत हल्बा समाजातील उद्योजकांनी त्यांच्याकडे माफीची मागणी केली होती. आता मुंढे यांनी या मुद्द्यावरही भाष्य केले आहे. माझे विधान पुन्हा एकदा ऐका. मी म्हणालो होतो की, ।मी। ते खाल्ले तर महिनाभर आजारी पडेन, दुसरे आजारी पडतील असे म्हटलेलं नाही. कुणी खा किंवा नका खाउ असे म्हटले नाही, असे स्पष्टीकरण तुकाराम मुंढेंनी दिले. २००८-०९ मध्ये एका मित्राने मला सोबत नेले होते, ते पाहताच तो पदार्थ अतिशय लाल रंगाचा वाटला. मी फक्त एक घास घेतला आणि उठलो, कारण तो मला खूप तेलकट आणि तिखट वाटला. मात्र, मी कुणालाही खाउ नये असे म्हटले नाही, असा किस्साही तुकाराम मुंढेंनी सांगितला. माझे वक्तव्य वैयक्तिक होते, कोणी खावे आणि कोणी खाउ नये याबद्दल मी काही म्हटले नाही. त्यामुळे, माझ्या वक्तव्यावर माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. असे म्हणत तुकाराम मुंढे यांनी माफी मागण्यास नकार दिला.

## स्पेसएक्सचे 4000 किलो वजनी रॉकेट चंद्रावर आदळले

### 8,690 किमी प्रतितास वेगाने अवकाशात फिरत होते

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**एलॉन मस्कच्या स्पेसएक्स कंपनीचे एक अनियंत्रित रॉकेट चंद्राच्या पृष्ठभागावर आदळले आहे. ४ हजार किलो वजनाचे आणि सुमारे ५ मजली इमारतीएवढे मोठे हे राकेट सुमारे ८,६९० किमी/तास वेगाने आदळले. नासाने सांगितले की, या धडकेमुळे पृथ्वीला कोणताही धोका नाही. मात्र, या धडकेची पुष्टी छायाचित्रे आल्यानंतर होईल. हा अनियंत्रित तुकडा स्पेसएक्सच्या फाल्कन ९ राकेटचा वरचा भाग आहे. जानेवारी २०२५ मध्ये फलोरिडामधून अमेरिका आणि जपानचे दोन लूनार लँडर अंतराळात पाठवण्यासाठी ते प्रक्षेपित करण्यात आले होते. मोहीम पूर्ण झाल्यानंतर राकेटचा हा भाग अंतराळात तरंगत राहिला. गेल्या १८ महिन्यांत पृथ्वी, चंद्र आणि सूर्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे त्याचा मार्ग हळूहळू बदलला. खगोलशास्त्रज्ञांनी डेटाचा अभ्यास करून आधीच अंदाज लावला होता की हे राकेट भरकटून थेट चंद्राकडे जात आहे आणि त्याला धडकेल. १५ जानेवारी २०२५ रोजी फलोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरच्या लान्च सेंटर ३९ऋमधून 'ब्लू घोस्ट' आणि 'हकुटो-आर' घेउन स्पेसएक्सच्या फाल्कन ९ राकेटने उड्डाण केले होते.

**आइन्स्टाईन क्रेटरजवळ टक्कर झाली, दुर्बिणीतूनही पाहणे कठीण-** ही टक्कर चंद्रावरील 'आइन्स्टाईन क्रेटर'जवळ झाली.



हा भाग चंद्राच्या अशा ठिकाणी आहे जिथे दिवसाचा प्रकाश असतो आणि जो पृथ्वीवरून दिसतो. मात्र, वैज्ञानिकांनुसार, सामान्य दुर्बिणीतून हे पाहणे अशक्य होते, कारण टक्कर झाल्यावर निर्माण झालेला प्रकाश खूपच मंद होता. केंब्रिज विद्यापीठातील खगोलशास्त्रज्ञ डा. मॅट बोथवेल यांचे म्हणणे आहे की, धडकेमुळे चंद्राच्या धुळीचा एक मोठा ढग वर उडाला असेल, जो १०० किलोमीटरपर्यंत वर गेला असेल आणि अनेक मिनिटे टिकला असेल. सध्या, जेव्हा ही घटना घडली, तेव्हा चंद्राभोवती फिरणारे कोणतेही अंतराळयान योग्य स्थितीत नव्हते, त्यामुळे थेट चित्रे मिळू शकली नाहीत. दक्षिण कोरियाचे 'दानुरी' ऑर्बिटर आणि नासाचे 'लूनार रिकोनिसन्स ऑर्बिटर' येत्या काही दिवसांत धडकेच्या ठिकाणावरून जातील आणि चित्रे घेतील. वैज्ञानिक जुन्या आणि नवीन चित्रांची तुलना करून चंद्राच्या पृष्ठभागावर तयार झालेल्या नवीन खुणा ओळखतील.

**चंद्रावर आधीपासूनच १९० टन कचरा आहे-**या धडकेनंतर चंद्रावर मानवाद्वारे सोडलेल्या किंवा अपघातग्रस्त झालेल्या वस्तूंची संख्या वाढून सुमारे ३,००० झाली आहे. त्यांचे एकूण वजन सुमारे १९० टन झाले आहे. सप्टेंबर १९५९ मध्ये सोव्हिएत युनियनचे 'लूना २' चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचणारी पहिली मानवनिर्मित वस्तू होती. याव्यतिरिक्त, नासाच्या केवळ अपोलो कार्यक्रमाशी संबंधित ७९६ वस्तू चंद्रावर उपस्थित आहेत. चंद्रावर कोणतेही वातावरण किंवा पर्यावरण नाही, त्यामुळे या कचऱ्यामुळे तेथील कोणत्याही परिसंस्थेला नुकसान होत नाही. तथापि, भविष्यात वाढत्या चंद्र वाहतुकीमुळे ऐतिहासिक अपोलो लँडिंग साइट्सना नुकसान होउ नये आणि नवीन अंतराळयानांच्या धडकेचा धोका वाढू नये, अशी वैज्ञानिकांना चिंता आहे.सायन्स म्युझियमच्या स्पेस हेड लिब्बी जॅक्सन यांच्या मते, हा वैज्ञानिकांसाठी एक अतिशय रोमांचक प्रयोग आहे कारण राकेटचा वेग, वजन आणि आकाराचा डेटा आधीपासूनच उपलब्ध होता. सामान्यतः जेव्हा एखादा नैसर्गिक उल्कापिंड चंद्रावर आदळतो, तेव्हा वैज्ञानिकांकडे त्याचा प्रारंभिक डेटा नसतो. या धडकेमुळे तयार झालेले नवीन खड्डे आणि उडालेल्या धुळीच्या थराचा अभ्यास करून वैज्ञानिक हे समजू शकतील की अब्जावधी वर्षांपूर्वी चंद्र आणि आपल्या सौरमंडळाची निर्मिती कशी झाली होती. स्पेसएक्सच्या फाल्कन ९ राकेटचा खालचा भाग पुन्हा वापरण्याजोगा असतो. याला बूस्टर म्हणतात आणि ते लँडिंग करून पृथ्वीवर परत येते. ज्या जानेवारी २०२५ च्या मिशनचा वरचा भाग भरकटून चंद्रावर आदळला, त्याच राकेटच्या खालच्या बूस्टरला १० ऑगस्ट रोजी १८व्यांदा प्रक्षेपित केले जाईल.

## मार्क झकरबर्ग यांनी मागितली माफी

**नवी दिल्ली :** पैशांसाठी कंटेंट प्रमोट केल्याची चूक मेटाने कबूल केली असून बाल लैंगिक शोषण सामग्री, डीपफेक आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हीडीओ हटवण्यासह गंभीर चुकांवर फेसबुक आणि इन्स्टाग्रामची मालक कंपनी असलेल्या मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झकरबर्ग यांनी भारत सरकारची माफी मागितली आहे. केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि मेटाचे चीफ ग्लोबल अफेयर्स ऑफिसर जोएल कॅप्लन यांच्यासह इतर वरिष्ठ अधिका-यांमध्ये पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत मेटाच्या अधिका-यांनी सरकारने घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर झुकरबर्ग यांच्या वतीने खेद व्यक्त केला.बैठकीत केंद्र सरकारने मेटाच्या अधिका-यांना स्पष्ट शब्दांत खडसावले की, भारत सरकार डिजिटल प्लॅटफार्मची मनमानी अजिबात सहन करणार नाही. मेटा ही केवळ एक मध्यस्थ राहिलेली नसून त्यांचा अल्गोरिदम युजर्सना कोणता आशय दाखवायचा हे ठरवतो. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत सोशल मीडिया कंपन्यांना मिळणा-या सेफ हार्बरच्या कायदेशीर संरक्षणाचा लाभ मेटाला मिळणार नाही, असा स्पष्ट इशारा सरकारने दिला होता.

## वक्फ नोंदी प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी विशेष बेंच

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात ज्या प्रकरणांमध्ये मूळ मालकांच्या किंवा खाजगी मालकीच्या जमिनींवर वक्फ बोर्डाच्या नोंदी झाल्याबाबत वाद निर्माण झाले आहेत, अशा प्रकरणांची वस्तुस्थिती तपासून त्यांच्या लवकर निकालासाठी राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांच्या सदस्यतेखाली विशेष बेंच स्थापन करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. बेकायदेशीर नोंदी आढळल्यास त्या कायद्यानुसार तातडीने कमी करून पुढील कार्यवाही करण्याचेही निर्देश त्यांनी दिले. नाशिक जिल्ह्यातील कळवण-सुरगाणा मतदारसंघातील मौजे दरेभणगी येथील आदिवासी शेतक-यांच्या जमिनीवर झालेल्या वक्फ बोर्डाच्या नोंदीच्या प्रकरणाचा आढावा मंत्री बावनकुळे यांनी घेतला. बैठकीस आमदार नितीन पवार उपस्थित होते, तर नाशिकचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. संबंधित प्रकरणाची वस्तुस्थिती तातडीने तपासून बेकायदेशीर नोंदी असल्यास त्या कमी करण्याची आणि कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले. अशा स्वरूपाची प्रकरणे केवळ नाशिकपुरती मर्यादित नसून राज्यातील इतर भागातही आढळून येत असल्याने त्यांचा वेळेत आणि एकसमान पद्धतीने निपटारा व्हावा, यासाठी विशेष बेंच स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत आकांक्षित तालुका असलेल्या सुरगाणा येथे महसूल प्रशासकीय इमारत उभारण्यास मंजुरी देउन आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी संबंधित विभागाने प्रस्ताव तातडीने सादर करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

## मुंबईचे नगरपाल कार्यालयातील बेलिफ-लिपिक परीक्षा 6 सप्टेंबरला

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मुंबईचे नगरपाल (शेरीफ) कार्यालयातील बेलिफ-लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा २०२६ रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. ही परीक्षा अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई आणि पुणे या जिल्हा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. परीक्षेचा पेपर एक सकाळी ११ ते दुपारी १२ आणि पेपर दोन दुपारी ३ ते ४ या वेळेत होणार आहेत. अभ्यासक्रम व निवड प्रक्रियेचा तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील. जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या उमेदवारांना स्थायी किंवा कायमस्वरूपी निवासाच्या तपशीलानुसार जिल्हा केंद्र उपलब्ध करून दिले जाणार असून, परीक्षेच्या सात दिवस आधी प्रवेश प्रमाणपत्र ऑनलाइन अर्ज प्रणालीतील उमेदवारांच्या प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, १५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या मूळ जाहिरातीतील व ३० जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकातील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

## राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. उमेदवारांच्या मागणीचा विचार करून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत, तर ऑनलाइन परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत १३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. या परीक्षेद्वारे एकूण ५,७०७ पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकानुसार विविध मागण्यांचा समावेश करून पदसंख्या वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नसून, त्यांनी 'My Account' या पर्यायातून संबंधित माहिती अद्ययावत करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी नियुक्तीपूर्वी करण्यात येणार असून, पात्रता सिद्ध न झाल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल, असेही आयोगाने जाहिरातीत नमूद केले आहे. याबाबतचे शुद्धीपत्रक महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

## लखपती दीदी अभियानाच्या वाढीव लक्षांकपूर्तीसाठी बचतगटांच्या व्यापक सहभागावर भर द्यावा

### ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई, दि. ५ :** स्वयं सहाय्यता गटांमधील गरीब व गरजू महिलांना विविध उपजीविका उपक्रम, कौशल्य विकास, आर्थिक सक्षमीकरण आणि बाजारपेठेच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना लखपती दीदी बनविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. राज्यात एक कोटी लखपती दीदी निर्माण करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी बचतगटांच्या व्यापक सहभागावर भर देण्यात यावा, अशा सूचना ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या. लखपती दीदी अभियानाच्या वाढीव लक्षांकाबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत ग्राम विकास मंत्री गोरे यांनी यंत्रणांना सूचित केले. बैठकीस ग्राम विकास सचिव डा. चंद्रकांत पुलकुंडवार, उमेद' अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. ग्राम विकास मंत्री गोरे यांनी सांगितले की, महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि ग्रामीण भागातील कुटुंबांचे उत्पन्न वाढविण्यासाठी लखपती दीदी अभियान निश्चितच उपयोगी ठरणार आहे. त्यादृष्टीने याची अधिक व्यापक आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे. जिल्हानिहाय प्रगतीचा आढावा, महिला बचत गटांचे बळकटीकरण, नवीन महिलांचा समावेश, डिजिटल आजीविका नोंदणी, कौशल्य प्रशिक्षण तसेच उत्पन्नवाढीच्या विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मंत्री गोरे यांनी संबंधितांना सूचना दिल्या. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत महिला बचत गट नोंदणी मोहीम व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान राबविण्याचा शासन निर्णय १७ जुलै २०२६ रोजी जारी केला आहे. २०२६ ते २०२९ या कालावधीत हे अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

## अमेरिकेत साजरा होणार 'भारत दिन' सोहळा

**न्यूयॉर्क :** भारताच्या स्वातंर्त्यदिनाचा यंदा अमेरिकेत विशेष गौरव होणार असून मॅसॅच्युसेट्सच्या गव्हर्नर मौरा हिली यांनी १५ ऑगस्ट २०२६ हा दिवस भारत दिन म्हणून घोषित केला आहे. या घोषणेद्वारे मॅसॅच्युसेट्समधील भारतीय-अमेरिकन समुदायाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि नागरी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला आहे. गव्हर्नर हिली यांनी १ ऑगस्टला जारी केलेल्या घोषणेत भारतीय समुदायाच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. स्वातंर्त्यदिनाच्या कार्यक्रमांसोबतच समाजसेवा, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि नागरी सहभाग



वाढवण्यासाठी विविध भारतीय संस्था आणि कार्यकर्ते करत असलेल्या कामाचेही त्यांनी कौतुक केले. मॅसॅच्युसेट्सची राजधानी बोस्टनमध्येही महापौर मिशेल वू यांनी १५ ऑगस्ट हा दिवस भारत दिन म्हणून घोषित केला आहे. बोस्टनमध्ये भारतीय समुदायाच्या वाढत्या प्रभावाची दखल घेत ही घोषणा करण्यात आली आहे. बोस्टन शहराने यापूर्वीही भारताच्या स्वातंर्त्यदिनाची अधिकृत दखल घेतली आहे. असे वृत्त पीटीआयने दिले आहे. भारत-अमेरिका संबंधांच्या पार्श्वभूमीवर बोस्टनमध्ये यंदा आणखी एक महत्त्वाचा भारतीय संदर्भ पाहायला मिळाला. अमेरिकेच्या २५० व्या स्वातंर्त्यवर्षानिमित्त आयोजित सेल बोस्टन २५० मध्ये भारतीय नौदलाचे प्रशिक्षण जहाज आयएनएस सुदर्शिनी सहभागी झाले होते. या जहाजाने बोस्टन हार्बरमध्ये भारतीय तिरंगा फडकवत परेड ऑफ सेल्स मध्ये सहभाग घेतला. १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या स्वातंर्त्याला ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. १९४७ मध्ये ब्रिटिश वसाहतवादी राजवटीतून भारत स्वतंत्र झाला. या ऐतिहासिक दिवसाने जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या प्रवासाची पायाभरणी केली, असे मॅसॅच्युसेट्सच्या घोषणेत नमूद करण्यात आले आहे. घोषणेत भारताच्या सांस्कृतिक विविधतेचाही विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

**भारतीय संस्कृतीचे जगभरात दर्शन होणार-**विविध धर्म, भाषा, परंपरा, रीतिरिवाज, खाद्यसंस्कृती आणि जीवनशैली असूनही भारताने एकात्मता टिकवून ठेवली आहे. ही विविधतेतील एकता भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीचा भाग असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मॅसॅच्युसेट्समधील भारत-अमेरिकन समुदायाने वैद्यकशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, व्यवसाय आणि जनसेवा अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या योगदानामुळे राज्याचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवन अधिक समृद्ध झाले असल्याचे गव्हर्नर हिली यांच्या घोषणेत म्हटले आहे.





## विधान सभा अध्यक्षांनी केली विद्यार्थी व शेतकरी यांच्या समवेत भात लागवड

विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी शिक्षण प्रसारक मंडळ, मालाड संचलित उत्कर्ष मंदिर विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शेतक-यांसमवेत प्रत्यक्ष शेतात भात लागवडीत सहभाग नोंदविला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शेतीविषयी प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेण्याचे महत्व विशद केले, तर शेतक-यांशी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि शाश्वत शेतीबाबत चर्चा करत कृषी क्षेत्रातील संशोधन आणि प्रत्यक्ष शेतातील अनुभव यांची सांगड घालणे,ही काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले.

### राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे आपत्तीपासून सतर्कतेसाठी १६९८ अलर्ट जारी

## अतिवृष्टी व पुराच्या घटनांमध्ये नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात नैसर्गिक आपत्ती व दुर्घटनांमुळे झालेल्या घटनामुळे मानवी जीवितहानीपासून बचावासाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या माध्यमातून जानेवारी २०२६ पासून आत्तापर्यंत १६९८ अलर्ट पाठविण्यात आले. तसेच वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भातील २८५ अलर्ट जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची २३ पथके कार्यरत विभागामार्फत देण्यात आलेल्या माहितीनुसार हवामान खात्याकडून प्राप्त होणा-या पूर्वसूचना आणि रिअल-टाईम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला तात्काळ सूचना देण्यात आल्या तसेच नागरिकांना सतर्क करण्यासाठी इशारे देण्यात आले. राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीचा सामना करताना नागरिकांचा जीवित हानीपासून बचाव करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांची एकूण २३ पथके विविध संवेदनशील जिल्ह्यांमध्ये तैनात करण्यात आली आहेत. यामध्ये एनडीआरएफ १७ आणि ६ पथकांचा समावेश असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित बचाव व मदतकार्य करता आले आहे.

सर्वाधिक ४ एनडीआरएफ पथके मुंबईत तैनात करण्यात आली आहेत. याशिवाय पालघरमध्ये १, नागपूरमध्ये २, पुणे (मुख्यालयासह) येथे २, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर येथे प्रत्येकी १ एनडीआरएफ पथक तैनात आहे.एसडीआरएफची ६ पथके अनुक्रमे धुळे (मुख्यालय) येथे २, नागपूर (मुख्यालय) येथे २, नांदेड येथे १ आणि गडचिरोली येथे १ तैनात करण्यात आली आहेत. शासनाने जिल्हा प्रशासन, आपत्ती प्रतिसाद दल आणि स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक सर्व उपाययोजना केल्या जात आहे.

**जून व जुलै महिन्यात ८४ जीवित हानी-**वीज पडणे, भिंत कोसळणे, झाड पडणे, पुराच्या पाण्यात वाहून जाणे आणि दरड कोसळणे या घटनांमध्ये जून व जुलै महिन्यात जीवितहानीच्या ८४ घटना घडल्या आहेत. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी व पुरापासून बचाव करताना विविध जिल्ह्यात बचाव व मदत कार्य करण्यात आले. यामुळे सरासरी पेक्षा जास्त पाउस होत असून देखील जीवित व पशुधनाची हानी कमी झाली आहे. जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत विविध दुर्घटनांमध्ये १३७ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५०५ पशुधनाचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पालघर, पुणे, ठाणे, रायगड, नागपूर, सिंधुदुर्ग गडचिरोली, भंडारा यासह विविध जिल्ह्यांतील पूरपरिस्थितीत एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी तातडीने बचावकार्य करून अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले.

**७ ऑगस्ट पर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम-**भारतीय हवामान विभागाच्या ७ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजानुसार राज्यातील विविध भागांत पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यांत सुरुवातीच्या दिवसांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यतासह पाउस तर मुंबई महानगर, कोकण घाट विभागात, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रातील पावसाची शक्यता असून नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे. वीजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी थांबावे आणि आवश्यक नसल्यास पूरप्रवण व धोकादायक भागात जाणे टाळावे. तसेच धरणांमधून होणा-या विसर्गाबाबत स्थानिक प्रशासनाकडून देण्यात येणारे इशारे याबाबत नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# संवादाची गरज

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील सुरू असलेले हल्ले थांबवण्याची तयारी दर्शवली असून, इराणशी पुढील वाटाघाटी सुरू करण्याची घोषणा केली आहे. अमेरिका आणि इराणच्या संघर्षामुळे जगाला युद्धाच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. असे म्हटले जाते की चौथे महायुद्ध होणार नाही, कारण तिसऱ्या महायुद्धातच मानवजातीचे मोठे नुकसान होईल. सध्याच्या परिस्थितीत या विधानाची गंभीरता जाणवते. इराणवरील हल्ले थांबवण्यामागे काही कारणे आहेत. पश्चिम आशियातील अनेक देशांनी अमेरिकेला संघर्ष थांबवण्याचे आवाहन केले आहे. सौदी अरेबियाचे नेते मोहम्मद बिन सलमान यांनीही दोन्ही बाजूंनी तणाव कमी करण्याची भूमिका मांडली आहे. तसेच अमेरिकेतील मोठा जनसमुदाय युद्धाच्या विरोधात असल्याने ट्रम्प यांच्यावर अंतर्गत दबाव आहे. अमेरिका आणि इराणमध्ये लवकरात लवकर शांतता करार व्हावा, यासाठी संवादाची संधी देण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न असल्याचे दिसते. इराणवरील हल्ले थांबवण्याच्या निर्णयामागे अनेक कारणे असल्याचे दिसते. सौदी अरेबिया, कतार आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या अमेरिकेच्या मित्रदेशांनी युद्ध थांबवण्याचा सल्ला दिला आहे. या संघर्षाचे प्रादेशिक परिणाम सर्वाधिक याच देशांना भोगावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अमेरिकेतील अंतर्गत दबावही ट्रम्प यांच्या निर्णयामागील महत्त्वाचा घटक मानला जातो. युद्धाला मोठ्या प्रमाणावर विरोध होत असल्याने ट्रम्प यांना हा निर्णय घ्यावा लागला असावा. मात्र, हा पूर्ण युद्धविराम नसून तात्पुरता निर्णय असल्याचे दिसते. ट्रम्प यांची प्रमुख मागणी म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी खुली ठेवणे, जेणेकरून जागतिक ऊर्जा पुरवठा सुरळीत राहील. इराणसोबत शांतता करार घडवून आणणे, आण्विक धोका कमी करणे आणि प्रादेशिक स्थैर्य निर्माण करणे, हे या निर्णयामागील उद्देश असू शकतात. अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील संबंध मजबूत असले तरी इराणविषयीच्या धोरणावर काही मतभेद निर्माण झाले आहेत. इस्रायलला इराणवर दबाव कायम ठेवायचा आहे, तर अमेरिकेला सध्या संघर्ष नियंत्रणात आणण्याची गरज वाटत आहे. युद्धामुळे जागतिक तेल बाजारावरही परिणाम झाला असून, भू-राजकीय तणावामुळे तेलाच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे शांततेचा मार्ग स्वीकारणे हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वाचे ठरत आहे.अमेरिकेतील जनमताचा विचार केला असता, वाढती आर्थिक चिंता आणि प्रादेशिक तणावामुळे सुमारे ६० टक्के नागरिकांचा युद्धाला विरोध असल्याचे दिसून येते. ट्रम्प यांच्यावर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढता दवाब असल्याने त्यांच्या भूमिकेत बदल झाल्याचे जाणवते. मात्र, संघर्षाचा धोका पूर्णपणे संपला आहे असे म्हणता येणार नाही. अमेरिकेने आखाती देशांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विमानसेवा विस्कळीत होणे, हवाई क्षेत्र बंद होणे किंवा प्रवासात अडथळे निर्माण होणे यांसारख्या संभाव्य परिस्थितींसाठी नागरिकांनी तयार राहावे, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे अमेरिका सध्या तात्पुरती माघार घेत असली तरी भविष्यात परिस्थिती पुन्हा चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही. ट्रम्प यांनी इराणसोवत होर्मुझची सामुद्रधुनी खुली ठेवण्याबाबत करार झाल्याचा दावा केला आहे. या घोषणेनंतर जागतिक तेल बाजारात काही प्रमाणात सकारात्मक प्रतिक्रिया उमटली असून तेलाच्या किमतींमध्ये घसरण झाल्याचे दिसून आले. मात्र, इराणकडून या कराराबाबत अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे अमेरिका-इराण संबंध कोणते वळण घेतात, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. सध्याच्या परिस्थितीत युद्ध थांबवण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांना महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही देशाला दीर्घकाळ युद्धाचा आर्थिक आणि सामाजिक भार सहन करणे शक्य नाही. आधुनिक युद्धामध्ये केवळ लष्करी नुकसान होत नाही, तर व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि सामान्य नागरिकांचे जीवनही मोठ्या प्रमाणावर प्रभावित होते. त्यामुळे संघर्ष टाळून चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढणे हेच दोन्ही देशांच्या हिताचे ठरेल. आंतरराष्ट्रीय समुदायानेही संयमाची भूमिका घेऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण अमेरिका आणि इराणमधील तणावाचा परिणाम केवळ त्या दोन देशांपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे पडसाद उमटतात. त्यामुळे सध्याची संधी वापरून कायमस्वरूपी शांततेच्या दिशेने पावले उचलणे गरजेचे आहे. सध्याच्या परिस्थितीत युद्धाच्या बाबतीत काहीशी आशादायक स्थिती निर्माण झाली आहे. अमेरिकेच्या मित्रदेशांनी संघर्ष थांबवण्यासाठी केलेले प्रयत्न आणि ट्रम्प यांनी त्याला दिलेला प्रतिसाद यामुळे तणाव काही प्रमाणात कमी झाला आहे. मात्र, ही शांतता किती काळ टिकेल हे सांगणे कठीण आहे. आजच्या काळात कोणत्याही देशाला युद्ध परवडणारे नाही. आधुनिक युद्ध अत्यंत खर्चिक झाले असून, क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने, संरक्षण यंत्रणा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर अब्जावधी डॉलर खर्च होतात. याशिवाय युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीवर मोठा परिणाम होतो. इंधन, तेल आणि अन्नधान्याच्या किमती वाढतात,ज्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांपासून ते जागतिक अर्थव्यवस्थेपर्यंत सर्वांना बसतो. विशेषतः आखाती प्रदेशातील युद्धाचे परिणाम अधिक गंभीर असतात, कारण हा भाग जगाच्या ऊर्जा पुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यास जागतिक तेल बाजारात मोठी अस्थिरता निर्माण होऊ शकते. ट्रम्प यांनी सध्या हल्ले थांबवण्याची घोषणा केली असली तरी भविष्यात संघर्ष पुन्हा भडकण्याची शक्यता कायम आहे. या संघर्षामुळे अमेरिकेला मोठा आर्थिक खर्च सहन करावा लागला आहे, तर इराणची आर्थिक परिस्थिती आधीच अत्यंत कठीण आहे. त्यामुळे दोन्ही देशांनी युद्धखोर भूमिका बाजूला ठेवून संवाद आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. युद्धात शेवटी विजय कोणाचाही नसतो; नुकसान मात्र सर्वांचेच होते.

# खासगी कर्जाचे काय ?

**महाराष्ट्राच्या कर्जमाफी योजनेत बँक कर्जदारांना दिलासा मिळणार असला, तरी खासगी सावकारांच्या कर्जात अडकलेले लहान शेतकरी या योजनेमधून वंचितच राहणार आहेत.**

महाराष्ट्र सरकारची नवीन शेती कर्जमाफी योजना मंजूर झाली आहे. राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू होईल. या योजनेअंतर्गत ३६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित असून सुमारे ५६ लाख थकबाकीदार शेतकरी कर्जमुक्त होतील. तसेच ज्यांनी नियमितपणे कर्जफेड केली आहे,अशा शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद या योजनेत आहे. त्यामुळे ही योजना पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व पात्र शेतकरी कर्जमुक्त होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र ही अपेक्षा पूर्ण वास्तव दाखवत नाही. कारण ही योजना बँका, सहकारी सोसायट्या किंवा अधिकृत वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांपुरती मर्यादित आहे. खासगी सावकार, व्यापारी, नातेवाईक किंवा मित्रमंडळींकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना याचा कोणताही लाभ मिळणार नाही. हे शेतकरी कर्जबाजारीच राहणार आहेत, ही बाब लक्षात घ्यायला हवी.

वस्तुतः शेतकरी समाजातील सर्वांत दुर्बल आणि वंचित घटक नेमका हाच आहे. कर्जमाफीचा जो गाजावाजा सध्या सुरू आहे त्यात या घटकाची दखलही घेतली जात नाही, ही गंभीर आणि दुर्दैवी बाब आहे. खासगी कर्जाची व्याप्ती मोजणे हे सोपे काम नाही. कारण या कर्जातील मोठा भाग वैयक्तिक, तोंडी आणि अनौपचारिक व्यवहारांवर आधारित असतो. किती शेतकऱ्यांनी कर्ज घेतले, किती रक्कम घेतली, कोणत्या दराने घेतली या संदर्भातील अधिकृत माहिती सहज मिळत नाही. त्याचा तपशील मिळत नाही.

रिझर्व्ह बँकेच्या एका अभ्यासगटाने केलेल्या अभ्यासानुसार, २०१९ च्या सुमारास शेतीतील खासगी कर्जाचे प्रमाण २८ ते ३० टक्के होते. नाबार्डच्या अंदाजानुसार २०२५ मध्ये महाराष्ट्रात हे प्रमाण २२ ते २७ टक्क्यांच्या दरम्यान होते. अभ्यासाच्या सोयीसाठी हे प्रमाण सरासरी २५ टक्के धरले, तरी चित्र चिंताजनक दिसते. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार २०२४-२५ मध्ये बँका, सोसायट्या आणि इतर अधिकृत संस्थांनी शेती क्षेत्राला १,७७,२०० कोटी रुपयांचे कर्ज दिले. ही रक्कम एकूण शेती कर्जाच्या ७५ टक्के धरली, तर एकूण शेती कर्ज सुमारे २,३६,२६७ कोटी रुपये होते. त्यातील २५ टक्के खासगी कर्ज मानल्यास खासगी शेती कर्जाची रक्कम ५९ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक ठरते. म्हणजेच खासगी कर्जाची शेतीवरील पकड अजूनही मजबूत आहे, हे वास्तव यातून स्पष्ट होते. देशात अशा कर्जाचे प्रमाण हळूहळू कमी होत असले, तरी महाराष्ट्रात हा प्रश्न अजूनही गंभीर आहे, हे देखील त्यातून दिसते.

खासगी कर्ज घेणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने लहान आणि श्रीमंत शेतकरी आहेत. महाराष्ट्रातील एकुण शेतकऱ्यांची संख्या सुमारे १ कोटी ६० लाख इतकी मानली, तर त्यापैकी किमान ८० टक्के म्हणजे सुमारे १ कोटी २८ लाख शेतकरी लहान किंवा श्रीमंत गटातील आहेत. खासगी कर्जदारांमध्ये या गटाचा वाटा ७५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. मोठे शेतकरी कर्जफेड यांचा ताळमेळ बसत नाही. खासगी कर्जाचे व्याजदरही शेतकऱ्याला अधिक अडचणीत टाकतात. कागदोपत्री दर ९ ते १२ टक्के सांगितला जातो. पण अनौपचारिक व्यवहारांमध्ये तो २४ टक्क्यांपेक्षा अधिक असतो. काही ठिकाणी तो अत्यंत अवाजवी पातळीवर जातो. परिणामी मूळ कर्जापेक्षा व्याजाचे ओझे मोठे होते. उत्पन्न वाढत नाही; पण व्याज आणि कर्ज वाढत राहते. यामुळे शेतकरी कायमच्या कर्जजाळयात अडकतो. या स्थितीचे दुष्परिणाम दूरगामी आहेत. लहान तुकड्यांतील शेतीला दीर्घ मुदतीचे भांडवल मिळत नाही. त्यामुळे सिंचन, यांत्रिकीकरण, सुधारित बियाणे, साठवणूक आणि मूल्यवर्धन अशा विकासाच्या शक्यता मर्यादित राहतात. शेतीचा विकास खुंटतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची गती मंदावते. दारिद्रध निर्मूलनातही



अडथळे येतात. तुलनेने बँका किवा सोसायट्यांकडून कर्ज घेऊ शकतात; पण लहान शेतकऱ्यांसाठी औपचारिक कर्जव्यवस्था अनेकदा अप्राप्य ठरते. यामागील पहिले आणि अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे तारणाचा प्रश्न, बँका आणि सोसायट्या काही तारण ठेवल्याशिवाय कर्ज देत नाहीत. लहान शेतकरी गरीब वर्गातील असल्याने त्याच्याकडे पुरेसे तारण नसते. त्यामुळे दीर्घ मुदतीचे कर्ज त्याला मिळणे हे जवळपास अशक्यच असते. या शेतकऱ्यांना कर्ज न मिळण्यामागील दुसरे कारण म्हणजे बँकांची कार्यपद्धती. अर्ज, कागदपत्रे, तपासणी, मंजुरी आणि कार्यालयीन विलंब यामुळे शेतकऱ्याला प्रक्रिया कठीण वाटते. याउलट सावकाराकडून कर्ज घेणे सोपे, तत्काळ आणि वैयक्तिक ओळखीवर शक्य होते. त्यामुळे शेतकरी अनौपचारिक कर्जाकडे वळताना दिसतो. तिसरे कारण जमीनमालकीशी संबंधित आहे. अनेक ठिकाणी जमीन मालक आणि प्रत्यक्ष शेती करणारा शेतकरी वेगळा असतो. बँकेचे कर्ज जमीनमालकाला मिळते. मालक कर्ज घ्यायला तयार नसेल, तर जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला औपचारिक कर्ज मिळत नाही. त्याला नाइलाजाने खासगी कर्ज घ्यावे लागते.

चौथे आणि अधिक मूलभूत कारण म्हणजे शेत जमिनीचे अव्यवहार्य आकारमान, महाराष्ट्रात सरासरी शेतजमीन सुमारे तीन एकर आहे. लाखो शेतकऱ्यांकडे अडीच ते पाच एकरपेक्षाही कमी जमीन आहे, अशा क्षेत्रावर शेती करून खर्च, उत्पन्न आणि देशात बहुआयामी दारिद्र्य कमी झाले असले, तरी उरलेल्या गरिबांमध्ये लहान शेतकरी, श्रीमंत शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर यांचा मोठा वाटा आहे. अव्यवहार्य शेती आणि भांडवलाचा अभाव ही त्यामागची महत्त्वाची कारणे आहेत. सर्वांत वेदनादायक परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महाराष्ट्रात हा प्रश्न वर्षानुवर्षे तीव्र राहिला आहे. २०२३ मध्ये राज्यात ४,१५० शेतकरी आणि २.५१९ भूमिहीन शेतमजुरांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. खासगी कर्जाचे असहा ओझे, अपुरे उत्पन्न आणि सरकारी मदतीचा अभाव ही त्यामागील प्रमुख कारणे मानली जातात. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील प्रमाण अधिक असणे ही चिंतेची बाब आहे. या प्रश्नाचा आणखी एक पैलू म्हणजे खासगी कर्जाचे सामाजिक परिणाम. सावकाराकडील कर्ज केवळ आर्थिक व्यवहार राहत नाही; अनेकदा ते सामाजिक दबाव, अपमान आणि असुरक्षिततेचे कारण बनते. लहान शेतकरी पीक विक्री, बियाणे खरेदी किंवा घरगुती खर्चासाठी त्याच सावकारावर अवलंबून राहतो. त्यामुळे त्याची सौदेबाजीची शक्ती कमी होते. बाजारभाव चांगला असला तरी उत्पादन कमी दराने विकावे लागते. अशा प्रकारे कर्जाचे चक्र केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या जीवनमानावर परिणाम करते. शेती क्षेत्राला सरकारी मदतीची गरज नाकारता येत नाही.

अनुदान, सवलती आणि कर्जमाफी यांची आवश्यकता आहेच. परंतु केवळ संस्थात्मक कर्जमाफी पुरेशी ठरत नाही. गेल्या दशकात कर्जमाफीवर प्रचंड खर्च होऊनही मोठा शेतकरीवर्ग मदतीपासून वंचित राहतो, हा विरोधाभास आहे. खासगी कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र धोरण, कर्जनोंदणी व्यवस्था,स्वस्त कर्जपुरवठा,सावकारी नियंत्रणाची कडक अंमलबजावणी आणि लहान शेतकऱ्यांसाठी हमी-आधारित कर्जव्यवस्था तातडीने आवश्यक आहे.सरकारी कर्जमाफीमुळे काही शेतकऱ्यांना दिलासा मिळेल; पण खासगी कर्जाचा प्रश्न सुटल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतकरी ख-या अर्थाने कर्जमुक्त होणार नाही. साभार म.टा.

**अनिल पडोशी**

# शेयर मार्केटमधील,विशेषतः तरुण, गुंतवणूकदारांसाठी ‘कोरियन’ धडे!

‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ची चर्चा आता नवीन नाही राहिली. तुम्ही ज्या क्षेत्राशी सबंधित आहात त्या क्षेत्रात एआय काय इम्पॅक्ट करु शकते याचे अंदाज बांधत चर्चा होणे स्वाभाविक आहे. आयटी क्षेत्रात काय होईल,एकूण अर्थव्यवस्थेत किती बेरोजगारी होऊ शकते इत्यादी.

एआय बद्दल दुसऱ्या चर्चा घडत आहेत त्या अमेरिका स्थित एआय कंपन्यांच्या शेअर्सच्या किंमती मध्ये फुगा (सेट बबल) तयार झाला आहे का? असे असेल तर तो अचानक फुटेल का?अमेरिकेतील २००२ मधील डॉट कॉम, २००८ मधील सबप्राइम वित्तीय अरिष्ट सारखे मोठे अरिष्ट येऊन कोसळेल का?

अमेरिकेतील शेअर बाजाराचा परिणाम भारतासकट सर्वच शेअर बाजारांवर नेहमीच होत असतो. त्यामुळे असे काही घडले तर भारताच्या शेयर बाजारावर काय परिणाम होईल?भारतात गेल्या काही वर्षात अनेक मध्यमवर्गीय शेयर मार्केटमध्ये आपल्या बचती गुंतवू लागल्या आहेत. आधीच्या सर्व अरिष्टात त्यांची संख्या एवढी कधीच नव्हती. त्यामुळे तेवढा हल्लकल्लोळ माजला नव्हता. आता परिस्थिती वेगळी आहे.शेयर मार्केट अरिष्ट लाखो गुंतवणूकदार कुटुंबाना लपेटू शकते. त्यामुळे त्यांनी किमान माहिती ठेवली पाहिजे.अमेरिकेतील एआय कंपन्यांचे शेअर्स वरखाली होत आहेतच पण पहिली विकेट पडली ती दक्षिण कोरियाच्या एआय कंपन्याची आणि म्हणून तेथील एकूणच शेयर मार्केटची.

मागच्या आठवड्यात KOSPI (जसा आपला सेन्सेक्स) हा दक्षिण कोरियन निर्देशांक त्याच्या ऐतिहासिक उंचीवरून तीन सत्रात ४० पेक्षा जास्त टक्क्यांनी खाली आला. (गेल्या दोन दिवसांत तो काहीसा सावरला आहे). गेल्या वर्षभरात KOSPI १८० टक्क्यांनी वधारला यावरुन तेथे काय धमाल सुरू असेल याचा अंदाज येईल. निर्देशांक वधारला याचा अर्थ असा नाही की सर्व किंवा बहुसंख्य कंपन्यांचे शेअर्स त्या प्रमाणात वधारले. Samsung आणि SK Hynix या फक्त दोन एआय सबंधित कंपन्यांचा KOSPI मधील वाटा ५० टक्के आहे. (अमेरिकेत देखील मुठभर एआय कंपन्यांच्या शेयरमुळे शेयर मार्केट ऐतिहासिक उंचीवर आहे). वरील दोन कोरियन कंपन्यांचे शेअर्स २५ टक्के आणि ३० टक्क्यांनी तीन दिवसात खाली आले होते. त्या




तीन दिवसात तीन वेळा सर्किट ब्रेकर लावले गेले होते. काही लाख कोटी बाजारमूल्य स्पिरीट सारखे उडाले.

या नाट्यपूर्ण कोसळण्याला अनेक कारणे सांगितली जात आहेत. पण एक महत्वाचे कारण ठरले ते मे महिन्यात वरील फक्त दोन कंपन्यांच्या शेयरवर आधारित Exchange Traded Fund (ETF) मध्ये गुंतवणूकदार कर्ज काढून गुंतवणूक करू लागले. अडाणीपणाची हद्द झाली. मुळात ETF ही संकल्पना मोठ्या बास्केटची आहे. ज्यामुळे risk diversification होऊ शकते. अर्थात हे नवीन प्रॉडक्ट आणि प्रणाली तेथल्या शेयर मार्केटच्या नियामक मंडळाच्या परवानगीने सुरू झाली होती. याचा फायदा घेत अनेक गुंतवणूकदारांनी ब्रोकरेज हाऊसेस कडून कर्जे काढून त्यावर या दोन कंपन्यांच्या शेअर्स वर सट्टा खेळावयास सुरुवात केली. या ETF प्रॉडक्ट मध्ये रिटेल गुंतवणूकदारांचा वाटा ९० टक्के होता.

आपल्या बघती घालून शेअर्स मध्ये गुंतवणूक करणे आणि कर्ज काढून गुंतवणूक करणे हे भिन्न प्रकार आहेत. कर्ज काढून तुम्ही ज्यावेळी शेअर्स मध्ये गुंतवणूक करता त्यावेळी ते शेअर्स कर्ज देणाऱ्या ब्रोकरेज हाऊसकडे कर्जाला सुरक्षा म्हणून गहाण ठेवले जातात. आणि असा लिखित करार असतो की जर शेअर्सच्या किंमती घसरल्या आणि दिलेले कर्ज धोक्यात आले तर एकतर ब्रोकर गुंतवणूकदाराला अधिकचे पैसे भरायला सांगतो. त्याला मार्जिन कॉल असे म्हणतात. किंवा तुम्ही भरू शकला नाहीत तर ब्रोकर त्याच्याकडे असलेले शेअर्स विकून कर्जाच्या परतफेड करून घेऊ शकतो. दक्षिण कोरियात नेमके हेच घडले. फक्त काही दिवसात दक्षिण कोरियातील शेयर मार्केट कोसळण्यामध्ये याचा मोठा वाटा आहे.

वरील दोन कंपन्यांच्या ETF मधील गुंतवणूकदारांमध्ये त्या देशातील तरुणांचे प्रमाण खूप मोठे आहे. पुरेसे उत्पन्न नाही, त्यामुळे घर घेता येत नाही, आर्थिक स्थिरता नाही, म्हणून लग्ने होत नाहीत. यामुळे झटपट पैसे कोठून मिळतील याच्या शोधात तेथील तरुण पिढी असते. शेयर मार्केट, ETF मध्ये त्यांचा मोठा सहभाग त्यातून येत असतो.

जेवढे अरिष्ट वाढेल तेवढे वित्त भांडवल अविवेकी होत जाणार आहे. सर्व गुंतवणूकदारांना आपल्या प्रभाव क्षेत्रात ओढून घेणार आहे. त्यासाठी अजून नवीन प्रोडक्ट्स शोधून काढली जाणार आहेत. ते गुंतवणूकदारांना गुंतवणूक आणि सट्टेबाजी यातील सीमारेषा समजली पाहिजे.

भारतातील गुंतवणूकदारांसाठी, विशेषतः तरुण वर्गासाठी: तुमची पैशाची तंगी खरी आहे.पण झटपट पैशाच्या मागे लागू नका. आपली जोखीम क्षमता बघून सट्टेबाज सदृश्य शेयर बाजारात गुंतवणुकी करा. कर्जे काढून अशा गुंतवणुकी अजिबात करू नका. अमेरिकेन आणि म्हणून जागतिक शेयर बाजारात लाल बावटे लागले आहेत. त्याबद्दल वाचा. समजून घ्या.

**संजीव चांदोरकर**

## पोटनिवडणुकांचे निकाल:भाजपसाठी आत्मपरीक्षणाची वेळ?

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा पोटनिवडणुकीचे निकाल भारतीय राजकारणाला आणि विशेषतः सत्ताधारी भाजपला एक अत्यंत महत्त्वाचा धडा देणारे ठरले आहेत .बिहारमधील बांकीपूरची जागा भाजपचे प्रदेशाध्यक्ष नितीन नवीन यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झाली होती. गेल्या तीन दशकांपासून हा भाजपचा अभेद्य बालेकिल्ला मानला जात होता. उच्चवर्णीय व सुशिक्षित मतदारांची बहुसंख्या असलेल्या या मतदारसंघात भाजप सहज जिंकेल असा अंदाज होता. परंतु, यूजीसी नियमावलीतील बदलांमुळे नाराज झालेला वर्ग, ऐनवेळी जाहीर उमेदवाराऐवजी कायस्थ समाजाच्या उमेदवाराला दिलेली उमेदवारी आणि भरत तिवारी चकमक प्रकरणातील स्थानिक असंतोष यामुळे पारंपरिक मतदार भाजपपासून दुरावला. परिणामी, प्रशांत किशोर यांच्या ‘जन सुराज’ पक्षाने येथून अनपेक्षित विजय मिळवून सर्वांनाच धक्का दिला.

दुसरीकडे, मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघात काँग्रेसचा विजय झाला. राज्याचे माजी गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांचे तिकीट कापून नवीन कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. त्यातच स्थानिक शेतकरी आंदोलन आणि पक्षांतर्गत बंडखोरी भाजपला महागात पडली. या पराभवामागे जंतरमंतरवरील नीट पेपरफुटी आंदोलनाचा काही प्रमाणात प्रभाव असला, तरी मुख्य कारण पक्षांतर्गत त्याहूनही गंभीर बाब म्हणजे, पक्षाची मजबूत ताकद मानला जाणारा ‘भाजप युवा मोर्चा’ आणि विद्यार्थी वर्गात प्रभाव असणारी‘अखिल भारतीय विद्यार्थी परिषद’ यांसारख्या बलाढ्य संघटना पाठीशी असतानाही प्रत्यक्ष जमिनीवर कोणीच काम करताना दिसले नाही.‘नीट’ किंवा शैक्षणिक धोरणांबाबत सरकारने उचललेली पावले आणि आपली भूमिका सामान्य जनतेपर्यंत व तरुणांपर्यंत पोहोचवण्यात या संघटना आणि पक्षयंत्रणा निष्प्रभ ठरली.बिहार किंवा मध्य प्रदेशातील या पराभवामुळे भाजपचे भविष्य धोक्यात आले असा निष्कर्ष काढणे निश्चितच घाईचे ठरेल. याआधीही उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या स्वतःच्या ‘गोरखपूर’ या पारंपरिक मतदारसंघात भाजपचा पोटनिवडणुकीत पराभव झाला होता. तसेच, २०१८ मध्ये मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये पराभव होऊनही २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने याच राज्यांत दणदणीत बाजी मारली होती.त्यामुळे या पोटनिवडणुकीच्या निकालांकडे भाजपने एका गंभीर अलार्म’ म्हणून पाहिले पाहिजे.

**अविनाश देशपांडे**

## ज्ञानमंदिराचे शिल्पकार हरपले....

समाजहिताच्या अत्यूच्च प्रेरणेने सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आनंदाचे, सुख, समाधानाचे मळे फुलवणारे शैक्षणिक क्षेत्रात डोंगराएवढे उतुंग काम करुन दाखवणारे सार्वजनिक पद हे वैयक्तिक लाभसाठी नसून लोकसेवेसाठी आहे असे मानून राज्यपालपदावर असताना केवळ एक रुपया वेतनावर काम करणारे महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आपल्या अमिट कर्तुत्वाचा ठसा उमटवणारे जेष्ठ शिक्षणमहर्षी आणि खऱ्या अर्थाने ‘जगवेगळा माणूस’ ठरलेले पद्मश्री डॉ.डी.वाय. तथा ज्ञानदेव यशवंतराव पाटील यांचे वयाच्या ९१ व्या. वर्षी कोल्हापुरात निधन झाले त्यांचे जाणे महाराष्ट्राच्या समाजकारण - राजकारण यासाह शिक्षण, वैद्यकीय, क्रीडा, शेती, सहकारासह सर्वच आघाडीच्या क्षेत्रातील प्रत्येक माणसाच्या काळजाला चटका लावणारे असून डी. वाय.समूहाचा पोशिंदा हरपल्याची भावना जनमानसात पसरली आहे डॉ. डी.वाय.पाटील यांचा जन्म २२ ऑक्टोंबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप येथे सर्वसामान्य कुटुंबात झाला नेहमीच त्यांची चढती कमान राहिली कोल्हापूरचे नगरसेवक, आमदार, त्रिपुरा, बिहार, पश्चिम बंगालचे राज्यपाल असा त्यांचा प्रवास राहिला त्यामुळे सोसायटीचे चेअरमन,आमदार ते थेट राज्यपाल पदापर्यंत मजल मारली होती अशा ध्येयवेड्या आणि ज्ञानमंदिराचे शिल्पकार ठरलेल्या डॉ. डी. वाय पाटील यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रासह त्यांचा चाहतावर्ग शोक सागरात बुडाला आहे त्यांना विनम्र आदरांजली !

**राजू जाधव**

गुरूवार, दि. ६ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम


एक प्रतिष्ठित सत्य

# पेकर्डा येथील अडाण नदीत अज्ञात तरुणाचा मृतदेह..!

## ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन, परिसरात खळबळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. ५ : दारव्हा पोलीस स्टेशन अंतर्गत पेकर्डा गावाजवळील अडाण नदीच्या पात्रात एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सकाळच्या सुमारास नदीकाठी गेलेल्या नागरिकांना पाण्यात मृतदेह तरंगताना दिसताच त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली.**



पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. मृत व्यक्तीचे वय अंदाजे २५ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सध्या मृतदेहाची ओळख पटलेली नसल्याने परिसरातील तसेच शेजारच्या गावांतील बेपत्ता व्यक्तींची माहिती तपासली जात आहे. या संदर्भात ज्यांच्या नातेवाईक, मित्र किंवा परिचयातील व्यक्ती काही दिवसांपासून बेपत्ता असेल, त्यांनी तातडीने पोलीस सहायक पंकज राठोड (मो. ८३०८०४०३२८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. दरम्यान, अज्ञात मृतदेह सापडल्याची माहिती परिसरात वेगाने पसरल्याने विविध चर्चांना उधाण आले असून, या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सर्व अंगांनी सुरू आहे. मृताची ओळख पटल्यास घटनेमागील कारणांचा उलगडा होण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# जुन्या वैमनस्यातून तरुणाची निर्घृण हत्या..!

## नऊ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

### अशोक नगर परिसर हादरला,लोखंडी रॉड, दगड व बेदम मारहाण..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** यवतमाळ शहरातील अशोक नगर परिसरात जुन्या वैमनस्यातून एका २५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम १०३(१), १८९(२), १९० आणि १९१(३) अन्वये नऊ आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून शहरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट रोजी रात्री साडेसातच्या सुमारास अशोक नगर परिसरात जुन्या वादातून आरोपींनी तरुणाला घेरून लोखंडी रॉड, दगड तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. गंभीर जखमी



झालेल्या तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच यवतमाळ शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला. पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला असून सर्व आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. या निर्घृण हत्येमुळे अशोक नगर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, दोषींवर कठोर कारवाई करून शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून लवकरच आरोपींना अटक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# स्वातंत्र्यदिनी चोरडिया हॉस्पिटला सेवाभावी उपक्रम..!

**वणी, दि. ५ :** समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस कर्मचारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत चोरडिया हॉस्पिटल तर्फे १५ ऑगस्ट रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात ईसीजी, छातीचा एक्स-रे, सीबीसी, लिपिड प्रोफाइल, HbA१c, एफबीएस, सीरम क्रिएटिनिन व थायरॉईड फंक्शन टेस्टसह विविध तपासण्या आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. डॉ. रोहित डी. चोरडिया यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या या समाजोपयोगी उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, आरोग्यसेवेतून समाजसेवेचा आदर्श निर्माण केल्याबद्दल चोरडिया हॉस्पिटलच्या कार्याचे कौतुक होत आहे.

# "गाव तिथे स्मशानभूमी" करिता प्रशासनाला निवेदन

## पुराच्या पाण्यातून निघालेल्या अंतयात्रेनंतर जुनोनी ग्रामस्थ आक्रमक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी , दि. ५ :** तालुक्यातील मौजा जुनोनी येथे पूराच्या पाण्यातून अंत्ययात्रा काढण्याची हृदयद्रावक घटना घडल्यानंतर अखेर गावातील समस्त ग्रामस्थांनी एकत्र येत शासनाच्या "गाव तिथे स्मशानभूमी" धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन आमदार राजूभाऊ तोडसाम, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना सादर करण्यात आले.

दि. ३० जुलै २०२६ रोजी दिवंगत सौ. भागीरथा माधव खडसंग यांच्या निधनानंतर स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग पूराच्या पाण्याखाली गेल्यामुळे ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून अंत्ययात्रा नेण्याची वेळ आली होती. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यासह राज्यभरातून



तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि सामाजिक माध्यमांनी या घटनेची दखल घेत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर जुनोनी ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात गावासाठी स्वतंत्र स्मशानभूमी, तेथे जाण्यासाठी सर्वहंगामी रस्ता, स्मशान शेड, तसेच इतर आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यासोबतच स्मशानभूमी शेड व पोहोच मार्गासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मंजुरी देऊन कामांना तातडीने प्रारंभ करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला एका महिन्याच्या आत ठोस निर्णय घेऊन प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी स्पष्ट मागणी केली असून, अन्यथा मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या व्यवस्थेविरोधात गावकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा निवडणुकांबाबत ग्रामस्थ गंभीर भूमिका घेऊ शकतात, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. गावकऱ्यांनी या प्रश्नाकडे केवळ एका गावाची समस्या म्हणून न पाहता प्रत्येक नागरिकाच्या सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याच्या मूलभूत अधिकाराशी संबंधित विषय म्हणून तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# उपमुख्यमंत्र्यांवरील कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध..!

## राष्ट्रवादीचे कारवाईसाठी निवेदन, भाजपचाही पाठिंबा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ५ :** महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्याचा दावा करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ उमरखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

संजय गांधी चौकात निषेध व्यक्त करत उपविभागीय अधिकाऱ्यांना दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले. तालुकाध्यक्ष शंकरराव तालंगकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात सार्वजनिक जीवनातील व्यक्तींविषयी, विशेषतः राज्याच्या महिला उपमुख्यमंत्र्यांबाबत



अवमानकारक भाषा वापरणे ही महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारी बाब असल्याची भूमिका मांडण्यात आली. लोकशाहीत मतभेद मांडण्याचा अधिकार असला तरी तो सुसंस्कृत आणि जबाबदार भाषेतच व्यक्त व्हावा, अन्यथा अशा वक्तव्यांमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा प्रकारच्या अवमानकारक वक्तव्यांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष दामोदर इंगोले, वनिता चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास खोकले, अविनाश पाटील, देविदास राठोड, अर्जुन चव्हाण, रेखा गायकवाड, श्रीकांत जाधव, शंकरराव बुरकुले, गजानन जाधव, प्रकाश राठोड, बबलू जाधव यांच्यासह मित्रपक्ष भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष अतुल खंदारे व पवन मेंढे उपस्थित होते.

## थोडक्यात



### महसूल दिनी उपविभागीय अधिकारी यांचा सन्मान.!

**पुसद :** दि.१ऑगष्ट २०२६ रोजी महसुल दिनानिमीत्त जिल्हंयातील उत्कृष्टं अधिकारी व कर्मचारी यांनी वर्षभरात शासकीय कामे, निवडणुक, नैसर्गीक आपत्ती, शासकीय वसुली, या सारख्या शासकीय कामकाज व ईतर प्रंशासनामध्ये उल्लेखनिय काम केल्याबाबत जिल्ह्यातून उत्कृष्टं पुसद येथील कार्यरत असलेले उपविभागीय अधिकारी आशीष बिजवल यांना सन्मानीत करण्यात आले. तसेच जिल्हंयातील उत्कृष्टं सहायक महसूल अधिकारी म्हणून तहसील कार्यालय पुसद येथील दिलीप कोलेवाड,यांना जिल्हाधिकारी व जिल्हापोलीस अधीक्षक यवतमाळ यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे दि.३ ऑगष्ट २०२६ रोजी शाल,श्रीफळ,व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे पुसद उपविभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे जिल्हंयातून एस.डी.ओ. तहसीलदार तसेच महसूल संघटना व कर्मचाऱ्याकडून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या – काँग्रेसची तहसीलदारांकडे मागणी

**झरी :** तालुक्यात मागील काही दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देऊन तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुसळधार पावसामुळे अनेक शेतांमध्ये पिके पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून पारदर्शक पंचनामे करावेत आणि शासनाकडे तत्काळ अहवाल सादर करावा.

तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांनुसार आर्थिक मदत, पीक विम्याचा लाभ व इतर आवश्यक सवलती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप बुरेवार यांच्या वतीने तहसीलदार, झरी-जामणी यांना दिले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### डासांचा कहर फॉगिंग,औषध फवारणी व स्वच्छता मोहीम तातडीने राबवा..!

**काँग्रेसचा जनआंदोलनाचा इशारा**

**महागाव :** शहरात वाढलेल्या डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांचे



आरोग्य धोक्यात आले असून डेंग्यू, मलेरिया व चिकनगुनियासारख्या साथींचा धोका निर्माण झाला आहे. शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर यांनी नगरपंचायतीच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक वॉर्डांतील नाले, गटारी, साचलेले पाणी व कचऱ्यामुळे डासांची उत्पत्ती वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला. नियमित फॉगिंग, अळीनाशक औषध फवारणी आणि विशेष स्वच्छता मोहीम तातडीने राबविण्याची मागणी करत नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. प्रशासनाने त्वरित ठोस उपाययोजना न केल्यास नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही कोपरकर यांनी दिला.

# उपचारा ऐवजी थेट रूग्ण रेफर..!

## पाटणबोरी PHC च्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पाटणबोरी, दि. ५ :** तालुक्यातील ४२ गावांसाठी आरोग्य सेवेचा आधार असलेल्या पाटणबोरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (PHC) कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मध्यरात्री उपचारासाठी दाखल झालेल्या एका महिला रुग्णाला आवश्यक प्राथमिक उपचार न देता थेट आदिलाबाद येथे रेफर करण्यात आल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री सुमारे १.३० वाजता गंभीर प्रकृतीच्या महिलेला PHC मध्ये आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिची प्रकृती नीट तपासून उपचार करण्याऐवजी तिला तातडीने आदिलाबाद येथे हलविण्याचा सल्ला दिल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. "आमचे म्हणणे ऐकून





न घेता केवळ रेफर करण्यावर भर देण्यात आला," असा दावा त्यांनी केला. सध्या पावसाळ्यात ताप, मलेरिया, डायरिया व इतर संसर्गजन्य आजारांचे रुग्ण वाढत असताना अशा प्रकारच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रातच प्रभावी उपचार मिळणे अपेक्षित असताना रुग्णांना बाहेर पाठविण्याचे प्रकार चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, तसेच पाटणबोरी PHC मध्ये २४ तास सक्षम व रुग्णाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांबाबत PHC प्रशासनाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत त्यांचा प्रतिसाद मिळू शकला नव्हता.

# वणी जंगल सत्याग्रहाला ९६ वर्षांची मानवंदना..!

## स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचा उजाळा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. ५ :** स्वातंत्र्यलढ्यातील विदर्भाच्या इतिहासाला दिशा देणाऱ्या वणी येथील ऐतिहासिक जंगल सत्याग्रहाच्या स्मृतींना ४ ऑगस्ट रोजी अभिवादन करण्यात आले. ४ ऑगस्ट १९३० रोजी ब्रिटिश सत्ते विरोधात उभारण्यात आलेल्या या लढ्याने स्वातंत्र्य चळवळीला नवी ऊर्जा दिली होती.

त्या ऐतिहासिक सत्याग्रहाच्या स्मरणार्थ उभारलेल्या स्मृतिस्तंभाला माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, हरिहर भागवत, गजानन कासावार, विवेक पांडे आणि सुनील इंदुवामन ठाकरे यांनी पुष्पहार अर्पण करून स्वातंत्र्यसैनिकांना कृतज्ञ अभिवादन केले. लोकनायक पद्मविभूषण डॉ. मा. श्री. (बापूजी) अणे यांच्या प्रेरणेने उभारलेल्या या आंदोलनाचे





नेतृत्व वणीचे स्व. रा. गं. भागवत आणि चंद्रपूरचे डॉ. शंकरराव वैद्य यांनी केले होते. तत्कालीन वणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष स्व. रवी करंदीकर यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिशांच्या अन्यायकारक वन धोरणाला धैर्याने विरोध करत स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले. या ऐतिहासिक संघर्षाची आठवण कायम राहावी म्हणून वणी तालुका स्वातंत्र्य संग्राम सैनिक समितीने स्मृति स्तंभ उभारला असून त्याचे उद्घाटन ४ ऑगस्ट १९९२ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे माजी सभापती बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते झाले होते. यावेळी उपस्थितांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्र निष्ठेचे स्मरण करत, स्वातंत्र्याचा हा अमूल्य वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमास डॉ.जिनेंद्र भंडारी, सागर जाधव, अंकुश भंडारी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# 'सावित्रीच्या लेकी' आश्रयलयावर बुलडोझर थांबवा..!

## ७० वंचित मुलींच्या भविष्याशी खेळ थांबवा! – युवासेनेची प्रशासनाला मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** यवतमाळ शहरातील वाघाडी परिसरात पारधी समाजातील वंचित मुलींसाठी कार्यरत असलेल्या "सावित्रीच्या लेकी" आश्रयालयावरील प्रस्तावित अतिक्रमण हटाव कारवाई तात्काळ स्थगित करावी, अशी ठाम मागणी युवासेनेने नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

या कारवाईमुळे सुमारे ७० निराधार व वंचित मुलींचे शिक्षण, निवारा आणि सुरक्षित भविष्य धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, माळवे दांपत्य गेल्या अनेक वर्षांपासून



कोणत्याही मोठ्या शासकीय मदतीशिवाय लोकसहभागातून आश्रयालय चालवत असून पारधी समाजातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उल्लेखनीय कार्य करत आहे. या संस्थेतून अनेक मुली शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी झाल्या असून समाजपरिवर्तनाचा आदर्श निर्माण झाला आहे.युवासेनेने प्रशासनाला मानवतावादी भूमिका घेण्याचे आवाहन करत कोणतीही कारवाई

> **"आश्रयालय वाचले तरच मुलींचे भविष्य वाचेल" 'सावित्रीच्या लेकी' आश्रयालय हे केवळ इमारत नसून वंचित मुलींच्या शिक्षण, स्वाभिमान आणि सुरक्षित भविष्याचा आधार आहे. प्रशासनाने केवळ अतिक्रमणाच्या चौकटीत हा विषय न पाहता मानवी दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा. या प्रश्नावर आम्ही जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांची भेट घेऊन सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी करणार आहोत. समाजोपयोगी कार्य करणाऱ्या या आश्रयालयाचे संरक्षण करणे ही प्रशासनाचीही नैतिक जबाबदारी आहे.**
>
> **– प्रद्युम्न जवळेकर**
> **जिल्हाप्रमुख, युवासेना, यवतमाळ**

करण्यापूर्वी सामाजिक संस्था, नागरिक व संबंधित घटकांशी चर्चा करूनच निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. शहरातील अतिक्रमणांवर समान निकष लागू व्हावेत; मात्र समाजोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांबाबत संवेदनशीलता दाखविणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर, शहर प्रमुख विकास कोल्हे, हर्षद वासाड, शुभम कोठूरकर, प्रसाद कडू, शुभम दिवाणे, अंकुर झाडे, मयुर जुमळे, युवराज चटकी, श्याम बोबडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुसद पालिकेतील 'नियमबाह्य' कारभारावर विरोधकांचा हल्लाबोल..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ५ :** पुसद नगर परिषदेत स्थायी समितीच्या सभेच्या नोटीस प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत काँग्रेसचे विरोधी पक्षनेते तथा गटनेते डॉ. मोहम्मद नदिम यांनी सभेवर बहिष्कार टाकत नगरपरिषदेच्या कारभारावर तीव्र टीका केली.

सभेची नोटीस नगरपालिकेच्या अधिकृत लेटरहेडवर नसून त्यावर आवक-जावक क्रमांक व तारीखही नसल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला. तसेच सर्वसाधारण सभेची नोटीस सात दिवसांपूर्वी देणे बंधनकारक असतानाही या नियमाचे सातत्याने उल्लंघन होत असल्याचे त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष

> **मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड यांनी मात्र स्थायी समितीच्या सभेचे सूचनापत्र नगरपरिषद कायद्यातील तरतुदीनुसारच काढण्यात आल्याचे सांगत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याचा दावा केला.**

निर्धारित वेळेनंतर सभागृहात आल्यानेही त्यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे गटनेते डॉ. अकील मेमन, नगरसेवक ॲड. भारत जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अंजनगाव सुर्जी न.प.चा शिक्षण विभागात सर्जिकल स्ट्राईक

## मुख्याधिकारी विजय लोहकरे यांची धडाकेबाज कारवाई
## दोन शिक्षकांची रोखली वेतनवाढ

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील अनियमितता आणि वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या तीन शिक्षकांवर मुख्याधिकारी गट-अ विजय लोहकरे यांनी कडक कारवाई केली आहे. यामध्ये दोन सहायक शिक्षकांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली असून, एका मुख्याध्यापकाला वैद्यकीय मंडळामार्फत तपासणीसाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या शिक्षण विभागात या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे. नगरपरिषद कार्यालयाने ४ ऑगस्ट २०२६ रोजी तीन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

नगरपरिषदेच्या शाळांची माहिती, वरिष्ठ कार्यालयाच्या सूचना, शालेय उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता याबाबत शासनाचे उपक्रम व सूचना आपल्या नगरपरिषद शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षकांपर्यंत पोहोचवणे व संबंधित इतर कामे करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी दोन शिक्षकांकडे केंद्र समन्वयक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला होता.अ) अनिल धारणे, सहायक शिक्षक, न.प. मराठी प्राथमिक शाळा क्र. ६.ब)अमोल तिडके, सहायक शिक्षक, न.प. मराठी प्राथमिक शाळा क्र. ३ या दोघांना ८ जुन २०२६ आणि ८ जुलै २०२६ च्या आदेशान्वये त्यांचा मूळ सहायक शिक्षकाचा पदभार सांभाळून केंद्र समन्वयक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता.

मात्र,दोन्ही शिक्षकांनी सदर आदेश न स्वीकारता परत केला व अतिरिक्त कार्यभार काढण्याबाबत पत्र दिले. आदेशाची अंमलबजावणी केली नाही.मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी याला नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आदेशाची अवहेलना मानले आहे. हे कृत्य महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त अपील व वर्तणुक) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहे, असे नमूद करून महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे कलम ५ (चार) नुसार दोन्ही शिक्षकांची माहे जुलै-२०२६ ची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. तिसरी कारवाई उर्दू शाळेच्या मुख्याध्यापकावर करण्यात आली आहे.



श्री. मो. शफीक गुलाम कादिर, मुख्याध्यापक, न.प. उर्दू प्राथ. शाळा क्र. ८.यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा वैद्यकीय मंडळ, यवतमाळ येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. नगरपरिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि प्रशासनात शिस्त आणण्यासाठी मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी ही कारवाई केली आहे. या कारवाईमुळे शिक्षकांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

नगरपरिषद अंतर्गत पथदिवे देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीचे सुपर वायझर शुभम बोरोडे यांच्यावर दोन दिवसांपूर्वी कंपनीला कारवाईचे आदेश दिले आहे. पथदिवे देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीच्या सुपर वायझर यांनी नागरिकांशी पथदिवे दुरुस्ती बाबत असभ्य भाषेचा उपयोग केला होता. नागरिकांशी गैरवर्तणूक केल्याबाबत ही कारवाई करण्यात आली होती. आता तीन शिक्षकांवर कारवाई करण्यात आली असल्याने नगरपरिषद विभागातील कर्मचाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

# खासदार अमर काळे यांची चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पूरग्रस्त भागाला भेट

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अतिमुसळधार पावसामुळे चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेती, घरे तसेच रस्त्यांचे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी पूरग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच प्रशासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्तांना शासनाची आर्थिक मदत लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

गेल्या काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे चांदूर रेल्वे तालुक्यातील राजुरा व एकपाळा परिसरातील अनेक शेतांचे मोठे नुकसान झाले आहे.पुराच्या पाण्यात शेतातील स्प्रिंकलर यंत्रणेचे पाइप वाहून गेले असून अनेक ठिकाणी शेती खरडून गेली आहे.संत्रा बागांमधील झाडे उन्मळून पडल्याने फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. खासदार अमर काळे यांनी नुकसानग्रस्त शेती, घरे आणि पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या ऐकून प्रशासनाने कोणताही विलंब न करता पंचनामे पूर्ण करावेत आणि शासनाची मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांनी राजुरा येथील खोलाड नदी तसेच नावली–खरवाडी नाल्यावर आलेल्या पुराच्या ठिकाणालाही भेट दिली. याच परिसरात काही दिवसांपूर्वी पुराच्या पाण्यात अडकलेल्या सात जणांची बचाव पथकाने यशस्वी सुटका केली




होती. या धाडसी बचावकार्याबद्दल खासदार अमर काळे यांनी बचाव पथकाचे कौतुक केले.

पाहणीदरम्यान राजुरा ग्रामपंचायत सदस्य भूषण काळे, तहसीलदार पूजा माटोडे, तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे, कृषी सहाय्यक नागपुरे, तलाठी ललिता काळमेघ, कोतवाल शेख इरफान तसेच राजुरा व एकपाळा येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच दौऱ्यात एकपाळा येथील तेजस अनिल काळमेघ या युवकाचा चालत्या वाहनावर झाडाची फांदी कोसळून झालेल्या दुर्दैवी मृत्यूबद्दल खासदार अमर काळे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले व त्यांना धीर दिला. त्यानंतर नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा, धामक, शिवणी रसुलापूर, राधापूर आणि हरणी या गावांनाही भेट देऊन पूरस्थितीची पाहणी केली.नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीने शासनाची मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. मंगरूळ चव्हाळा व धामक या गावांमध्ये अनेकांच्या घरात पुराचे पाणी शिरल्याने घरे पडली असून अन्नधान्य, कपडे तसेच विद्यार्थ्यांची शालेय पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य वाहून गेले आहे. या नुकसानीची तातडीने नोंद घेऊन पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, तहसीलदार अश्विनी जाधव, कृषी विभागाचे विकास पाटील, गटविकास अधिकारी अश्विनी शेलार, शिवसेना (ठाकरे गट) चे नगरसेवक प्रकाश मारोटकर, बाळासाहेब राणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे सचिन रिठे, मोहम्मद साजीद, मनोज गावंडे, हितेश शेळके, सर्वेश खेडकर, डॉ. परळीकर, मोहन चोरे, प्रविण चौधरी, अक्षय राणे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर खासदार अमर काळे यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करून शेतकरी व नागरिकांना शासनाची मदत लवकरात लवकर मिळेल, यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

# ..अखेर 'त्या'मुख्य रस्त्याचा झाला कायापालट

**अचलपूर/वार्ताहर**



परतवाडा शहरातील कुटीर रुग्णालय येथे उपचारासाठी अचलपूर तालुक्यातील नव्हे तर मेळघाट सह आजू बाजूला असलेल्या शहरी,ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने येतात.पावसाळ्यात कुटीर रुग्णालयाचा प्रवेश द्वारातील मुख्य रस्त्यावरच अनेक ठिकाणी पाण्याचे डबके,चिखल असल्याने रुग्णांना याचा फटका सहन करावा लागत असल्याचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.याची दखल घेत रस्त्याचा कायापालट झाला आहे.

पायदळ जाणारे नागरिक ,रुग्णवाहिका ,चारचाकी वाहन चालकाना भेडसावत असणाऱ्या समस्यांचा उल्लेख ही या वृत्तात करण्यात आला होता. यानंतर तत्काळ सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर चे कार्यकारी अभियंता प्रमोद वानखडे,तत्कालीन उपकार्यकारी अभियंता अभयकुमार बारब्दे,प्रभारी उपकार्यकारी अभियंता पी.एच.निर्मळ यांनी दखल घेत या मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.यामुळे यंदा पावसाळ्यात दुचाकी ,चारचाकी , ऑटो,रुग्णवाहिका चालकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.यामुळे कुटीर रुग्णालयाकडे प्रवेश द्वारातून जाताना मोठी सुविधा नागरिक ,वाहनचालकांना उपलब्ध झाल्याने नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद वानखडे यांच्या सह उपकार्यकारी अभियंता यांचे कौतुक केले आहे.

एकीकडे कुटीर रुग्णालयात २०० बेड चे नवीन रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. तसेच ट्रामा केअर,नेत्र रुग्णालय आणि अस्थरोग तज्ञ व विविध उपचार केले जातात .यामुळे रुग्णालयात दररोज अनेक रुग्णवाहिका ये-जा करते .तसेच चारचाकी ,ऑटो ,दुचाकी वाहनांची मोठी गर्दी असते.यामुळे तत्काळ या प्रवेश द्वार मधील मुख्य रस्त्याची सुधारणा करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती.आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ दखल घेत या मुख्य रस्त्याचे कायापालट केल्याने नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

# नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन द्या

## ७ ऑगस्ट रोजी मोर्शी तहसील कार्यालयावर निवेदन

**लेहेगाव/वार्ताहर**

राज्यात नियामितपणे पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर सातत्याने अन्याय होत असून, कर्जमाफीच्या योजनांमध्ये प्रामाणिक शेतकरी वारंवार वंचित राहत आहेत. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रत्येक पात्र शेतकऱ्याला किमान दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान जाहीर करावे, या प्रमुख मागणीसाठी ७ ऑगस्ट रोजी मोर्शी तहसील कार्यालयावर निवेदन देण्यात येणार आहे.

शेतीमालाला हमीभाव नसणे, वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता आणि वाढते कर्ज यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा कठीण परिस्थितीतही अनेक शेतकरी वेळेवर कर्जफेड करून आर्थिक शिस्त पाळतात. मात्र, कर्जमाफीच्या निर्णयांमध्ये त्यांना कोणताही लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान म्हणून दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान तातडीने जाहीर करावे, अशी मागणी करण्यात येणार आहे.या मागणीसाठी ७ ऑगस्ट रोजी मोर्शी तहसील कार्यालय येथे शेतकरी, शेतमजूर आणि सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.हे आवाहन अखिल भारतीय किसान सभेचे मोर्शी तालुका सचिव राहुल मंगळे, मोर्शी तालुका काँग्रेस कमिटीचे सूरज अवचार, नरेंद्र फसाटे, निलेश तायडे आणि मंगेश राऊत यांनी संयुक्तपणे केले आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी सर्वांनी पक्षभेद बाजूला ठेवून या निवेदन कार्यक्रमात सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# दर्यापूरच्या साईनगर शाळेत पाणी साचले

## विद्यार्थ्यांचे हाल; राष्ट्रवादी कार्यकर्त्याचे पाण्यात झोपून आंदोलन

**दर्यापूर/वार्ताहर**

शहरातील साईनगर परिसरातील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात गेल्या आठवडाभरापासून झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिले आहे. शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना या पाण्यातूनच ये-जा करावी लागत असल्याने त्यांच्या सुरक्षेला आणि आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. शाळेच्या आवारात चिखल आणि डबकी साचल्याने डासांचा प्रादुर्भावही वाढला आहे. मात्र या गंभीर समस्येकडे नगरपालिका आणि शालेय प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक पालकांनी केला आहे.

या निष्काळजी पणाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दर्यापूर तालुक्यातील कार्यकर्ते शुभम होले यांनी मंगळवारी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. मंगळवार ४ ऑगस्ट रोजी स्वतःचा वाढदिवस असतानाही होले यांनी शाळेच्या प्रांगणात साचलेल्या पाण्यात झोपून आंदोलन केले.'विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होत असताना शाळा करणे योग्य नाही. वारंवार तक्रार करूनही प्रशासन हालचाल करत नाही. मुले पडून आरोग्य बिघडू शकतात किंवा साथीचे आजार पसरू शकतात. जोपर्यंत पाण्याचा निचरा होत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही' असे शुभम होले यांनी सांगितले.या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने पाणी उपसून शाळा परिसर विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित करावा अशी मागणी होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल गहरवार,निलेश पाटील मापारी, राहुल झुंबर, नितीन गावंडे यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेस गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोर्शी विभागाची वीज यंत्रणा झाली वेलीमुक्त

**अमरावती/का.प्र.**

पावसाळ्यात वीजखांब, उच्चदाब व लघुदाब वाहिन्या तसेच रोहित्रांवर वाढणाऱ्या वेली व झुडपांमुळे वीजपुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याबरोबरच अपघाताचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या निर्देशानुसार महावितरणच्या मोर्शी विभागाने विशेष मोहीम राबवून तीन दिवसात ४१९ उच्चदाब, ३६६ लघुदाब वाहिन्या व वीजखांब तसेच १४१ रोहित्रांवरील वेली व झुडपे हटवून संपूर्ण वीज यंत्रणा वेलीमुक्त केली. सुरक्षित, विश्वासार्ह आणि सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनात आणि दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांच्या नेतृत्वात मोर्शी विभागात महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सहभागातून वेलीमुक्त वीज यंत्रणा मोहीम राबविली आणि मोहिमेत विभागातील वीजवाहिन्या, वीजखांब व रोहित्रांवरील वेली आणि झुडपे हटवून वीज यंत्रणा अधिक सुरक्षित करण्यात आली. उपविभागनिहाय करण्यात आलेल्या कामामध्ये मोर्शी उपविभाग-१ मध्ये ४७ उच्चदाब, २८ लघुदाब वाहिन्या व वीजखांब तसेच १३ रोहित्रे वेलीमुक्त करण्यात आली. मोर्शी उपविभाग-२ मध्ये १०२ उच्चदाब, ७३ लघुदाब वाहिन्या व ३७ रोहित्रे, चांदूरबाजार उपविभागात ४८ उच्चदाब, ७७ लघुदाब वाहिन्या व २२ रोहित्रे, वरूड-१ उपविभागात २५ उच्चदाब, १४ लघुदाब वाहिन्या व ०६ रोहित्रे, वरूड-२ उपविभागात १७० उच्चदाब, १२५ लघुदाब वाहिन्या व ४९ रोहित्रे, तर शेंदुरजनाघाट उपविभागात २७ उच्चदाब, ४९ लघुदाब वाहिन्या व वीजखांब तसेच १४ रोहित्रांवरील वेली व झुडपे हटविण्यात आली.

## आयएमए महाराष्ट्रच्या निर्देशानुसार

# अमरावतीची सेवा ६५ ऑगस्टपासून अनिश्चित काळासाठी बंद;आंदोलनाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

आयएमए महाराष्ट्र राज्याने दिलेल्या निर्देशानुसार आयएमए अमरावती शाखेने वैद्यकीय सेवा मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. बुधवार, ५ ऑगस्ट सर्व OPD आणि Elective वैद्यकीय सेवा बंद राहतील. मात्र Emergency वैद्यकीय सेवा सुरू राहतील.गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत : जर सरकारकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद



मिळाला नाही, तर Emergency सेवांसह सर्व सेवा अनिश्चित काळासाठी बंद राहतील.

IMA अमरावती २०२६-२७ ने सर्व सदस्यांना याबतचे महत्त्वाचे नोटीस पत्र जारी केले आहे.हा निर्णय वैद्यकीय व्यवसाय आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या मोठ्या हितासाठी घेण्यात आला आहे, असे IMA ने स्पष्ट केले आहे.

IMA ने सर्व डॉक्टरांना एकत्र येण्याचे आवाहन करत म्हटले आहे - 'आपले हक्क आणि आपले भविष्य यासाठी आपण एकत्र उभे राहूया.' रुग्णांनी ५ आणि ६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या गैरसोयीची नोंद घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वितरण



**अचलपूर**-दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन अचलपूर शाखेतर्फे केले जाते.यामध्ये वृक्षारोपण,आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर,विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वितरण आदी सामाजिक उपक्रमाचा समावेश आहे.याच अनुषंगाने अचलपूर शहरातील राष्ट्रीय प्राथमिक शाळेला अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन अचलपूर शाखेतर्फे भेट देण्यात आली.यात विद्यार्थ्यांशी संवाद ही त्यांनी साधला आणि ७० विद्यार्थ्यांना वही,पेन,पेन्सिल, ड्रॉइंग बुक, कलर बॉक्स चे वितरण करण्यात आले.यावेळी विद्यार्थी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी प्रांतीय उपाध्यक्ष सुमन चौधरी,शाखाध्यक्ष सीमा रावत, उपाध्यक्ष ज्योती तांबी,सचिव शारदा पुरोहित,कोषाध्यक्ष अनीता अग्रवाल,सदस्य राजकुमारी अग्रवाल,मीरा ककरानिया,संध्या ककरानिया,सीमा अग्रवाल,मंजू पटवारी,मालती खुटेटा आदी सदस्य उपस्थित होते.

### एम.के.सी.एल.कौशल्य विकास कार्यशाळा



**अमरावती**-आजच्या स्पर्धातम युगात आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान अत्यंत आवश्यक झाले आहे. विद्यार्थांनी पारंपरिक शिक्षणाबरोबर डिजिटल साधनांचा उपयोग करून आपले ज्ञान अद्यावत ठेवावे. एम के सी एल च्या स्किल कौशल्य विकास च्या कोर्सेस चा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आव्हान प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी केले.व्ही.जी.राईस सेंटर अंतर्गत महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या तर्फे आय लाईक कोर्स अंतर्गत इनक्रेडेबल लर्निंग इनोव्हेशन फॉर नॉलेज इन्फॉर्मेशन या विषयावर माहिती व प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून एमकेसीएलचे बिजनेस डेव्हलपमेंट पार्टनर निलेश बहिरे यांनी विद्यार्थ्यांना राबविण्यात येणाऱ्या विविध कोर्स विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमातून कौशल्यवृद्धी साधवी व रोजगारक्षम बनावे यासाठी या कोर्सेस चे महत्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाला एमकेसीएलचे मॅनेजमेंट इंटर्न कु कल्याणी शिंदे तसेच डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### मोर्शी शहरांमध्ये राष्ट्रीय हत्तीरोग दिन साजरा



**मोर्शी**-उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय हत्तीरोग दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय हत्तीरोग दिनाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर प्रमोद पोतदार तसेच जिल्हा हिवताप अधिकारी डॉक्टर शरद जोगी जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉक्टर जुनेद यांचे मार्गदर्शनाखाली हत्तीरोग दिनाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी श्रीराम नर्सिंग कॉलेज मोर्शी येथे येथील विद्यार्थिनींच्या मार्फत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले तसेच शहरांमध्ये हत्तिरोग जनजागृती करण्यात आली यावेळी रुग्णालयाचे कर्मचारी विनय शेलुरे, प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे, संघपाल कांबळे, नंदू थोरात, ऋषी दहेकर, अक्षय शेवाळे, विनोद डहाके तसेच श्रीराम नर्सिंग कॉलेजचे मुख्याध्यापक राहुल ढवळ व सर्व शिक्षक वृंद हजर होते.

# रेल्वे स्टेशन परिसरातील कार्यालयाचे अज्ञात व्यक्तीने तोडले कुलूप



**अचलपूर/वार्ताहर**

ऐतिहासिक शकुंतला रेल्वे बंद झाल्यानंतर अचलपूर शहरातील रेल्वे स्टेशन परिसराची दुरावस्था झाली.या परीसरात झाडे-झुडपे मोठ्या प्रमाणात असल्याने परिसराला जंगलाचे स्वरूप आले आहे.याचाच फायदा घेत या तिकीट बुकिंग कार्यालयातील कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडल्याचा प्रकार ५ ऑगस्ट रोजी उघडकीस आला.

कार्यालयात बुकिंग क्लर्क दिलीप पाटील हे आज सकाळी आले असता त्यांना हा प्रकार निदर्शनास आला.त्यांनी याबाबतची माहिती रेल्वे पोलिस अधिकाऱ्यांना सुद्धा दिली असून ते पथक सुद्धा समोरील तपास करणार आहे .यात त्या अज्ञात व्यक्तीने रेल्वे तिकीट बुकिंग कार्यालयातील कुलूप तोडून कुलर ची मोटर लंपास केल्याचे समोर आले आहे.सोबतच शासकीय कागदपत्रे परिसरात फेकून वायफाय चे ही केबल तोडले आहे .यामुळे मोठा नुकसान झाला आहे .विशेष म्हणजे या कार्यालयात टिकीट बुकिंग साठी असलेले कॉम्प्युटर सुरक्षित आहे. एकीकडे रेल्वे बंद झाल्यानंतर या परिसराची दुरावस्था झाली असून नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर आहे. या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षारक्षक नेमणुकीची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पोटनिवडणुकांचा अन्वयार्थ !

बिहारमधील बांकीपूर मतदार संघामधील पोटनिवडणूक जिंकून जनसुराज पक्षाचे सर्वेसर्वा प्रशांत किशोर यांनी भाजपाला मोठाच धक्का दिला आहे.हा मतदार संघ १९९५ पासून भाजपाकडे असतानाही, प्रशांत किशोर यांनी तेथून विजय मिळवला हे विशेष.बांकीपूर मतदारसंघातून पुर्वी भाजपाचे अखिल भारतीय अध्यक्ष नितीन नबीन यांचे वडील निवडून येत होते.त्यानंतर नितीन नबीन हे पाच वेळा या मतदारसंघातून निवडून आले आहेत.नितीन नबीन यांची राज्यसभेवर निवड झाली म्हणून त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यामुळे ही पोटनिवडणूक घ्यावी लागली होती.भाजपचा हा बालेकिल्ला असल्यामुळे, पक्षाला या ठिकाणी विजयाची खात्री होती.परंतु प्रशांत किशोर यांनी भाजपच्या उमेदवाराचा पराभव करून भाजपाला आश्चर्यचकित केले आहे.

या निवडणुकीत जनसुराज पक्षाचे सर्वेसर्वा प्रशांत किशोर जेंव्हा स्वतः उतरले तेंव्हा त्यांच्यासाठी कोणतीही गोष्ट अनुकूल नव्हती. २०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकी मध्ये या मतदारसंघात उभ्या असलेल्या जनसुराज पक्षाच्या उमेदवाराला केवळ सात हजारच्या आसपास मते मिळाली होती.त्या निवडणुकीत जनसुराज पक्षाने एकूण २३८ उमेदवार उभे केले होते.त्या पैकी २३६ उमेदवारांना आपली अनामत रक्कम वाचवता आली नव्हती.पक्षाचा फक्त एक उमेदवार निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर होता,तर १२६ उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर होते.त्या निवडणुकी मध्ये जनसुराज पक्षाला केवळ ३.४४ टक्के मते मिळाली होती.५४ मतदार संघांत नोटाला,पक्षाच्या उमेदवारांपेक्षा जास्त मते मिळाली होती.प्रशांत किशोर यांच्या पक्षाला राजकीय पंडितांनी या परिस्थितीत राईट ऑफ करून टाकले होते.

मात्र प्रशांत किशोर यांनी परिस्थिती समोर हार मानली नाही.त्यांनी आपला जनसंपर्क सुरूच ठेवला.२०२२ साली त्यांनी बिहारमध्ये पदयात्रा काढली होती.या पदयात्रेत त्यांनी पाच हजार गावांना भेटी देऊन तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या.आपल्या प्रचारात प्रशांत किशोर यांनी हीच रणनीती अवलंबली होती.त्यांनी शिक्षण, रोजगार आणि नागरी समस्यांवर आपल्या प्रचारामध्ये जोर दिला होता.विशेषत: रोजगार मिळवण्यासाठी बिहारमधील तरुणांना इतर राज्यांत स्थलांतर करावे लागते, ही समस्या किशोर यांनी निवडणूक प्रचारा मध्ये प्रभावीपणे मांडली होती.दिल्लीत झालेल्या जेन-झी आंदोलनाचा फायदा या पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांना निश्चितपणे झालेला दिसत आहे.बिहार मध्येही या आंदोलनाला चांगला पाठिंबा मिळाला होता.



बांकीपूर विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांनी भाजपा उमेदवाराचा सुमारे १९ हजार मतांनी पराभव केला आहे.२०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकी मध्ये,याच मतदार संघातून,भाजपाचे उमेदवार नितीन नबीन हे ५० हजारांहून जास्त मताधिक्य मिळवून निवडून आले होते.त्यांनी तेव्हा राजदच्या उमेदवाराचा पराभव केला होता.महत्वाची गोष्ट ही आहे की राजदच्या उमेदवाराला तेंव्हा ४६ हजारांच्या आसपास मते मिळाली होती.मात्र या खेपेस तिसऱ्या क्रमांकावर गेलेल्या राजदच्या उमेदवाराला १४ हजारांच्या आसपास मते मिळाली आहेत.याचा अर्थ बांकीपूर मधील मतदारांनी फक्त भाजपालाच नाकारले नसून, बिहारमध्ये प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या राजदलाही नाकारले आहे. बहुदा तेथील मतदार,भाजप आणि राजद या दोन्ही प्रस्थापित पक्षांना कंटाळले असावेत, म्हणून त्यांनी कोरी पाटी असलेल्या प्रशांत किशोर यांना निवडून दिले असावे.

बांकीपूर विधानसभा मतदारसंघ हा पुर्वी पाटणा ( पश्चिम ) म्हणून ओळखला जात असे.हा शहरी भागातील मतदार संघ आहे.या मतदारसंघात मध्यमवर्गीय मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.हा मतदारवर्ग पारंपरिकरित्या भाजपाचा कट्टर मतदार मानला जातो.मात्र या पोट निवडणुकीत, प्रशांत किशोर यांनी हा मतदार काही प्रमाणात आपल्याकडे वळवलेला दिसत आहे.बिहारचे माजी मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर एप्रिल २०२६ मध्ये भाजपाचे नेते सम्राट चौधरी हे बिहारचे मुख्यमंत्री बनले.बांकीपूर पोटनिवडणूक ही सम्राट चौधरी यांच्यासाठी कसोटी होती मात्र त्यामध्ये ते फेल झाले आहेत.साधारणपणे राज्यात जो पक्ष सत्तेवर असतो तो पोटनिवडणुकीत विजयी होतो.मात्र बिहारमध्ये पक्षाची इतकी भक्कम स्थिती असताना भाजप पोटनिवडणूक हरला,ही गोष्ट पक्षासाठी चिंता करण्यासारखी आहे.प्रशांत किशोर यांनी तर, सम्राट चौधरी यांची मुख्यमंत्री पदावरून उचलबांगडी करण्याचा सल्ला भाजपा नेतृत्वाला दिला आहे.

मध्यप्रदेशातील दातिया मतदारसंघा मधील पोटनिवडणुकीतही भाजपाचा पराभव झाला आहे.हा मतदारसंघ गेली काही वर्षे कॉंग्रेसचा बालेकिल्ला राहिला असला तरी,भाजपाची मध्यप्रदेशातील मजबूत स्थिती लक्षात घेता, या ठिकाणी भाजपचा झालेला पराभव चिंताजनक आहे.राज्याचे मुख्यमंत्री मोहन यादव यांचे नेतृत्व कुठे तरी कमी पडले,असा निष्कर्ष त्यातून काढावा लागेल.गुजरात मधील मांजलपूर मतदार संघातील पोट निवडणुकीत भाजप उमेदवाराचा विजय झाला आहे.हा विजय भाजपला दिलासा देणारा आहे.

गुजरात हा १९९५ पासून भाजपचा बालेकिल्ला राहिला आहे. सध्या १८२ सदस्य असलेल्या गुजरात विधानसभेमध्ये भाजपाचे १६२ आमदार आहेत तर कॉंग्रेसचे केवळ १२ आमदार आहेत.अशा परिस्थितीत मांजलपूर मतदार संघात भाजपाने जो विजय मिळवला तो आश्चर्य करण्यासारखा नाही.गेली अनेक वर्षे गुजरातमध्ये कॉंग्रेसची जी घसरगुंडी सुरू आहे ती अद्याप थांबलेली नाही,हे वास्तव पोट निवडणुकीतील कॉंग्रेसच्या पराभवाने पुरेसे अधोरेखित झाले आहे.बांकीपूर पोटनिवडणुकीतील पराभव मात्र भाजपने गंभीरपणे घ्यायला हवा आणि पराभवाचे सखोल आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

**अभय गोखले**

# सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व:भैय्यासाहेब पुजदेकर



आज श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे उपाध्यक्ष, माजी जिल्हा सरकारी वकील, ज्येष्ठ विधीज्ञ, उत्कृष्ट शेतकरी जयवंत उर्फ भैय्यासाहेब विनायकराव पाटील पुजदेकर यांचा आज वाढदिवस.आमचे पुजदा, जिल्हा अमरावतीतील खानदानी श्रीमंती असलेले व पिकाऊ भारी जमीन असलेले,गाव ,जमीन धारणा पण सरासरी भरपूर,परिणामी आधीपासूनच उंचावलेले राहणीमान.याच गावात ५५०० एकर शेतीचे मालक व बँकर असलेले स्व वामनराव आनंदराव पाटील हे दानशूर ,धार्मिक, व सावकारी व्यवसाय असून सुद्धा सामाजिक दायित्व व संवेदशिल व्यक्तिमत्त्व होते. त्या काळी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. डॉ भाऊसाहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना बहुजन समाजातील शेतकरी कष्टक-यांचे मुलांना शिक्षण मिळावे हा उद्देश ठेवून केली,त्यासाठी ज्या मोजके लोकांनी आर्थिक व इतर मदत केली,त्यात मुख्य आश्रयदाते म्हणून त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते.गावात भव्य राम मंदिर बांधून मंदिराचे देखभालीसाठी १०० एकर जमीन देवून भव्य राम जन्मोत्सव सुरू केला. स्व वामनराव पाटील,यांनी ब्रिटिश सरकारचे कायदे सावकारांच्या बाजूने असताना कधीच शेतकऱ्याची जमीन ताब्यात न घेता,त्याला उध्वस्त न करता,तडजोडी व सवलती देवून अनेक शेतकऱ्याना भूमिहीन होण्यापासून वाचवले. त्या तडजोड चेअनेक शेतकरी लाभार्थी होते,त्यामुळे आज त्यांच्या पुढील पिढ्या जमिनी कायम ठेवून समृध्द जीवन जगत आहेत.

त्यांचेच पुत्र स्व. नानासाहेब उर्फ विनायकराव पाटील यांनी हाच वारसा कायम ठेवून सामाजिक बांधिलकी जपून श्रीराम मंदिर व श्रीराम नवमी जन्मोत्सव सुरू ठेवत,तेव्हढीच भव्यता या उत्सवाची कायम ठेवली.हा उत्सव आधी ७दिवस चालत असे,गाव पाहुणे मंडळी नी भरून जाई,बहुरूपी कोल्हाटी ,याना इनामे जमिनी देवून त्यांची सेवा श्रीराम चरणी रुजू होत होती.तोच वारसा आज भैय्यासाहेब चालवत आहे.आजही रामनवमी उत्सव तेव्हढेच उत्साहात सुरू आहे,पण काळाचे ओघात मनोरंजनाची साधने वाढली,दळणवळण जलद झाले.त्यामुळे हा उत्सव १दिवस वर आला.त्याचे महत्व पंचक्रोशित तेव्हढेच आहे. हा वारसा भैय्यासाहेब चालवत आहेत,ॲड असताना अनेक गरीब लोकांना कायदा विषयक मदत मोफत दिली आहे,सरकारी जमिंनविष्यक अनेक कायदे आले,भूदान, कुळ कायदा,२वेळ सीलिंग कायदा यामुळे शेतीच क्षेत्र कमी झाले,तरी आजही भरपूर जमिनीची मालकी त्यांचेकडे आह. शेती करता गावाशी, गावकऱ्यांशी सतत संपर्क असतो. अमरावतीला कॅम्प परिसर मधला दीड एकर मधला बंगला,प्रभात टॉकीज समोर ची पुजदेकर बिल्डिंग(नुकतीच ती शिकस्त झाली म्हणून पडली आहे) आमचे पुजदेकरांच्या वैभवाची साक्ष देतात.

श्री भैय्यासाहेब यांची श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली. तिथे पण,अध्यक्ष व कार्यकारिणी सोबत,भाऊसाहेबांच्या विचाराने ही संस्था चालावी हीच धडपड कायम दिसून येते.ॲड भैय्यासाहेब हे अमरावती

# ‘ढवळ्या’पाशी बांधला ‘पवळ्या’.....!

दिवसेंदिवस अत्यंत ‘नीच’ पातळी गाठत असणा-या आजच्या ‘गलिच्छ’ राजकारणात हाताच्या बोटावर मोजण्याइतके काही सुसंस्कृत नेते शिल्लक राहिले आहे, असे म्हणणे चुकीचे ठरू नये. अशी ही मोजक्या नेत्यांची यादी राज ठाकरे यांच्याशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. बाळासाहेब हयात असताना छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणे या निष्ठावान शिवसैनिकांनी आपल्या काही सहका-यांसह तत्कालीन ‘शिवसेना’ सोडून दुस-या पक्षांत प्रवेश केला.काही वर्षांनंतर राज यांनीही ‘विठ्ठलाच्या आजुबाजूला असणा-या बडव्यांना’ कंटाळून शिवसेनेला अखेरचा ’जय महाराष्ट्र’ केला. दुस-या कोणत्याही पक्षात न जाता त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजत काढून ‘मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा’ अशी गर्जना करत, स्वतःचा ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेना’ नावाचा पक्ष स्थापन केला. महाराष्ट्राच्या ‘नवनिर्माणा’चे स्वप्न दाखवल्याने अनेक नागरिक विशेषतः युवापिढी त्यांच्याकडे आकर्षित झाली. परिणामी, पदार्पणातच नाशिककरांनी महापालिकेची सत्ता त्यांच्या हाती सोपवली. विधानसभेतही १३ आमदार निवडून आले. ‘तो आला, त्याने पाहिले आणि त्याने जिंकून घेतले’ याप्रमाणे इतर सर्वच पक्षांना त्यांच्या पक्षाची नोंद घ्यावी लागली. पण, पुढे ‘कोठे माशी शिंकली’ ? हेच समजले नाही. ज्या वेगाने पक्षाला ’भरती’ आली होती, त्याच वेगाने अल्पकाळातच ‘ओहोटी’ही लागली. महत्त्वाचे नेते, आमदार, नगर सेवक, पदाधि कारी व कार्यकर्ते त्यांना सोडून गेले. पुढे तर पक्षाचा एकच आमदार निवडून आला. नंतर भोपळाही फोडता आला नाही. तर, खुद्द अमित ठाकरेंनाही निवडून आणता आले नाही. पहिल्या विजयाने आलेला अहंकार, अर्धवट आंदोलने आणि सतत बदलत जाणा-या राजकीय भूमिका या कारणांनी त्यांची ‘पीछेहाट’ झाल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात. आजही त्यांच्या सभांना लाखोंची गर्दी होते. पण, दुर्दैवाने त्या गर्दीचे मतांत रुपांतर होत नाही. याविषयीची खंत त्यांनी अनेकवेळा बोलून दाखवली. तर, काही वेळेस तसा संतापही त्यांनी व्यक्त केला आहे, असो.



शनिवार दिनांक १ रोजी ‘महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेने’चा वर्धापन दिन होता. अमित ठाकरेंचा कार्यक्रम असला तरी, राज यांनी आजच्या ‘जेन-झी’ला मार्गदर्शन करावे, यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. राज यांनी नेहमीप्रमाणेच आक्रमक भाषण केले. ‘कॉक्रोच जनता पक्षा’च्या आंदोलनावर बोलताना, त्यांनी ज्या ‘उपद्रवी’ झुरळांनी मोदी व त्यांच्या दिवंगत आईविषयी जी ‘अश्लाघ्य’ भाषा वापरली, त्याबाबत नापसंती दर्शवली. पण, ‘इतरांनाही आई असते’ हे मोदींनी त्यांच्या पक्षातील लोकांनाही सांगावे, असा सल्ला देण्यास मात्र ते विसरले नाहीत.आंदोलक विद्यार्थ्यांनी पोलिसांवर केलेल्या दगडफेकीवर भाष्य करतांना, उच्चतंत्रज्ञान शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ‘दगडांवरील मुलांचे ‘फुट प्रिंट’ पोलिसांनी गोळा केले असून, ते आधार कार्डशी जोडणार आहेत. व संबंधित मुलांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत’ असे वक्तव्य केले होते. यात दादांना ‘फिंगर प्रिंट्स’ म्हणायचे होते. पण, अनवधानाने ते ‘फुट प्रिंट्स’ असे बोलून गेले. त्यांच्या या चुकीच्या शब्दाचा धागा पकडून दादांची टर उडवली.

राज साहेब, चंद्रकांत दादा अनवधाना ने एखाद वेळेस चुकीचे बोलून गेले असतील, त्याचे एवढे भांडवल करण्याची खरेच गरज होती का? त्याच दरम्यान, संसदेत ‘पेपरफुटी’वर बोलताना ‘अतिविद्वान’ खासदार (?) प्रियंका गांधी यांनी ‘गेल्या १० वर्षांत ’११५ वेळा पेपर फुटला. आणि त्यामुळे देशातील ७५० कोटी विद्यार्थी प्रभावित झाले’ असे आपल्या नसलेल्या‘अकलेचे तारे’ तोडले.१४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात ७५० कोटी विद्यार्थी आहेत, असा ‘जावईशोध’ लावून आपण ‘टपोरी’ राहुल गांधीची बहीण आहे, हे सिद्ध केले. यावर तुम्ही काहीच बोलला नाहीत? राजकारणात अर्धवट ज्ञान असणा-या व अर्धवट माहितीवर टीका करणा-या ‘अर्धवटरावां’ची किती ‘खोगीरभरती’ आहे, हे तुम्हाला चांगलेच ज्ञात असावे. आपल्या मराठीत ‘असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ’ अशी एक म्हण आहे. वाईट, अर्धवट आणि बेअक्कल लोकांशी हातमिळवणी केल्यास मन:शांतीही जाते आणि अनेक संकटांनाही सामोरे जावे लागते, असा त्याचा अर्थ होतो. थोडक्यात, ‘ढवळ्याशेजारी बांधला पवळ्या, वाण नाही पण गुण लागला’ असे आम्ही आता समजायचे का? हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
भ्रमणध्वनी-
८७६७५९२९८०

## त-ड-का

### अतिक्रमण समस्या

अतिक्रमणाच्या समस्येला
यंत्रणाच आहे कारणीभूत
बुड टेकवताच -
कां म्हणत नाही बरं उठ..!

गावोगावी आहे ना
प्रशासन यंत्रणा?
वेळीच दखल घेत नाही
म्हणूनच समस्या उदभवते
हे खरं आहे ना..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३

# ...जात विसरा!

जातींची निर्मिती कोणी केली आणि ती इतरांवर लादली या मताला काही अर्थ नाही. इतिहासकाळात जसे नवीन व्यवसाय निर्माण झाले तसे नवीन व्यवसाय संघ निर्माण झाले. जे व्यवसाय संपले ते संघ नष्ट झाले आणि त्या व्यवसायातील लोक दुस-या व्यवसायात पडले.जाती जन्माधारित नव्हत्या. पण पुढे आर्थिक अरिष्टाने आणि सलग दुष्काळामुळे कायम झाल्या. यालाही शासनव्यवस्था किंवा कोणतीही धर्मव्यवस्था जबाबदार नव्हती तर ती लोकांचीच अपरिहार्य गरज होती.

इतिहास काळात व्यवसायच संपल्याने नष्ट झालेल्या जाती...हलिक भोगिक, ओदयांत्रिक, तेसकार, धम्निक, मिठीक, सुत, रथकार इत्यादी अशा अनेक.

गेल्या चार हजार वर्षात नव्याने निर्माण झालेल्या जाती- तांबट (तांब्याचा शोध) लोहार (लोखंडांचा शोध) विणकर व तत्संबंधी जाती (विणकामाचा शोध), इत्यादी, नवे शोध लागले वा सेवा निर्माण झाल्या तसे नव्या व्यावसायिक जाती निर्माण झाल्या. ज्या जातींचे उल्लेख वा तत्सम व्यवसायांचेही प्राचीन उल्लेख मिळत नाही अशा काही जाती दहाव्या शतकानंतरही निर्माण होतांना दिसतात.हे नवजाती निर्माण होत असतांना त्यात प्रवेश णारे लोक आधी कोणत्या ना कोणत्या व्यावसायात म्हणजे जातीत होते. याचाच अर्थ जातीबदल/ व्यवसायबदल होत होता.

नवीन व्यवसाय जन्माला आला कि नव्या व्यावसायिक जाती बनणे आणि व्यवसाय नष्ट झाला तर जातीही नष्ट होणे हा क्रम पूर्वापार होता.अशा स्थितीत जाती अपरिवर्तनीय आहेत आणि अनादी अजरामर आहेत असे मानण्यात काय अर्थ आहे?थोडक्यात जात विसरा!

**संजय सोनवणी**

# आरोग्याकडे पाहण्याचा एक समग्र दृष्टिकोन

आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याच्या समस्या झपाट्याने वाढताना दिसत आहेत. मधुमेह, लठ्ठपणा, थायरॉईडचे विकार, पीसीओएस, पचनाचे त्रास, निद्रानाश, ताणतणाव, फॅटी लिव्हर, वाढते वजन किंवा सततचा थकवा या समस्या आता फक्त वयस्करांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. तरुण पिढीही याचा मोठ्या प्रमाणावर सामना करत आहे.या परिस्थितीत अनेक रुग्णांचा प्रवास जवळजवळ सारखाच असतो. आहारासाठी एक तज्ज्ञ, तपासण्यांसाठी दुसरी प्रयोगशाळा, व्यायामासाठी वेगळे ठिकाण, योगासाठी दुसरी संस्था आणि शरीराला विश्रांती देणाऱ्या उपचारांसाठी पुन्हा वेगळी जागा. या सगळ्या प्रवासात एक प्रश्न मात्र कायम राहतो.या सर्व गोष्टी एकत्रितपणे, नियोजनबद्ध पद्धतीने आणि व्यक्तिनिहाय का मिळू शकत नाहीत?

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे एवढाच त्याचा अर्थ नाही. शरीर, मन, आहार, झोप, व्यायाम, पचनसंस्था, ताणतणाव, दैनंदिन सवयी आणि योग्य तपासण्या या सर्व गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात. त्यामुळे दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी फक्त औषधोपचार पुरेसे नसतात; योग्य जीवनशैली आणि वैज्ञानिक मार्गदर्शन यांचीदेखील तितकीच गरज असते.याच विचारातून अमरावतीमध्ये ‘रेनोव्हा हेल्थ’ या समग्र आरोग्य व वेलनेस केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे.रेनोव्हा हेल्थमध्ये विविध आरोग्यसेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला तिच्या गरजेनुसार वैयक्तिक आणि समन्वित मार्गदर्शन मिळू शकेल.

वैयक्तिक आहार व जीवनशैली मार्गदर्शन-प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, जीवनशैली, कामाचे स्वरूप, आहाराच्या सवयी आणि आरोग्याच्या गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे येथे सर्वांसाठी एकच आहार योजना न देता, व्यक्तिनिहाय समुपदेशन केले जाते. वजन नियंत्रण, मधुमेह, पीसीओएस, थायरॉईड, पचनाचे विकार, मेटाबॉलिक आरोग्य, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि निरोगी वृद्धत्व अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते.


आधुनिक व वैयक्तिकृत तपासण्या-योग्य उपचारासाठी योग्य माहिती आवश्यक असते. त्यामुळे आवश्यकतेनुसार न्युट्रिजेनेटिक टेस्टिंग, गट मायक्रोबायोम टेस्टिंग तसेच विविध पॅथॉलॉजी तपासण्या उपलब्ध आहेत. या तपासण्यांचा उद्देश




व्यक्तीच्या आरोग्याबाबत अधिक सखोल माहिती मिळवून वैयक्तिकृत मार्गदर्शन करण्यास मदत करणे हा आहे.

डिटॉक्स आणि रिकव्हरी स्टुडिओ-रेनोव्हा हेल्थमधील डिटॉक्स स्टुडिओमध्ये कोलन हायड्रोथेरपी, इन्फ्रारेड सॉना, लिम्फॅटिक ड्रेनेज थेरपी तसेच इतर निवडक रिलॅक्सेशन आणि बॉडी थेरपी सुविधा उपलब्ध आहेत. प्रत्येक उपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आणि व्यक्तीच्या आरोग्यस्थितीचा विचार करूनच दिला जातो. या सेवा वैद्यकीय उपचारांचा पर्याय नसून, योग्य व्यक्तींमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीला पूरक ठरू शकतात.मूव्हमेंट आणि मन-शरीर आरोग्य-फक्त योग्य आहार पुरेसा नसतो; नियमित हालचाल, स्नायूंची ताकद, शरीराची लवचिकता, श्वसन आणि मानसिक संतुलन यांचाही आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. यासाठी येथे योग, स्ट्रेंथ ट्रेनिंग, झुंबा, ध्यान, प्राणायाम आणि इतर मार्गदर्शित सत्रांची सुविधा उपलब्ध आहे.

आरोग्य शिक्षणालाही तितकेच महत्त्व-रेनोव्हा हेल्थचा उद्देश केवळ सल्ला देणे किंवा उपचार करणे एवढाच नाही. लोकांनी स्वतःच्या शरीराला समजून घ्यावे, योग्य प्रश्न विचारावेत आणि आरोग्याबाबत सजग व्हावे, यासाठी विविध जनजागृती उपक्रम, कार्यशाळा आणि आरोग्यविषयक माहिती सातत्याने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.आजच्या काळात लोकांना केवळ आजार बरा करणारी सेवा नको आहे; त्यांना स्वतःचे आरोग्य समजून घेण्याची संधी हवी आहे. विज्ञानाधारित माहिती, वैयक्तिक मार्गदर्शन, योग्य तपासण्या, संतुलित आहार, नियमित हालचाल आणि आवश्यक त्या वेलनेस सेवांचा समन्वय साधणारे केंद्र म्हणजे रेनोव्हा हेल्थ.ही लेखमाला आरोग्याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. पुढील लेखांमध्ये आपण आहार, हार्मोन्स, पचनसंस्था, गट मायक्रोबायोम, न्युट्रिजेनेटिक्स, डिटॉक्स, ताण-तणाव, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि आधुनिक जीवनशैलीशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर सोप्या भाषेत चर्चा करू.



**डॉ. ऋतुजा देशमुख**
एम.बी.बी.एस./एम.डी.(पॅथॉलॉजी)
/एम.एस्सी. (फूड अँड न्यूट्रिशन)
फंक्शनल मेडिसिन
प्रॅक्टिशनर/न्युट्रिजेनेटिक्स एक्स्पर्ट
रेनोव्हा हेल्थ
Healing Beyond the Symptoms
अमरावती.

# 'तुझा मुलगा मरणार आहे का?' प्रकरणाची दखल; सीएमओची तात्काळ उचलबांगडी

■ आ. साजिद पठाण यांच्या हस्तक्षेपानंतर जीएमसी प्रशासनाची धावपळ
■ डीनकडून कडक इशारा ■ चौकशी समिती गठित

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) यांनी एका आजारी चिमुकल्याच्या आईशी कथितपणे केलेल्या अमानुष आणि अवमानकारक वक्तव्याची बातम्या बुधवारी प्रसिद्ध होताच अखेर जीएमसी प्रशासनाला कारवाईची चाके फिरवावी लागली. 'तुझा मुलगा मरणार आहे का? मला सलाईन लावता येणार नाही... तुला जेथे तक्रार करायची आहे तेथे कर,' असे कथित वक्तव्य केल्याचा गंभीर आरोप असलेल्या डॉ. पुरुषोत्तम हंबर्डे यांना तात्काळ अपघात कक्षातून हटवून इतरत्र बदली करण्यात आली असून, संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समितीही गठित करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनीही कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध चौकशी करून कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर अवघ्या काही तासांत प्रशासनाने हालचाली सुरू केल्याने या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित झाली आहे.

रुग्णालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या आशा शेख बशीर यांनी आपल्या आजारी मुलाला उपचारासाठी नेल्यानंतर सीएमओंकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा गंभीर आरोप केला होता. उपचाराऐवजी उद्धट भाषा वापरल्याचे त्यांनी लेखी तक्रारीत नमूद केले असून, सात दिवसांत न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशाराही दिला होता. या धक्कादायक तक्रारीने जिल्हाभरात संतापाची लाट उसळली होती.

**सीएमओ हटविले; चौकशी समितीची स्थापना**

या प्रकरणाची दखल घेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने यांनी डॉ. पुरुषोत्तम हंबर्डे यांना अपघात कक्षातून तात्काळ हटवून इतरत्र बदली करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच तक्रारदार महिलेची सविस्तर बाजू ऐकून निष्पक्ष चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रविण सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, सदस्य म्हणून डॉ. अभय बागुल (प्राध्यापक व विभागप्रमुख, बालरोगशास्त्र), डॉ. धोडीबा भिसे (प्राध्यापक व विभागप्रमुख, टीबी व चेस्टरोग विभाग), डॉ. रवी खंडारे (सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकित्सा विभाग) आणि श्रीमती ग्रेसी अगस्तीन (अधिसेविका) यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



**आमदार पठाण यांच्या पाठपुराव्याला यश**

या प्रकरणात आमदार साजिद खान पठाण यांनी अधिष्ठात्यांना अधिकृत पत्र पाठवून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध सखोल चौकशी करून चौकशी पूर्ण होईपर्यंत सेवेतून निलंबित करण्याची मागणी केली होती. त्यानंतर लगेचच सीएमओची अपघात कक्षातून बदली आणि चौकशी समितीची घोषणा झाल्याने प्रशासनावर वाढत्या दबावाची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, केवळ बदलीवर प्रकरण संपणार की दोषी आढळल्यास कठोर शिस्तभंगाची कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**डीनचा सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना कडक इशारा**

या घटनेनंतर डीन डॉ. संजय सोनुने यांनी जीएमसीमधील सर्व सीएमओ, डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी कोणत्याही परिस्थितीत गैरवर्तन, उद्धट वागणूक किंवा अवमानकारक भाषा वापरली जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. 'यापुढे रुग्णांसोबत गैरवर्तन केल्यास कठोर कारवाईसाठी तयार राहावे,' असेही त्यांनी बजावले आहे.

**बदली हा उपाय की कारवाईची सुरुवात?**

रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका आजारी मुलाच्या आईशी गैरवर्तन झाल्याचा आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. त्यामुळे केवळ अपघात कक्षातून बदली हा अंतिम उपाय ठरणार नाही, तर चौकशी अहवालात आरोप सिद्ध झाल्यास जबाबदार अधिकाऱ्याविरुद्ध कठोर प्रशासकीय कारवाई होते का, यावरच जीएमसी प्रशासनाची विश्वासार्हता अवलंबून राहणार आहे. गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना सन्मानाने उपचार मिळणे हा त्यांचा अधिकार असून, अशा घटनांमुळे सरकारी आरोग्य व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# आजच्या मनपा सभेत विकासाचा 'मेगा अजेंडा'

## ११.४४ कोटींच्या NCAP निधीला मंजुरी?; रेन वॉटर हार्वेस्टिंग, ओपन जिम, सिटी गॅस, जाहिरात धोरणासह अनेक महत्त्वाचे प्रस्ताव पटलावर

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज गुरुवार (दि. ६) रोजी सकाळी ११.३० वाजता होत असून, शहराच्या विकासाचा रोडमॅप ठरविणारे अनेक महत्त्वाचे विषय सभेपुढे येणार आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत ११.४४ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी, सिटी गॅस नेटवर्क विस्तार, नगरोत्थान महाअभियानाचा निधी, दलितेत्तर वस्ती सुधार योजनेचे नियोजन अशा विविध विषयांवर चर्चा होणार असल्याने या सभेकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

सभेच्या प्रारंभी १२ मे २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताला चर्चा करून मंजुरी दिली जाणार आहे. त्यानंतर खासदार अनुप धोत्रे यांच्या सीएसआर उपक्रमातून शहरातील विविध ठिकाणी ओपन जिम उभारण्यासाठी प्रस्तावित जागांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात येणार आहे. तसेच गीता नगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिरासमोरील जागा मदर डेअरी बूथसाठी उपलब्ध करून देण्याबाबतही निर्णय अपेक्षित आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रभाग क्रमांक १, ७, १० आणि १८ मधील विविध विकासकामांना मंजुरी देण्याबरोबरच शहरातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जलपुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) योजना राबविण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्तावही चर्चिला जाणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या ११.४४ कोटी रुपयांच्या निधीतून विविध कामांना हिरवा कंदील मिळण्याची शक्यता आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दुभाजकांवरील विद्युत खांबांवर जाहिरात फलक लावण्यासाठी स्वतंत्र जाहिरात धोरण निश्चित करण्याचा प्रस्तावही चर्चेत राहणार आहे. याशिवाय महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक अपघात विमा आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य विमा योजनेवरही निर्णय घेतला जाणार आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार शहरात सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन नेटवर्कचा विस्तार करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात येणार आहे. तसेच नगरोत्थान महाअभियान आणि दलितेत्तर वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे नियोजन करून विविध विकासकामांना गती देण्याबाबतही चर्चा होणार आहे.

स्थानिक विकासाच्या दृष्टीने प्रभाग क्रमांक १९ मधील शिवशक्ती गणेश घाट व देवी घाट येथे नवीन पथदिवे बसविणे, प्रभाग क्रमांक ७ मधील गौरक्षण भागात सबमर्सिबल पंप व नवीन एचडीपीई जलवाहिनी टाकणे, तसेच प्रभाग क्रमांक २ मध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम चौकात कमान आणि भगवान गौतम बुद्ध मार्गावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार उभारण्याच्या प्रस्तावांवरही शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सदस्यांच्या विशेष चर्चेसाठी मोकाट श्वानांचा वाढता उपद्रव, श्वान निर्बिजीकरण, रेबीज लसीकरण, श्वान निवारा केंद्र आणि मोकाट जनावरे पकडण्याच्या कार्यवाहीचा विषय पटलावर ठेवण्यात आला आहे. शहरातील नागरिकांसाठी हा प्रश्न अत्यंत संवेदनशील ठरत असल्याने या चर्चेकडे विशेष लक्ष लागले आहे. आजची सर्वसाधारण सभा ही केवळ नियमित कामकाजापुरती मर्यादित न राहता शहराच्या विकासाचा पुढील आराखडा निश्चित करणारी ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांची प्रकृती स्थिर; गंभीर शस्त्रक्रियेवर जिद्दीने मात

## मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू गुलाबराव गावंडे यांची प्रकृती सध्या स्थिर असून अमरावती येथे मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात (ICU) उपचार सुरू असून वैद्यकीय तज्ज्ञांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू भाऊ गुलाबराव गावंडे हे अमरावती येथे एका विवाह सोहळ्यासाठी गेले असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला तसेच तीव्र डोकेदुखीचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना तातडीने अमरावती येथील रेनबो इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात त्वरित सिटीस्कॅन करण्यात आल्यानंतर मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे निदान झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन न्यूरोसर्जन डॉ. स्वरूप गांधी, डॉ. अजिंक्य जामटे आणि डॉ. श्याम राठी यांच्या तज्ज्ञ पथकाने तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सुमारे तीन तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे मेंदूतील रक्तस्त्राव नियंत्रणात आणण्यात आला. ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून गावंडे यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत असल्याची माहिती मिळाली आहे. गुलाबराव गावंडे हे राज्याचे माजी क्रीडामंत्री तसेच जनसामान्यांशी घट्ट नाळ जोडलेले लोकनेते म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय स्तरावरील कबड्डीपटू म्हणून त्यांनी क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. वयाच्या ७४ व्या वर्षीही ते सामाजिक, धार्मिक, राजकीय तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होत असतात. शस्त्रक्रियेदरम्यान त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने अमरावती येथे उपस्थित होते. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी राज्यभरातील समर्थक आणि हितचिंतकांकडून प्रार्थना व्यक्त करण्यात येत आहेत.



**आजारांनाही पराभूत करणारा लढवय्या!**

राजकारण, समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे माजी क्रीडामंत्री गुलाबराव गावंडे हे खऱ्या अर्थाने लढवय्या व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय कबड्डीपटू म्हणून मैदानावर अनेक आव्हानांवर मात करणाऱ्या गावंडे यांनी सार्वजनिक जीवनातही जनतेशी कायम घट्ट नाळ जपली आहे. अचानक उद्भवलेल्या मेंदूतील रक्तस्त्रावासारख्या गंभीर आजारावर यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांनी पुन्हा एकदा जिद्दीने मात करण्याची चिन्हे दाखवली आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत. मैदानावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करणारा हा लढवय्या नेता, स्वतःवर आलेल्या संकटालाही त्याच जिद्दीने पराभूत करत आहे, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

## सुनेत्रा पवारांवरील वक्तव्याचा निषेध

# अकोल्यात राष्ट्रवादीचे 'जोडे मारो' आंदोलन




**अकोला** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याविरोधात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्याचा आरोप असलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद अकोल्यात उमटले. या वक्तव्याचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अकोला शहर व ग्रामीण जिल्हा संघटनेच्या वतीने बुधवारी 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष कृष्णाभाऊ अंधारे यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेश उपाध्यक्ष मदन भैया भरगड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आंदोलनात कार्यकर्त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या छायाचित्रास जोडे मारून निषेध व्यक्त केला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या.

महिलांचा अवमान करणारी तसेच राजकीय संस्कृतीला न शोभणारी वक्तव्ये कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाहीत. अशा प्रकारच्या वक्तव्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तीव्र शब्दांत निषेध करीत असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या आंदोलनात प्रदेश उपाध्यक्ष मदन भैया भरगड, प्रदेश सरचिटणीस मंदाताई देशमुख, राधाताई बिडकर, प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मीबाई सरिसे, माजी महिला जिल्हाध्यक्ष रुपाली वाकोडे, जिल्हा महासचिव विनोदभाऊ थुटे, बाळासाहेब तायडे, सुरेश रामेकर, गजानन पाटील, रामा अमानकर, गौरव देशमुख, राजेश मालोकर, रश्मी पाटेकर, कल्पना बिडवे, सिंधुताई पवार, काशिनाथ पाटेकर, दीपक गावंडे, सुधीर साखरकर, शंकर कंकाळ, दीपक नाकट यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीएचएमएस-सीसीएमपी नोंदणीच्या विरोधात वैद्यकीय सेवा राहणार बंद

**अकोला** : वैद्यकीय क्षेत्र सध्या अत्यंत विचित्र संक्रमण अवस्थेतून जात आहे. हे सरकार डोकं फिरल्यासारखं काहीही निर्णय घेत आहे. मूळतः कसल्याही प्रकारची गरज नसताना ब्रिज कोर्स काढून बीएचएमएस पदवीधारकांना सीसीएमपी कोर्स द्वारे एलोपॅथी प्रैक्टिस ची परवानगी देण्याचा केविलवाणा प्रयत्न हे सरकार करत आहे. मुलतः या दोन्ही पॅथी वेगवेगळ्या तत्त्वांवर आधारित आहेत, वेगवेगळ्या पद्धतीने उपचार करतात. दोन्ही पॅथी आपल्या जागी श्रेष्ठ असताना सरकार ही सरमिसळ करून काय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे? असा सवाल आयएमएच्या वतीने व्यक्त करण्यात आला. स्थानीय आयएमएच्या वतीने बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत शासन एलोपॅथी आणि होमियोपॅथी ची करीत असलेल्या संदर्भात राज्य व केंद्रीय आयएमएच्या वैद्यकीय आंदोलन संदर्भात माहिती दिली.

# कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक शब्बीर अहमद खान यांचा सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

**भावपूर्ण निरोप समारंभ संपन्न**

जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, मजलापूर येथील कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक शब्बीर अहमद खान बशीर अहमद खान हे ३१ जुलै २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यानिमित्त शाळा परिसरात त्यांचा भावपूर्ण निरोप व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ तसेच दापुरा केंद्राचे केंद्रप्रमुख पुंडलिक भदे यांच्यासह केंद्रातील शिक्षक-शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शब्बीर अहमद खान यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला उजाळा देत त्यांच्या कर्तव्यनिष्ठ, विद्यार्थीप्रिय व आदर्श कार्यपद्धतीचे कौतुक केले. शाळा व केंद्राच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात शब्बीर अहमद खान यांनी सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सर्व सहकारी, विद्यार्थी, ग्रामस्थ व उपस्थितांचे आभार मानले.

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७९/२०२६ — प्रोसेस नं.९५३२/२०२६
चौ.ता. ०३/०९/२०२६ — दिनांक : २७/०७/२०२६

**अर्जदार :** १. सुभाष वामनराव मुळे २. श्रीमती पुष्पा सुभाष सरडे (लग्नानंतरचे नाव) पुष्पा वामनराव मुळे. (लग्नाआधीचे नाव) दोघे रा. रेणुका नगर, गल्ली नं. ३, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. वामनराव तुकाराम मुळे २. वच्छलाबाई वामनराव मुळे
**पत्ता :-** रा. रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वामनराव तुकाराम मुळे यांचे दि. १३/ ११ / १९९४ रोजी व मयत वच्छलाबाई वामनराव मुळे यांचे दि. ०८/०४/२०१४ रोजी राहत्या घरी रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०६/२०२६ — प्रोसेस नं.९६७९/२०२६
चौ.ता. ०८/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. संजय सुखदेवराव चौधरी रा. आनंद नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला. २. यमुना नारायण शहापुरे रा. खंडेलवाल भवन जवळ, आळशी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुखदेवराव उमाजी चौधरी २. शांताबाई सुखदेवराव चौधरी
**पत्ता :-** रा. आनंद नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखदेवराव उमाजी चौधरी यांचे दि. २४/०१/२०२६ रोजी व मयत शांताबाई सुखदेवराव चौधरी यांचे दि. २५/०८/२०२१ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्रं मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२३३/२०२६ — प्रोसेस नं.९५३४/२०२६
चौ.ता. ०३/०९/२०२६ — दिनांक : २७/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. दुर्गा विशाल धमेरिया २. कु. वैष्णवी विशाल धमेरिया दोघेही रा. बाप्पु नगर, आपातापा रोड, शिव मंदिराजवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विशाल गोविंद धमेरिया
**पत्ता :-** रा. शिव मंदिर जवळ, बाप्पु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विशाल गोविंद धमेरिया यांचे दि. १२/०५/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२६०/२०२६ — प्रोसेस नं.९९३७/२०२६
चौ.ता. २१/०९/२०२६ — दिनांक : ०१/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रामकली नानकु शुक्लवारे २. किसन नानकु शुक्लवारे ३. हेमंत नानकु शुक्लवारे ४. भारती नानकु शुक्लवारे अर्जदार क्र. १ ते ४ रा. बाप्पु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. राजेश्वरी परसराम लुढेरे रा. पिंपळानी हुजुर, भोपाल, एम. पी.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नानकु मुन्नीलाल शुक्लवारे
**पत्ता :-** रा. व्दारा किसन नानकु शुक्लवारे रा. बाप्पु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नानकु मुन्नीलाल शुक्लवारे यांचे दि. १७/०६/२०२६ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सूचना**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे उज्वला अनिल राठोड यांच्या वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाने, मिळकतीचे वर्णन: मौजे - सराव, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. २५९ याचे एकूण क्षेत्रफळ ७८४ चौ. फुट., ता. बार्शिटाकळी आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे उज्वला अनिल राठोड यांच्या मालकीची आहे. तसेच वरील नमूद मालमत्ता हि वारसाने- वडिलोपार्जित मिळालेली आहे. तसेच वरील नमूद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण - बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता ईर्सेस्ट इर्ग्हेहम टू. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण- तालुका बार्शिटाकळी आणि जिल्हा अमरावती.
दि. ०४/०८/२०२६

आपला
**ॲडव्होकेट रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# २०२४ नंतरची जमीन मोजणीच अंतिम ठरणार

## फेरमोजणीची सक्ती थांबणार; स्थानिक स्वराज्य संस्थांना भूमी अभिलेख विभागाचे स्पष्ट निर्देश

**वर्धा/ जनमाध्यम**

राज्यात २०२४ नंतर भूमी अभिलेख विभागामार्फत करण्यात आलेली जमीन अथवा मालमत्तेची मोजणी यापुढे अंतिम मानली जाणार आहे. त्यामुळे महापालिका, नगर परिषद, नगर पंचायत आणि ग्रामपंचायतींसह स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्याच मालमत्तेची पुन्हा मोजणी करण्याचा आग्रह धरण्यात येणार नाही. यासंदर्भातील स्पष्ट निर्देश येत्या दोन ते तीन दिवसांत जारी करण्यात येणार असल्याची माहिती जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी दिली आहे.

या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यासह राज्यभरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. बांधकाम परवानगी, मालमत्ता हस्तांतरण तसेच इतर प्रशासकीय कामांसाठी वारंवार जमीन मोजणी करण्याची सक्ती होत असल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होत होता. आता २०२४ नंतर झालेल्या मोजणीच्या 'क' प्रतीवर संबंधित जमिनीचे अक्षांश आणि रेखांश नमूद असल्याने त्याच मोजणीला अंतिम मान्यता दिली जाणार आहे.



यापूर्वी देण्यात येणाऱ्या 'क' प्रतीमध्ये अक्षांश आणि रेखांशाची माहिती नसल्यामुळे जमिनीचे अचूक स्थान निश्चित करण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे अनेक स्थानिक स्वराज्य संस्था नव्याने मोजणी करून आणण्याचा आग्रह धरत होत्या. आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या मोजणी नोंदींमुळे ही अडचण दूर झाली आहे. या निर्णयामुळे भूमी अभिलेख विभागावरील अनावश्यक कामा चा ताण कमी होण्या बरोबरच नागरिकांचीही वारंवार मोजणी च्या प्रक्रियेतून सुटका होणार आहे. बांधकाम परवानग्या आणि मालमत्तेशी संबंधित प्रकरणांचा निपटारा अधिक वेगाने होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अपयशाला घाबरू नका; जिद्द, चिकाटी आणि सातत्यच यशाची गुरुकिल्ली

## 'रफी सुरसंगम'च्या व्यासपीठावर खा. अमर काळे यांचे तरुणांना आवाहन

**वर्धा/ जनमाध्यम**

स्पर्धा हरलात म्हणून आयुष्य हरत नाही. अपयश हीच यशाची पहिली पायरी आहे. निराश न होता नव्या जोमाने उभे राहा. असा भावनिक संदेश खा.अमर काळे यांनी तरुणांना दिला. साहित्य कला शोधक मंचच्या वतीने आयोजित स्वर्गीय मोहम्मद रफी स्मृतीप्रित्यर्थ ४० व्या विदर्भस्तरीय रफी सुरसंगम स्मार्ट सिंगर २०२६ स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते.



दादाजी धनिवाले सभागृहात झालेल्या कार्यक्रमात खा.काळे यांनी चार दशकांपासून सुरू असलेल्या या सांस्कृतिक परंपरेचे कौतुक करत, ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांच्या सातत्यपूर्ण सहकार्याचा गौरव करत त्यांनी अशा दानशूर व्यक्तींमुळेच सांस्कृतिक चळवळी जिवंत राहतात, असे नमूद केले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या अंध दिव्यांग बालगायिका पल्लवी भोला वानखेडे हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या जिद्दीला सलाम करत खा.काळे यांनी स्वतःच्या वतीने विशेष पारितोषिक देऊन गौरव केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहनबाबू अग्रवाल होते. सुधीर पांगुळ, अभय पुनेवार, कमलेश ठोंबरे, संदीप पजई, देवेंद्र ठाकूर, रूपेश खैरी, सतीश इखार, प्रवीण धोपटे, इकराम हुसेन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रमुख संयोजक सुनील बुरांडे व साहित्य कला शोधक मंचाच्या कार्यकर्त्यांनी चार दशकांपासून जपलेल्या सांस्कृतिक वारशाचे खा.अमर काळे यांनी विशेष कौतुक करत, रफी सुरसंगम ही केवळ स्पर्धा नसून नव्या पिढीला आत्मविश्वास आणि संस्कार देणारे सांस्कृतिक विद्यापीठ आहे.असे गौरवोद्गार काढले.

# अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

**वर्धा/ जनमाध्यम**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा जिल्हा व शहर शाखेच्या पुढाकारातून आंतर जातीय-आंतरधर्मीय विवाह, विवाहपूर्व समुपदेशन तसेच करणी-जादूटोणा संबंधी कौटुंबिक वादांचे समुपदेशन करण्यासाठी नव्या केंद्राचे उद्घाटन मंगळवारी वर्धा वर्धन हाट झुणका-भाकर केंद्राच्या सभागृहात करण्यात आले.



या केंद्राचे उद्घाटन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्राचे व्यवस्थापक मोहन खैरकार आणि सभागृह उपलब्ध करून देणारे गुड्डू देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

समिती गेली ३८ वर्षे अंधश्रद्धा निर्मूलनाबरोबरच समाजपरिवर्तनासाठी विधायक उपक्रम राबवत आहे. सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांवर आधारित सत्यशोधकी पद्धतीने विधवा, परित्यक्ता, प्रौढ कुमारिका, विधुर तसेच आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह इच्छुकांचे साध्या व निःशुल्क पद्धतीने विवाह लावून देण्याचे कार्य समिती राज्यभर करत आहे. वर्धा शाखेनेही विविध सभागृहांत अनेक सत्यशोधकी विवाह केले असून, आता या नव्या केंद्रामुळे विवाह इच्छुक व त्यांच्या कुटुंबीयांना संपर्कासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.याच केंद्रात करणी, जादूटोणा किंवा बाह्यबाधा या कारणांवरून उद्भवणाऱ्या कौटुंबिक वादांचे समुपदेशनही केले जाणार आहे. अशा अंधश्रद्धेमुळे अनेक कुटुंबांमध्ये वाद, मारहाण, बहिष्कार व गंभीर गुन्ह्यांच्या घटना घडत असल्याने प्रबोधनासोबत समुपदेशनाची गरज ओळखून हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे समितीने सांगितले.

या सेवेसाठी ९८२२२१९१०० या क्रमांकावर सकाळी १० ते रात्री १२ वाजेपर्यंत संपर्क साधता येणार असून, मिस्ड कॉल दिल्यानंतर समितीचे कार्यकर्ते स्वतः संपर्क साधतील. आवश्यकतेनुसार पोलिसांचीही मदत घेतली जाणार आहे. १८ वर्षांवरील मुली आणि २१ वर्षांवरील मुलांचे विवाह तसेच संबंधित समुपदेशनासाठी इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन समितीच्या वर्धा जिल्हा व शहर शाखेने केले आहे.

# ९२ लाखांच्या नव्या शाळा इमारतीचे लोकार्पण

## रसुलाबादच्या विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधांची भेट; आ. सुमित वानखेडे यांच्या हस्ते उद्घाटन



**आर्वी/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत जिल्हा परिषद, वर्धा यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, रसुलाबाद (ता. आर्वी) येथील नव्या शाळा इमारतीचे लोकार्पण आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

सुमारे ९२ लाख रुपयांचा निधी खर्चून उभारण्यात आलेली ही सुसज्ज शाळा इमारत ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची नवी संधी ठरणार आहे. प्रशस्त वर्गखोल्या, सुरक्षित परिसर आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण वातावरणात शिक्षण घेता येणार असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार सुमित वानखेडे यांनी शिक्षण हा समाज परिवर्तनाचा प्रभावी पाया असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरांप्रमाणे दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी शासन विविध योजनांद्वारे पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देत असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा विकासकामांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या लोकार्पण सोहळ्याला स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या शाळा इमारतीमुळे रसुलाबाद परिसरातील विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**मुंबई/ जनमाध्यम**

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झालेल्या अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे नवजीवन मिळाले. मुंबईतील नानावटी रुग्णालयात त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी यकृताचा काही भाग दान केल्यानंतर २५ जून रोजी यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९.६० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली. त्यामुळे एकूण २१.६० लाख रुपयांचा निधी उपलब्ध होऊन खर्चिक शस्त्रक्रिया शक्य झाली.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांना यकृताचा गंभीर आजार असल्याचे निदान झाले होते. लाखो रुपयांचा उपचार खर्च परवडत नसल्याने त्यांच्या पत्नीने लोकप्रतिनिधींकडे मदत मागितली. त्यानंतर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आर्थिक मदत मंजूर करण्यात आली.

शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने १३ जुलै रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू बरे होत आहेत. वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे आभार मानले. यावेळी रामेश्वर नाईक यांनी आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी सातत्याने कार्यरत असल्याचे सांगत अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# यशवंत महाविद्यालयाला नागपूर विद्यापीठाचा प्रथम पुरस्कार

**वर्धा/ जनमाध्यम**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाची २०२५ साली विद्यापीठगीताच्या सामूहिक गायनासाठी गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डसाठी नोंद झाली. यासाठी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या सर्व जिल्हयातील महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये वर्धा जिल्हयातून सर्वात जास्त सहभाग नोंदविल्याबद्दल विद्यापीठाद्वारे स्थानिक यशवंत महाविद्यालयाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. ४ ऑगस्ट रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या १०३ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरूनानक भवन, विद्यापीठ परिसर, नागपूर येथे समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



### विद्यापीठगीताच्या गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डसाठी महाविद्यालयाचा सक्रीय सहभाग

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे, संगीत विभागप्रमुख प्रा.अरुणा हरले, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र बेले, भूगोल विभागप्रमुख डॉ. बुद्धघोष लोहकरे, मराठी विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद नारायणे, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. राहुल भालेकर, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप रायबोले, डॉ. प्रफुल्ल काळे, डॉ.अर्चना दुपारे यांनी १५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र या स्वरूपात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर होत्या. तसेच आ.आशीष देशमुख, विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष रौलिंगसिंग खुराना, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व सर्व शाखांचे अधिष्ठाता यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने ११ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' या प्रसिद्ध विद्यापीठ गीताच्या सामूहिक गायनातून गिनिज बुक वर्ल्ड रेकॉर्ड्स सह एकूण चार जागतिक विक्रम प्रस्थापित केले. या उपक्रमात ५२ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. १५ हजारांपेक्षा जास्त जण प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित होते. व १५ हजारांहून अधिक विद्यार्थी ऑनलाइन माध्यमातून जोडले गेले होते. या गीताच्या सामूहिक गायनाला गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्डशिवाय एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्येही स्थान मिळाले आहे. हा ऐतिहासिक कार्यक्रम नागपूरमधील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळ असलेल्या मैदानावर पार पडला होता. या विक्रमासाठी यशवंत महाविद्याल याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले असून वर्धा जिल्हयातील सर्व महाविद्याल यामधून उत्कृष्ट प्रतिसाद नोंदवि ल्याबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे यशवंत महाविद्याल याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले होते. या विश्वविक्रमाच्या सक्रिय सहभागासाठी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. सुरेश देशमुख व विद्यमान अध्यक्ष समीर देशमुख यांचे मार्गदर्शन, तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळाचे सहकार्य मोलाचे ठरले होते.



# गुन्हे वृत्त

## कौटुंबिक वादातून काकावर रॉडने हल्ला

**हिंगणघाट** - तालुक्यातील वाघोली येथे कौटुंबिक वादातून पुतण्याने काकावर रॉडने हल्ला केल्याची घटना घडली. दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने शुभम उर्फ भिमसेन प्रेमदास गोटे हा आपल्या आई-वडिलांशी वाद घालत शिवीगाळ व मारहाण करत होता. त्यावेळी मधुकर गोटे यांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र याचाच राग मनात धरून शुभमने मधुकर गोटे यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. या मारहाणीत ते जखमी झाले. घटनेनंतर हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून शुभम उर्फ भिमसेन प्रेमदास गोटे याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## विनाकारण शिवीगाळ करत तिघांकडून मारहाण

**पुलगाव** - सोनोरा (ढोक) येथे शिवीगाळ करण्यास विरोध केल्याच्या कारणावरून एका व्यक्तीला तिघांनी मारहाण केल्याची घटना घडली. नारायण मांढरे यांनी पुलगाव पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, प्रफुल्ल भानारकर हा दारूच्या नशेत विनाकारण शिवीगाळ करत होता. त्याला जाब विचारताच मंगेश भानारकर, प्रफुल्ल भानारकर आणि ओम भानारकर यांनी एकत्र येऊन त्यांना मारहाण केली. या घटनेत तक्रारदारास दुखापत झाली. प्रकरणाची गंभीर दखल घेत पुलगाव पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**वर्धा** - धोत्रा शिवारात अवैध वाळू वाहतुकीविरोधात अल्लीपूर पोलिसांनी मोठी कारवाई करत वाळूसाठ्यासह ट्रक-ट्रेलर असा सुमारे २५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. नाकाबंदी दरम्यान एमएच-४० सीवाय-९५३३ क्रमांकाच्या ट्रक-ट्रेलरची तपासणी केली असता त्यात विनापरवाना वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी वाहन आणि वाळूसाठा जप्त करत अंबुज श्रीरामसुमीरण पटेल (रा. डिहुली, ह.मु. उमरेड) व जावेद जबार शेख (रा. उमरेड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास अल्लीपूर पोलिस करीत आहेत.

## तक्रार केल्याचा राग; तिघांकडून मारहाण

**आर्वी** - तालुक्यातील कवाडी (तांडा) येथे पोलिसांत तक्रार दिल्याच्या रागातून तिघांनी एका व्यक्तीला मारहाण केल्याची घटना घडली. प्रकाश दामू पवार यांनी दिनेश पवार याच्या शिवीगाळ व धमकीप्रकरणी तक्रार केली होती. त्याचा राग मनात धरून सतीश पवार, प्रमोद पवार आणि दिनेश पवार यांनी प्रकाश पवार यांना मारहाण केली. त्यात ते जखमी झाले. भांडण सोडविण्यास आलेल्या आणखी दोन जणांनाही मारहाण करण्यात आली. आर्वी पोलिसांनी तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## एटीएम कार्ड बदलून ४८ हजारांची फसवणूक

**वर्धा** - रेल्वे स्थानकाजवळील एचडीएफसी बँकेच्या एटीएममध्ये हातचलाखी करून महिला कर्मचाऱ्याचे एटीएम कार्ड बदलत ४८ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. समाजकल्याण विभागातील महिला अधिकारी एटीएममधून पैसे काढत असताना दोन अनोळखी व्यक्तींनी ट्रान्सेक्शन पूर्ण झाले नसल्याची बतावणी केली. त्यानंतर त्यांनी पुन्हा कार्ड वापरण्यास सांगत दिशाभूल केली आणि हातचलाखीने कार्डाची अदलाबदल केली. काही वेळातच त्यांच्या खात्यातून ४८ हजार रुपये काढण्यात आले. तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पुलगाव** - पुलगाव-वर्धा मार्गावर झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. गुंजखेडा येथील अनेशकांत पाटील (३०) हे दुचाकीने घरी परतत असताना एमएच-३२ एएस-३८९० क्रमांकाच्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात अनेशकांत पाटील जखमी झाले असून दुचाकीचेही मोठे नुकसान झाले. जखमीवर उपचार करण्यात आले. तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

## संशयास्पद इसम पोलिसांच्या ताब्यात

**हिंगणघाट** - येथील नांदगाव चौक परिसरात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांना एक व्यक्ती संशयास्पद अवस्थेत फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच तो पळण्याचा प्रयत्न करू लागला. पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले असता त्याने आपले नाव सैय्यद मोमीन सैय्यद कादर (३५, रा. शांतीनगर, उमरी-मेघे) असे सांगितले. चौकशीदरम्यान समाधानकारक माहिती न दिल्याने हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २५०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपाची जुनी जाहिरात रद्द

## इच्छुकांनी नव्याने अर्ज करणे बंधनकारक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासन निर्णयातील निवड निकषांमध्ये बदल झाल्यामुळे 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपासाठी जून २०२५ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात तसेच त्या अनुषंगाने सुरू असलेली संपूर्ण निवड प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे, अशी सूचना जिल्हा सेतू समितीचे सचिव यांनी पत्राद्वारे दिली आहे.

शासन निर्णय दि. २ जून २०२५ नुसार जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीमार्फत 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्ज स्वीकारणे, अर्जांची छाननी करणे तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, मुलाखतीची अंतिम प्रक्रिया प्रलंबित असतानाच निवडीच्या निकषांमध्ये बदल करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या दि. ९ जुलै २०२६ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकानुसार नवीन निकष लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे पूर्वीची जाहिरात आणि त्याअंतर्गत सुरू असलेली संपूर्ण निवड प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

नवीन निकषांनुसार 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपासाठी लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळ amravati.nic.in वर नवीन जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नवीन जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर इच्छुक सर्व उमेदवारांनी नव्याने अर्ज करणे बंधनकारक राहील.

पूर्वीच्या (रद्द करण्यात आलेल्या) जाहिरातीनुसार प्राप्त झालेले अर्ज, कागदपत्रे किंवा अर्जातील माहिती नवीन निवड प्रक्रियेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही. त्यामुळे सर्व इच्छुक उमेदवारांनी नवीन जाहिरातीनुसार विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह नव्याने अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सेतू समिती, अमरावती यांनी केले आहे. यासंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# धारणीत भव्य विशेष सखोल पुनरिक्षण जनजागृती रॅली



**धारणी/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम ३० जून २०२६ पासून ते ८ ऑगष्ट २०२६ कार्यक्रमानुसार ४१- मेळघाट विधानसभा अंतर्गत धारणी तालुका व धारणी शहर सर्व मतदारांमध्ये जनजागृती करणे व कार्यक्रमाला राहीलेला अत्यंत अल्प काळ पाहता व कोणताही मतदार या अभियातून वंचीत राहू नये या दृष्टीने आज दिनांक ०५ ऑगस्ट २०२६ रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी सिद्धार्थ शुक्ला ( भा. प्र. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व तहसिलदार प्रदीप शेवाळे यांच्या नियोजनातून धारणी शहरात पंचायत समिती कार्यालयापासून ते धारणी शहराचे दुसरे टोक समजल्या जाणाऱ्या मधवा नाला पुलापर्यंत भव्य विशेष सखोल पुनरिक्षण जनजागृती रॅलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर जनजागृती रॅलीमध्ये तहसीलदार प्रदीप शेवाळे, पोलिस निरीक्षक अवतारसिंह चव्हाण, निवडणूक नायब तहसीलदार राजेश माळी, महसूल नायब तहसीलदार आकाश चव्हाण, तसेच पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी सिडाम, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे सहाय्यक अभियंता सौरभ ठाकूर, तसेच धारणी येथील नगरसेवक यांचे सोबत तहसिल कार्यालय धारणी, पंचायत समिती धारणी यांचे सोबतच तालुका मुख्यालयातील बहुतेक कार्यालयातील कर्मचारी, पर्यवेक्षक, मतदान केंन्द्रस्तरीय अधिकारी यांनी सहभाग घेतला शिवाय धारणी येथील ज्ञानमंदिर कन्या विद्यालयातील वर्ग ८ ते १० चे विद्यार्थी यांचे सह विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी जनजागृती रॅली मध्ये आपला सहभाग नोंदवीला.

आयोजकातर्फे रॅलीमध्ये ध्वणीक्षेपाव्दारे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम ( S. I. R. ) कार्यक्रमाची माहिती, महत्व व सर्व नागरिकांना स्वत: या अभियानामध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यात आले. शिवाय जनजागृती करीता विविध घोषणा सुध्दा या जनजागृती रॅली मध्ये देण्यात आल्या. प्रशासनाव्दारे करण्यात आलेल्या या आयोजनाचे नागरिकाकडून स्वागत करण्यात आलेले असून या व्दारे निश्चितच नागरिकांचा सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. या जनजागृती अभियानाव्दारे तहसिलदार प्रदीप शेवाळे यांनी धारणी तालुक्यातील व शहरातील सर्व नागरिकांना B.L.O. ( मतदान केंन्द्रस्तरीय अधिकारी ) यांचेशी संपर्क साधून आपला फार्म भरुन घ्यावे असे आवाहन केले आहे.

# 'ब्राऊन ब्रेड'च्या नावाखाली ९०% मैदा!

## ब्लिंकिट आणि अजित बेकरीवर गुन्हा दाखल-एफडीएची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑनलाइन ग्रोसरी प्लॅटफॉर्म वर ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या 'ब्राऊन ब्रेड'मध्ये ९० टक्के मैदा असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. भारतीय अन्न सुरक्षा मानके आणि मानके प्राधिकरणच्या नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने शहरातील ब्लिंकिट आणि अजित बेकरी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. खाद्य सुरक्षा विभागाला मिळालेल्या माहिती नुसार, ब्लिंकिटच्या माध्यमातून ग्राहकांना विकला जाणारा ब्राऊन ब्रेड हा निकृष्ट दर्जाचा होता. नियमांनुसार ब्राऊन ब्रेड मध्ये गव्हाच्या पिठाचे प्रमाण निश्चित असणे आवश्यक आहे. परंतु अजित ब्रँडच्या ब्राऊन ब्रेडमध्ये ९० टक्के मैदा आढळून आला.

खाद्य विश्लेषण अहवालातून ग्राहकांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. 'ब्राऊन ब्रेड' या नावाने विक्री करून ग्राहकांची दिशाभूल केली जात होती. प्रत्यक्षात त्यात गव्हाच्या पिठाचे प्रमाण अत्यंत कमी होते. या प्रकरणी अन्न सुरक्षा विभागाने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातील शंकर नगर येथील ब्लिंकिट केंद्र आणि राठी नगर येथील ब्लिंकिट केंद्रावर धाड मारली.

तपासणी दरम्यान अजित ब्रँडच्या ब्राऊन ब्रेडचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. सुमारे ७५० रुपये किमतीचा स्टॉक जप्त करण्यात आला. जून २०२६ मध्ये आलेल्या खाद्य विश्लेषण अहवालात याची पुष्टी झाली. त्यानंतर खाद्य सुरक्षा कायदा २००६ च्या कलम ५२ आणि ५६ अंतर्गत न्यायनिर्णयासाठी प्रकरण दाखल करण्यात आले आहे. यामध्ये प्रत्येक आरोपीला १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

खाद्य सुरक्षा विभागाने नागपूर येथील विभागीय कार्यालयाला देखील याबाबत कळवले असून नागपूर मधील ४ वेगवेगळ्या ठिकाणांवरून ही नमुने घेऊन तपास सुरू केला आहे.तज्ञांच्या मते, 'ब्राऊन ब्रेड' म्हणून विकला जाणारा ब्रेड आरोग्यासाठी फायदेशीर असतो असे मानून ग्राहक तो खरेदी करतात. मात्र यात मैद्याचे प्रमाण जास्त असल्याने ग्राहकांची फसवणूक होत आहे.

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्या आणि योजनेच्या पोर्टलवरील रकमेत असलेल्या फरकाबाबत संभ्रम निर्माण करू नये व कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नये सर्व पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होणार आहे. तसेच, शेतकऱ्यांना पोर्टलवरील माहिती तपासून आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन, उपविभागीय अधिकारी अनिलकुमार भटकर, तहसीलदार विजय लोखंडे व सहकारी संस्था उपनिबंधक सुधीर खंबायत यांनी केले आहे.

गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या यादीतील शेतकऱ्यांच्या थकबाकी रकमेतील फरक आणि योजनेच्या पोर्टलवरील थकबाकी रकमेतील भिन्नता असल्यास पोर्टलवरील रक्कमच निर्णायक मानली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पोर्टलवर दर्शवलेली कर्जाची थकबाकी रक्कम ३१ मार्च २०२६ ची आहे. शासनाने १ जुलै २०२६ च्या पत्राद्वारे सर्व बँकांना १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज वसूल न करण्याचे निर्देश दिले आहेत आणि सर्व बँकांनी हे मान्य केले आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी पोर्टलवर आपली नोंदणी व थकबाकी रक्कम तपासून आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण केल्यानंतर यशस्वी झाल्याची पावती मिळेल ज्यात कर्जमुक्त होणारी रक्कम प्रदर्शित असेल. आधार प्रमाणीकरणानंतर ३१ मार्च २०२६ वरील कर्जबाकीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात डिबिटीद्वारे जमा केली जाईल आणि त्यानंतर कर्ज बेबाकी प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना संबंधित बँकेच्या शाखेत व कार्यकारी सेवा संस्थांमध्ये याद्या लावण्यात येतील. कर्जमाफी मिळाल्यानंतर खरीप पीक कर्ज उपलब्ध होणार आहे. पोर्टलवरील रक्कम किंवा इतर कोणताही तपशील शेतकऱ्यांसाठी अमान्य वाटल्यास त्यांनी पोर्टलवर तक्रार नोंदविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. तक्रारींचे निराकरण जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात येणार आहे. सेतू संचालक व सीएससी केंद्रांच्या प्रमुखाने संबंधीत शेतकऱ्यांना संपर्क करून आधार प्रमाणीकरण करण्यात मदत करावी असे सांगण्यात आले आहे. आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी शिवाय कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही ,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अमरावती तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांची यादी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये,सेवा सहकारी संस्था, सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र आणि sdo.amravati.nic. संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे अमरावती उपविभागीय कार्यालयाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४९२/२०२६
**श्री.भगवान अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Bhagwan Shivramji Patekar, Age 80 Yrs. Occu.: Retired
Presently R/o at 19, Vijsechi Colony, Kathora Road, Amravati-444604
Aadhar No.349308201569
2. Atish Bhagwanrao Patekar, Age 50 Yrs. Occu.: Teaching
Presently R/o at 19, Vijsechi Colony, Kathora Road, Amravati-444604
Aadhar No.435748098723
3. Parag Bhagwantrao Patekar, Age 48 Yrs. Occu.: Pvt. Job
Presently R/o at 19, Vijsechi Colony, Kathora Road, Amravati-444604
Aadhar No.739665350084
4. Pritee Bhagwantrao Patekar, Age 46 Yrs. Occu.: Advocate
Presently R/o at 19, Vijsechi Colony, Kathora Road, Amravati-444604
Aadhar No.264612873444

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कोकीळा भगवानराव पाटेकर** हे दिनांक 09.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **भगवान** + 3 **विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भगवान** + 3 **विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४९१/२०२६
**रमेश अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ramesh S/o Manikrao Deshmukh, Age 70 Yrs. Occu.: Farmer
R/o Vill, Asara, Tq.Bhatkuli, Dist.Amravati.
Present reside at Aashiyad Colony, Amravati.
2. Chanda W/o Rameshrao Deshmukh, Age 70 Yrs. Occu.: Housewife
Presently reside at near Vastu Apartment, Aashiyad Colony, Shahu Nagar Shegaon Road, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sushmita Rameshrao Deshmukh हे दिनांक **१४.०५.२०२६** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Ramesh Manikrao Deshmukh+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Ramesh Manikrao Deshmukh+1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४८५/२०२६ ने.ता.२७.०८.२०२६

**अर्जदार -** १. **अध्वीक अतुल इंगोले,** वय ०६ वर्षे
अ.पा.क. आई रोशनी मनोज टिंगणे, वय ३४ वर्षे,
रा.बारीपुरा, काजळी देउरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**
**निरंक**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार अध्वीक अतुल इंगोले हा मयत अतुल मधुकरराव इंगोले यांचा मुलगा आहे. मयत **अतुल मधुकरराव इंगोले यांचे निधन दिनांक १४/०६/२०२६** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे झाले. मयत **अतुल मधुकरराव इंगोले** यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २९.०७.२०२६**

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय , मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१३९५/२०२६
**श्री.सुरेश -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Suresh Shrawan Wadurkar, Age 63 Yrs. Occu.: Labour
R/o Shivaji Chouk, Telipura, Mahuli Jahagir, Tq.Dist.Amt.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्रावण राजाराम वडुरकर** यांचे दिनांक **०८.०९.२०२४** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. व मयत **शांताबाई श्रावण वडुरकर ही** १९९१ साली माहुली जहांगीर येथे मरण पावली. **अर्जदार सुरेश विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुरेश विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

प्रो.क्र.६८६/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २५२/२०२६ ने.ता.०३.०९.२०२६

**अर्जदार :**
१. शांता नारायण मकेसर, वय ८५ वर्षे, धंदा - निरंक
२. रतन नारायण मकेसर, वय ३८ वर्षे, धंदा - मजुरी
३. भूषण नारायण मकेसर, वय ३५ वर्षे, धंदा - मजुरी
४. रोशन नारायण मकेसर, वय ३३ वर्षे, धंदा - मजुरी
अर्जदार नं.१ ते ४ रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती
५. अरुणा मुकेश सिरसाट, वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. वंदना आकाश शेजव, वय २९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.द्वारा नारायणराव मकेसर, जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **नारायण बकाराम मकेसर** हे दि.**०९.१०.२०२०** रोजी मयत झाले. अर्जदार **शांता नारायण मकेसर**, वय ८५ वर्षे, धंदा - निरंक, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२१.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **नारायण बकाराम मकेसर** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **नारायण बकाराम मकेसर** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भातकुली

## जाहीरनामा

**अर्जदार :- प्रल्हाद मारोती डकरे**
**रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

**---- विरुध्द ---**

**गैरअर्जदार :- निबंधक, नगरपंचायत नांदगाव खंडेश्वर**
**ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील रहिवासी असून हल्ली मु.नांदगाव खंडेश्वर येथे वास्तव्यास असतात. अर्जदार यांचा जन्म दि.१०/०८/१९६७ रोजी त्यांच्या राहत्या घरी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथे झाला. निबंधक जन्म-मृत्यू ग्रामपंचायत, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथे जन्माची नोंद घेतली गेली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) अन्वये जन्माच्या नोंदीचा आदेश होणेबाबत मा.न्यायालयात प्रस्ताव/ प्रकरण दाखल झाले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार नांदगाव खंडेश्वर येथील दाखल प्रस्तावातील/प्रकरणातील अर्जदार - प्रल्हाद मारोती डकरे, रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, ह.मु.नांदगाव खंडेश्वर यांच्या जन्माच्या दिनांकास व ठिकाणास आक्षेप किंवा हरकत असल्यास दिनांक २०.०८.२०२६ पर्यत स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत येवुन आक्षेप किंवा हरकत, न घेतल्यास सदर्हू अर्जदार यांची साक्ष घेवुन जन्म नोंद घेण्याचा आदेश सदर निबंधकाला देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार नांदगाव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२२९/२०२६
**संगीता व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**अर्जदार :**
1. **Sangita W/o. Ravindra Tayade,** Age 53 Yrs. Occu.: Household
R/o. Jadu, Badnera, Tq. & Dist. Amravati
2. **Savita W/o Rajesh Bagade,** Age 48 Yrs. Occu.: Household
R/o. Mu. Supalwada Po. Tiwara
Sub Dist- Chandur Rly, Dist. Amravati
3. **Sunita W/o. Raju Kamble,** Age 44 Yrs. Occu.: Household
R/o. C/o. Moreshwar Shyamrao Somkumar Galli No. 9
L Chandramani Nagar, Parvati Nagar, S.O. Sub Dist. Nagpur
4. **Charushila W/o. Prashant Metange,**
Age 40 Yrs. Occu.: Labour
R/o. Jalu Dhabha,Amravati

**-- विरुध्द --**

**Ranjeet S/o. Uttamrao Kulkarni**
Age 46 Yrs. Occu.: Labour
R/o. Mu. Jahu, Po. Dabha, Sub Dist. Nandgaon Khand.
Dist. Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **उत्तमराव चंपतराव कुळकर्णी आणि देवकर्णा उत्तमराव कुलकर्णी** हे अनुक्रमे दिनांक **२०.०६.२०१८** आणि **२९.०९.२००९** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संगीता व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**TENDER NOTICE**
**Fully Automatic Collar type pneumatic forming filling sealing machine with four head single stage weigh metric filling (500-1000 gm)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank - funded Hon.Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Belora Farmer Producer Company Ltd., GP Belora, Taluka Chandur Bazar, Dist. Amravati is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart.mh.org** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **14.08.2026 upto 6.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Belora Farmer Producer Company Ltd., GP Belora, Taluka Chandur Bazar, Dist.Amravati.**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१४३९/२०२६**
**श्री राजेंद्र विरुध्द निरंक**
**पुढील ता.२८.०८.२०२६**

**अर्जदार :-** १. **राजेंद्र मदनलाल मेहरे**
वय ६७ वर्षे, व्यवसाय-सेवानिवृत्त
रा.एमआयडीसी रोड, दस्तुर नगर, वैभव कॉलनी, रुख्मीणी नगर,
अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मदनलाल गणपतलाल मेहरे** हे दिनांक **१६.०९.२०२१** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे व **शारदा मदनलाल मेहरे** हया **२४.०४.२०१०** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार राजेंद्र विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री राजेंद्र विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२४.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर सुचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार **माऊली असोसिएटस तर्फे भागीदार श्री प्रविण साहेबराव महल्ले व राजेंद्र महादेवराव देशमुख, रा.अमरावती** हे मौजे-रेवसा येथील शेत सर्वे क्र.३०९, गट क्र.९९/४/१ भोगवटदार वर्ग-१, याचे क्षेत्रफळ १ हे. ४१ आर (३एकर २० गुंठे) या शेताचे मालक आहेत. सदर शेत त्यांनी विकण्याचा सौदा आफताब मोहम्मद हारुन, रा.नवी वस्ती, बडनेरा यांचे सोबत दि.०५/०९/२०२५ रोजीच्या इसारचिठ्ठी नुसार केला आहे. या इसारचिठ्ठीच्या अटी नुसार या शेताची खरेदी त्यांनी दिनांक ३०/०४/२०२६ पर्यत किंवा त्याचे आत, भरण्याची उर्वरित रक्कम देऊन, करण्याचे ठरले होते. त्यांनतर आमच्या पक्षकाराने त्यांना वेळोवेळी सदर शेताची खरेदी करुन घेण्यासाठी इसारचिठ्ठीची मुदत संपल्यानंतर सुध्दा त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वेळ वाढवून दिला. त्याचप्रमाणे आमच्या पक्षकाराने त्यांना या शेताची खरेदी वेळेवर घेण्यासाठी, आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता खरेदीपूर्वी म्हणजे दिनांक ३०/०४/२०२६ चे आत करुन दिली. इतकेच नव्हेतर, आमच्या पक्षकाराने शेवटची संधी म्हणून दिनांक ११/०७/२०२६ रोजी त्यांना पाठविलेल्या नोटिस प्रमाणे,या शेताची खरेदी त्यांनी करुन देण्यासाठी दिनांक ३०/०७/२०२६ पर्यत मुदत वाढवून दिली. ही नोटीस त्यांना दिनांक १३/०७/२०२६ रोजी मिळुन सुध्दा, सदर शेताची खरेदी करुन देण्यासाठी आमचे पक्षकार तयार असतांना , त्यांनी करुन घेतली नाही. म्हणून आमच्या पक्षकारास नुकसान सहन करावे लागले. अशा परिस्थितीत आमच्या पक्षकाराने आफताब मोहम्मद हारुन यांचे सोबत दिनांक ०५/०९/२०२५ रोजी केलेल्या ईसारचिठ्ठी मधील अटींचा भंग त्यांनी केल्यामुळे, हा सौदा रदद केला आणि इसाराची रक्कम जप्त केली आहे म्हणून आमचे पक्षकार सदर शेत दुसऱ्या व्यक्तीला विकण्यासाठी पूर्णपणे मोकळे झाले आहेत. करिता सदरची जाहीर सूचना आम जनतेच्या माहितीस्तव प्रकाशित केली आहे.

**(ॲड.पी.यु. देशमुख )**
**अधिवक्ता**
**खापर्डे बगीचा, डॉ.बेलसरे यांच्या दवाखान्याजवळ, इर्विन चौक, अमरावती**
**मो.८४५९०५२४९०**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५७८/२०२६
**भास्कर अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shri Bhaskar Pundalik Misal, Age 60 Yrs. Occu.: Labour
2. Satyam Bhaskarrao Misal, Age 30 Yrs. Occu.: Labour
3. Shubham Bhaskarrao Misal (Died)
3.a) Pranita Shubham Misal, Aged 32 Yrs. Occu.: Household
3.b) Manasi Shubham Misal, Aged 04 Yrs. Occu.: NIl
All R/o Devinagar, Wadali Bus Stop, Amravati. Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **माया भास्कर मिसाळ** हे दिनांक **२०.०७.२०२१** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **भास्कर अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भास्कर अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

**टाकरखेडा संभू**-साऊर येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी राष्ट्रीय विकास मातंग समाज संघर्ष समिती, अमरावती जिल्ह्याचे अध्यक्ष दीपक शंकर साबळे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला अनिल साबळे, मनोर साबळे, सुधीर साबळे, आदित्य साबळे,जीवन साबळे, गोपाल साबळे, अमर साबळे, नवल अडाळके, गौरव साबळे, निलेश साबळे, विशाल साबळे, प्रणित साबळे, जीतेन साबळे, ऋषी साबळे, विनोद साबळे, अक्षय साबळे, ज्ञानेश्वर अडाळके, भीमराव अडाळके, अविनाश साबळे, सुनील साबळे, अंकुश साबळे, राज आमटे, दिनेश साबळे, दिनेश अडाळके, अशोक साबळे, आचल साबळे, नयना साबळे, राधा साबळे, सोनू साबळे, संध्या साबळे, सविता साबळे, ज्योती साबळे, मीरा साबळे,पद्ममा साबळे, चंदा साबळे, बेबी साबळे, प्रेमिला आमटे, मनकरना अडाळके, रोशनी साबळे, ईमला वानखडे, दुर्गा साबळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार गणेश साबळे यांनी केले.



### श्री गुरूदेव सेवा मंडळ येथे गुरुपौर्णिमा

**शिराळा**-श्री गुरुदेव सेवा मंडळ शिराळा येथे गुरु पौर्णिमा कार्यक्रम आयोजित करण्यात आला कार्यक्रमाला प्रामुख्याने मंडळाचे अध्यक्ष रामनिवास देशमुख उपाध्यक्ष हभप मदनकर महाराज हभप राम चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते. आयोजित गुरु पौर्णिमा उत्सवात प्रारंभी ध्यान नंतर ध्वजारोहण अभिषेक पादुका पूजन तुकडोजी महाराज पुतळा पुजन हारार्पण करण्यात आला. सेवा मंडळाचे अध्यक्ष रामनिवास देशमुख यांनी हा विधी पूर्ण केला वरिल कार्यक्रमा करीता बबनराव वडुरकर नरेश भस्मे दीनेश पाटील विजय भिले दिवाकर दादा खाडे महिला सभासद मंदा वानखडे,शिला खाडे,शोभा गंधे,सुनिता तळखंडकर यांचे सहकार्य लाभले सांय. सात वाजता सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.प्राथनेला गुरुदेव सेवा मंडळाच्या महिला सभासद सरला उमके,लता कडु,रेखा खाडे, आशा भागवत, छबु भागवत,रेखा वडुरकर, कळसकर,देशमुख, विमल ढेवले तसेच पुरुष मंडळी उपस्थित होती.

### युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**शिराळा**-शिराळा येथील संतोष सुरेशराव भिवगडे (वय ३०) या युवा शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना घडली. या



घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.संतोष भिवगडे यांच्याकडे सुमारे अडीच एकर शेती असल्याची माहिती आहे. गेल्या काही काळात नैसर्गिक संकटांचा शेतीला वारंवार फटका बसल्याने अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते.विविध व्यक्तींकडून घेतलेली उसनवारी परत करणे कठीण झाल्याने,या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर संतोष भिवगडे यांनी टोकाचे पाऊल उचलले घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. युवा शेतकऱ्याच्या मृत्यूमुळे भिवगडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील, भाऊ असा परिवार आहे.प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन शासनाच्या नियमानुसार भिवगडे कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### प्रभाकर लाळे यांचे निधन



**टाकरखेडा संभू**-येथील रहिवासी असलेले प्रभाकर आनंदराव लाळे वय ५५ यांचे अल्पशा आजाराने ४ ऑगस्ट रोज मंगळवार ला पहाटे ५.०० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी ,मुलगा अविवाहित,एक मुलगी विवाहित असा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर टाकरखेडा संभू येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# भटके मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ सुरूच

## पकड मोहीम मात्र नेहरू मैदानात विसावली

**अमरावती/का.प्र.**

आधी रुक्मिणी नगर नंतर आता रहेमत नगरमध्ये शाळकरी बालिकेवर कुत्र्याने हल्ला केल्यानंतर महापालिकेने युद्धपातळीवर मोकाट कुत्रे पकडण्याची युद्धपातळीवर सुरू केली. मात्र १५ दिवसात ही मोहीम थंडावल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे सोमवारी सुद्धा भटक्या कुत्र्याने पश्चिम भागातील परिसरात हल्ला करून चावा घेतल्याची घटना घडली. तरीसुद्धा भटके कुत्रे पकडणारे वाहन नेहरू मैदान येथे विश्रांती घेत असल्याचे दिसून आले. महापालिकेची कुत्रे पकडण्याची मोहीम थंडावल्याचे त्यातून दिसून येत आहे.

रुक्मिणीनगर परिसरात १६ जुलैला दहा वर्षीय शाळकरी मुलीवर भटक्या कुत्र्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली होती. त्यावेळी या घटनेने



समाजमन संतप्त झाले होते व महापालिकेच्या विरोधात रोष उफाळला होता. महापालिकेने तातडीने ॲक्शन मोडवर येत युद्धपातळीवर भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी त्यांना पकडण्याची मोहीम हाती घेतली.प्रारंभी या कारवाईने समाजमन शांत झाले. त्यानंतर मात्र यंत्रणा सुस्तावली. भटके कुत्रे पकडण्यासाठी पाच वाहने व कर्मचारी, असा ताफा उपलब्ध करण्यात आला आहे. हल्ली ही पथके नेहरू मैदानात दिवसभर विश्रांती घेत असल्याचे चित्र आहे.

१७ जुलै ते ४ ऑगस्ट, या कालावधीत या पांचही पथकांनी ४१३ मोकाट कुत्रे पकडल्याची माहिती पशुवैद्यक विभागाने विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांना दिली. या कुत्र्यांना सुकळी कंपोस्ट डेपो, भानखेडा या भागात सोडून देण्यात असल्याचेही सांगण्यात आले. शेल्टर हाउसमध्ये काही कुत्र्यांना ठेवण्यात आले, त्यावर प्राणी मित्रांकडून आक्षेप घेण्यात येत असल्याचे सांगण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, मंगळवारी (ता. ४) भटक्या कुत्र्याने एकास चावा घेतल्याची घटना अंबागेट परिसरात घडल्याने पशुवैद्यक विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे.यंत्रणा सुस्तावल्यावर त्यातून शिक्कामोर्तब झाले आहे.

### पशुवैद्यकीय अधिकारीच नाही

महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागास पूर्णवेळ कायमस्वरूपी पशुवैद्यक अधिकाऱ्याची गरज आहे. मध्यंतरी या पदावरील अधिकारी फौजदारी प्रकरणात अडकल्याने रिक्त जागेवर मनपा प्रशासनाने बीएएमएस अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. या पदावर सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असतानाही प्रशासनाने मात्र त्यादृष्टीने कोणतेही पाऊल उचलले नाही.

**कुत्र्यांसह पशूची नोंद करा, अन्यथा तिप्पट दंड**

अमरावती महानगरपलिका क्षेत्रातील पशुपालक तसेच श्वान पालकांकडे असलेल्या पशू परवान्याची मुदत ३१ मार्च पर्यंत होती. ती मुदत संपुष्टात आलेली आहे. पशू पालकांनी परवान्याचे नुतनीकरण करावे तसेच नवीन पशु परवाने प्राप्त करण्याकरीता अमरावती महनगरपालिकेच्या



अमरावतीकॉर्पोरेशन डॉट इन वेबसाईटववरून फॉर्म डाऊनलोड करून पशु वैद्यकीय विभाग येथे जमा करावा, आपल्या पशुची नोंदणी करावी तसेच आपल्या मालकीच्या असलेल्या सर्व पशुंना टॅगिंग करुन घ्यावे.

मोकाट आणि टॅगिंग नसलेल्या पशूना पकडल्यानंतर तिप्पट दंड वसूल करण्यात येईल, असे महापालिकेतर्फे कळविण्यात आलेले आहे.

# फेरीवाल्यांची माहिती आता एका क्लिकवर

**अमरावती/का.प्र.**

शहरात वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले जात आहे. मनपा क्षेत्रातील फेरीवाले, हॉकर्स आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना आता 'वन क्लिक इन्फॉर्मेशन सिस्टिम बारकोड' लागू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आ.प्रवीण पोटे पाटील यांनी अमरावती महापालिका आयुक्तांना यासंदर्भात तातडीने धोरण निश्चित करण्याचे लेखी निर्देश दिले आहेत. अमरावतीत हजारो फेरीवाले रस्त्यांच्या कडेला व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. मात्र, यामुळे अनेकदा वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो, नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आणि अपघातांचे प्रमाणही वाढते. या समस्येवर तोडगा काढताना हॉकर्सचा रोजगारही बुडू नये आणि शहरवासीयांना सुरक्षित व सुरळीत वाहतूक व्यवस्था मिळावी, यासाठी मनपाने पुढाकार घेऊन 'सुवर्णमध्य' साधावा, असे आ.पोटे पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे. जेणेकरून शहरवासी मोकळा श्वास घेऊ शकतील.

### घुसखोरीला बसणार जरब

फेरीवाल्यांसाठी 'वन क्लिक बारकोड' प्रणाली बंधनकारक होणार असल्याने आता शहरातील अधिकृत हॉकर्सची अचूक संख्या आणि त्यांचा संपूर्ण डेटा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांच्या घुसखोरीला कायमची जरब बसेल.

अशी असेल बारकोड प्रणाली डिजिटल ओळख : प्रत्येक फेरीवाला, ठेलाचालक आणि फिरत्या विक्रेत्याची संपूर्ण माहिती संगणकीय प्रणालीवर नोंदवली जाईल. माहितीचा एक विशिष्ट 'बारकोड' तयार करून त्याचे स्टिकर हातगाडी, ठेला किंवा वाहनाच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक असेल.

नागरिकांनी मोबाइलद्वारे हा बारकोड स्कॅन करताच संबंधित विक्रेत्याचे नाव, आधार कार्ड, पत्ता, मोबाइल नंबर आणि परवाना क्रमांक समोर येईल.

खाद्यान्नाची गुणवत्ता : खाद्यपदार्थ विक्रेते कोणता कच्चा माल वापरतात, याचीही माहिती या बारकोडद्वारे ग्राहकांना पाहता येईल.

**७ ऑगस्टला बैठक**

याबाबत महापालिकेत शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी बैठक घेतली जाणार आहे. खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रवीण पोटे पाटील, महापौर श्रीचंद तेजवाणी, आयुक्त मंगेश गोंदावले, मनपा पदाधिकारी, नगरसेवक, तसेच नगरसेवक, अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# मारडा-जहागीरपूर परिसरात तुफान वादळ; लाखोंचे नुकसान

## संत्रा झाडे उन्मळून कोसळली; शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**कुऱ्हा/वार्ताहर**

तालुक्यातील मारडा ते जहागीरपूर परिसरात अचानक आलेल्या वादळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. भरघोस उत्पादनाच्या आशेने जोपासलेल्या संत्रा बागांतील अनेक झाडे मुळासकट उन्मळून पडली,तर आंबिया बहरातील मोठ्या प्रमाणावर फळे गळून पडल्याने शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा -आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

यावर्षी हवामान अनुकूल राहिल्याने संत्रा बागांना चांगला बहर आला होता. त्यामुळे यंदा उत्पादन वाढून आर्थिक दिलासा मिळेल,अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र,अवघ्या काही मिनिटांच्या वादळी पावसाने ही आशा मावळली. अनेक बागांमध्ये झाडांच्या फांद्या तुटल्या असून काही ठिकाणी संपूर्ण झाडेच कोसळल्याने पुढील हंगामावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मारडा येथील नीलेश आसोले, अंकुश चौकोडे, शादिक शहा यांच्यासह जहागीरपूर येथील सक्षम गजानन साठवणे यांच्या



शेतातील सुमारे २० ते २५ संत्रा झाडे पूर्णपणे उन्मळून पडली आहेत. याशिवाय परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या बागांमध्ये फळगळ, फांद्या तुटणे आणि झाडांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संत्रा उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी विभाग व महसूल विभागाने संयुक्तपणे तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून शासनाच्या निकषांनुसार आर्थिक मदत तत्काळ मंजूर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

> वादळी वाऱ्यासह पावसाने शेतातील २५ संत्राझाडे उन्मळून कोसळली. मात्र पाच दिवस लोटूनही संबंधित विभागाने अद्याप दखल घेतली नाही.
>
> **सक्षम साठवणे,** शेतकरी

### अहवाल मात्र निरंक

तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागात चौकशी केली असता, तालुक्यातील नुकसान निरंक असल्याचे सांगण्यात आले. मंडळ अधिकारी व तलाठी यांचेकडून निरंक अहवाल प्राप्त झाल्याचे नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर यांनी सांगितले.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतची, तालुक्याची कार्यकारिणी गठीत

## सचिन खुळे अध्यक्ष, तर विनोद कोरडे उपाध्यक्ष

**चांदूरबाजार/वार्ताहर**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्यावतीने चांदूर बाजार तालुक्याची, नवीन कार्यकारिणी नुकतीच गठीत करण्यात आली. जिल्हाध्यक्ष अशोकजी हांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, अ.भा.ग्रा.पंचायत चांदूर बाजार तालुकाध्यक्ष पदी, सचिन खुळे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. ग्राहक हिताचे संरक्षण व जनजागृती.तसेच संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी, नव्या कार्यकारणी मार्फत विशेष प्रयत्न



केले जाणार आहे.

या बैठकीत नव्याने गठीत करण्यात आलेल्या तालुका कार्यकारणी मध्ये, विनोद कोरडे (उपाध्यक्ष),राजेंद्र जाधव (सचिव),ॲड.आशिष काळे (सहसचिव), अविनाश चिखले (कोष्याध्यक्ष), जीवन सीरस्कार (प्रसिद्धी प्रमुख),ॲड. अतुल कडु (विधी आयम प्रमुख),मुरली माकोडे (रोजगार सृजन प्रमुख),गोपाल किटुकले (आय टी सेल प्रमुख) तसेच कार्यकारी सदस्य पदी गिरीश मानकर, रविंद्र काटोलकर, दत्तात्रय किटूकले, संतोष पोहकार, किशोर अर्डक, उदय देशमुख, सतीश गुजरकर, निलेश देशमुख, दिपक राऊत, रोहित मेंढे, विजय कुऱ्हेकर इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच बैठकीत नंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे, उपस्थितांव्दारे अभिनंदन करण्यात आले . संघटनेचे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याचे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा पदाधिकारी अशोक हांडे,जिजाऊ बँक चे अध्यक्ष बबनराव आवारे, संतोष सरदार, डॉ. मेघा ठाकरे डॉ. रवींद्र मराठे यांनी आपल्या मार्गदर्शनातून केलें.यावेळी अ.भा.ग्रा.पंचायतचे सर्व माजी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# प्रतिष्ठीत दक्षिण आशिया क्यु.एस. वर्ल्ड युनिर्व्हसिटी रँकिंगमध्ये स्थान

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक यश संपादन केले आहे. अत्यंत प्रतिष्ठित मानल्या जाणा-या 'क्यूएस' वर्ल्ड युनिर्व्हसिटी रँकिंग (आशिया) मध्ये ३३० वे स्थान मिळवून आपल्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे कुशल नेतृत्व आणि प्रशासन,शिक्षक,विद्यार्थ्यांच्या कष्टाचे फलित विद्यापीठाच्या या दैदिप्यमान यशामागे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कष्ट याचे हे फलित आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, उत्तम सुविधा आणि पारदर्शक प्रशासन या सर्वच आघाडयांवर सातत्य राखल्यामुळेच हे जागतिक पातळीवरील यश शक्य झाले आहे. या मानांकनामुळे अमरावती विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा आणि आंतरराष्ट्रीय ख्याती अधिक उंचावली आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यापीठाशी संबंधित सर्व विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, सर्व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच ज्यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या प्रवासात मोठे योगदान दिले आहे,

# माळी समाजातील १७५ गुणवंतांचा गौरव

**अमरावती/का.प्र.**

प्रा.वा.सी.काळे स्मृती प्रतिष्ठान तसेच सकल माळी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४१ वा माळी समाजातील १७५ गुणवंतांचा गौरव सोहळा संत ज्ञानेश्वर सभागृह, अमरावती येथे उत्साहात झाला. या सोहळ्यात शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांसह विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व परितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी राष्ट्रसंत शिक्षक कॉलनी, रहाटगाव (अमरावती) येथील सेवानिवृत्त शिक्षक सुनिल दिगंबरराव आमले व बबिता आमले यांचे सुपुत्र कन्हैय्या सुनिल आमले याचा विशेष सत्कार करण्यात आला. कन्हैय्याने बारावी (HSC) परीक्षेत ८७.८३ टक्के गुण मिळवून गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये तृतीय क्रमांक, MHT-CET (PCM) परीक्षेत ९९.८६ पर्सेंटाईल मिळवून प्रथम क्रमांक, तसेच JEE परीक्षेत ९७.५९



पर्सेंटाईल प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला स्व. भानुदासजी खारकर स्मृती पुरस्काराने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल टेंभे,प्रमुख पाहुणे म्हणून कर्नल विश्वासराव बापुरावजी काळे,अभिनेत्री अपूर्वा सोनार,प्रा.डॉ.गिरीश देशमुख,प्राचार्य डॉ. आशिष चांदुरकर, महात्मा फुले बँकेचे अध्यक्ष प्रकाश लोखंडे, प्रतिष्ठानचे प्रा. निशिकांत काळे,शाम काळे यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, अमरावती महानगरपालिकेचे नवनियुक्त नगरसेवक, गुणवंत विद्यार्थी, पालक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनता विद्यालयात नाना पाटील जयंती

**अंजनगाव बारी** - जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सोमेश्वरराव इंगोले तसेच पर्यवेक्षिका मनिषा चिंचोळकर उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याचा व राष्ट्रसेवेतील योगदानाचा आढावा घेतला.या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# टीईटी सक्तीबाबत राज्यभर एकसमान निर्णय लागू करा

## शिक्षक समितीची शासनाकडे मागणी

**अमरावती/प्रतिनिधी**

सप्टेंबर २००१ पूर्वी नियुक्त झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी अनिवार्य नसल्याचा मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाची राज्यभर एकसमान अंमलबजावणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्य शासनाकडे केली आहे. सातारा जिल्ह्यातील १६ शिक्षकांनी पदोन्नतीसाठी टीईटी सक्तीविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय देत सप्टेंबर २००१ पूर्वी नियुक्त शिक्षकांसाठी पदोन्नतीसाठी टीईटी आवश्यक नसल्याचे स्पष्ट केले तसेच संबंधित शिक्षकांचा पदोन्नती यादीत समावेश करण्याचे आदेश दिले आहेत. समितीच्या मते, न्यायालयाच्या आदेशानंतर शासनाने काढलेला पदोन्नती संदर्भातील शासन निर्णय न्यायालयीन निर्णयाशी विसंगत असल्याने त्याला तात्काळ स्थगिती द्यावी. अन्यथा अनेक शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.याशिवाय, शिक्षक हिताचे निर्णय वारंवार उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याऐवजी न्यायालयाच्या आदेशांची त्वरित अंमलबजावणी करून शिक्षकांना न्याय द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, राज्य आयुक्त (शिक्षण) सचिंद्र प्रताप सिंह, उपसचिव आबासाहेब कवळे तसेच प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांना सादर करण्यात आले असून, राज्य शासनाने या प्रकरणी संवेदनशील भूमिका घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने व्यक्त केली आहे.

# 'ं४८ कोटींच्या दंडावर एसडीओंची अंतिम मोहोर; आता महसूल विभागाची अग्निपरीक्षा?'

## दंडग्रस्तांची अपील फेटाळली; तहसीलदारांचा आदेश कायम

**-४७.६३ कोटींची वसुली तात्काळ करण्याचे निर्देश**

**-उच्च न्यायालयाच्या कालमर्यादेपासून वसुलीच्या दिरंगाईपर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित; अकोटातील बहुचर्चित गौणखनिज प्रकरण पुन्हा ऐरणीवर**

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर-रुधाडी येथील कथित अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणात महसूल विभागाने दिलेल्या ताज्या आदेशाने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष पुन्हा या बहुचर्चित प्रकरणाकडे वेधले आहे. तब्बल ४७,६३,३०,५६० दंड व रॉयल्टीच्या प्रकरणात दंडग्रस्तांनी दाखल केलेली अपील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांनी फेटाळून लावत तहसीलदार अकोट यांचा ३० जानेवारी २०२४ चा आदेश कायम ठेवला आहे. एवढेच नव्हे, तर संबंधित रकमेची त्वरित वसुली करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.




या निर्णयामुळे दंड निश्चितीची प्रक्रिया पुन्हा एकदा वैध ठरली असली, तरी आता महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच सर्वात मोठी अग्निपरीक्षा उभी राहिली आहे. कारण 'आदेश झाला... पण वसुली कधी?' असा एकच प्रश्न जिल्हाभरात चर्चिला जात आहे.

### 'जनमाध्यम'चा सातत्यपूर्ण पाठपुरावा; पन्नासहून अधिक वृत्तांतांनी हलवले महसूल प्रशासन

गाजीपूर-रुधाडी येथील कथित अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणात दैनिक 'जनमाध्यम'ने सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण पाठपुरावा केला आहे. केवळ दंडाचा आदेश प्रसिद्ध करण्यापुरते मर्यादित न राहता, ४७.६३ कोटींच्या दंडाच्या वसुलीत होत असलेली दिरंगाई, नागपूर खंडपीठाने निश्चित केलेली कालमर्यादा (टाईमलाईन), महसूल विभागाची कार्यपद्धती, अपील प्रक्रियेतील विलंब, आदिवासी जमिनींचा वापर, तसेच शासनाच्या महसुलाच्या संरक्षणाशी संबंधित विविध मुद्द्यांवर दैनिकाने वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले.

या प्रकरणावर आतापर्यंत पन्नासहून अधिक सखोल वृत्त, अन्वेषणात्मक लेख आणि पाठपुराव्याच्या बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. प्रत्येक वृत्तातून अधिकृत कागदपत्रे, न्यायालयीन आदेश, महसूल अभिलेख आणि कायदेशीर तरतुदींचा आधार घेत संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

एसडीओंनी आता तहसीलदारांचा दंडाचा आदेश कायम ठेवत तातडीने वसुलीचे निर्देश दिल्याने, 'जनमाध्यम'ने सातत्याने उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नांना या निर्णयामुळे नव्याने बळ मिळाले आहे. मात्र, दैनिकाची भूमिका केवळ आदेशापर्यंत मर्यादित नसून, प्रत्यक्ष वसुली पूर्ण होईपर्यंत आणि शासनाचा महसूल तिजोरीत जमा होईपर्यंत या प्रकरणावरील पाठपुरावा कायम राहणार, अशी भूमिका 'जनमाध्यम'ने स्पष्ट केली आहे.

### साडेतीन महिन्यांची सुनावणी... अखेर तहसीलदारांच्या निर्णयालाच दुजोरा-

दंडग्रस्तांनी तहसीलदारांच्या आदेशाला आव्हान देत विलंब माफीच्या अर्जासह दोन वेगवेगळ्या अपील याचिका एसडीओंकडे दाखल केल्या होत्या. जवळपास साडेतीन महिन्यांच्या सुनावणीदरम्यान महसूल अभिलेख, पंचनामे, कागदपत्रे, दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांची तपासणी करण्यात आली. या सर्व बाबींचा विचार करून एसडीओंनी तहसीलदारांचा आदेश कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचे नमूद करत अपील नामंजूर केली. परिणामी, दंड निश्चित करण्याची संपूर्ण प्रक्रिया वैध असल्याचे महसूल विभागाने पुन्हा अधोरेखित केले आहे.

### 'उद्योगांवरील कारवाईचा प्रश्न अजूनही अनुत्तरित'

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आणखी एक मुद्दा चर्चेत आला आहे. संबंधित दंडग्रस्तांशी संबंधित असल्याचा आरोप करण्यात येणारे काही स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट आदिवासी जमिनीवर असल्याबाबत यापूर्वी विविध तक्रारी करण्यात आल्या आहेत. तसेच या संदर्भातील काही बाबींचा उल्लेख पूर्वीच्या अधिकृत पत्रव्यवहार व विधिमंडळातील उत्तरांमध्ये झाल्याचा दावा करण्यात येतो.

या उद्योगांबाबत आवश्यक परवानग्या, जमीन वापराची वैधता आणि संबंधित कारवाई याविषयी प्रशासनाने अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी स्थानिक स्तरावर होत आहे. दरम्यान, या उद्योगांना कथित संरक्षण मिळत असल्याच्या तसेच महसूल अधिकाऱ्यांबाबत विविध प्रकारच्या चर्चा स्थानिक पातळीवर सुरू असल्याचे बोलले जात असले, तरी या आरोपांना अधिकृत पुष्टी नाही. त्यामुळे या सर्व बाबींची सत्यता सक्षम चौकशी अथवा संबंधित अधिकाऱ्यांच्या अधिकृत स्पष्टीकरणानंतरच स्पष्ट होऊ शकते.

### महसूल विभागासमोर आता एकच प्रश्न - 'वसुली कधी?'

या प्रकरणात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे प्रत्यक्ष वसुली. आजपर्यंत संबंधितांकडून दंडाची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा झाल्याचे चित्र दिसत नाही. त्यामुळे महसूल विभाग महसूल वसुलीच्या कायदेशीर तरतुदींनुसार कोणती पावले उचलतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर आदेश असूनही कारवाईला विलंब झाला, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

### उच्च न्यायालयाच्या आदेशातील कालमर्यादा पाळली गेली का?

या प्रकरणात नागपूर खंडपीठाच्या ऑक्टोबर २०२५ मधील आदेशानंतर पुढील प्रक्रिया कितपत वेळेत पूर्ण झाली, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. अपील दाखल होण्यास झालेला विलंब, विलंब माफी अर्ज मंजूर करण्याचे निकष, सुनावणीस लागलेला कालावधी आणि अंतिम निर्णयापर्यंतचा प्रवास याविषयी महसूल विभागाने अधिकृत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी व्यक्त होत आहे. याबाबत एसडीओंनी निर्णयात आवश्यक आदेश दिले असले, तरी विलंब माफीचा अर्ज कोणत्या कायदेशीर निकषांवर स्वीकारण्यात आला किंवा सुनावणीची प्रक्रिया नेमक्या कोणत्या आधारावर पार पडली, याबाबत स्वतंत्र भाष्य केलेले दिसून येत नाही. त्यामुळे या प्रक्रियेबाबतही विविध प्रश्न उपस्थित होत आहेत

# घरात काडतुसे टाकून खोट्या गुन्ह्याचा डाव

**-मुख्य सूत्रधारासह तिघांना अटक**

**अमरावती/प्रतिनिधीः-** आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर थेट गुन्हेगारी कटात झाल्याची धक्कादायक घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. एका कुटुंबाला खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या उद्देशाने त्यांच्या घरात जिवंत बंदुकीची काडतुसे फेकल्याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी तातडीने तपास करून मुख्य सूत्रधारासह तिघांना अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना ७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, या कटामागील संपूर्ण साखळीचा तपास सुरू आहे.

फिर्यादी उज्ज्वला विनोदराव मेटे (वय ५६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा रोहित मेटे पुण्यात जॉब प्लेसमेंटचा व्यवसाय करतो. त्याचे आरोपी विवेक धनराज गायकवाड याच्याशी आर्थिक व्यवहारावरून मतभेद झाले होते. त्यानंतर विवेक गायकवाड सातत्याने पैशांसाठी तगादा लावत होता. पैसे न दिल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवून बदनामी करण्याची धमकीही त्याने दिली होती. यापूर्वीही घरात घुसून टीव्ही नेल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल झाली होती. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास विवेक गायकवाड हा घराच्या मागील बाजूने कंपाऊंडवर चढून वरच्या मजल्यावर पोहोचला. त्याने उघड्या खिडकीतून चार जिवंत बंदुकीची काडतुसे घरात फेकली आणि तेथून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. घरातील सोफ्याजवळ चार जिवंत काडतुसे आढळून आली. या प्रकरणी फ्रेजरपुरा ☞(पान २ वर)

# राजस्थानातून एमडी ड्रग्ज पुरवठा करणारा मुख्य सूत्रधार ताब्यात

**आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात मोठ्या प्रमाणावर मेफेड्रॉन (एमडी) अंमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्या आंतरराज्य टोळीच्या मुख्य सूत्रधाराला राजापेठ पोलिसांनी राजस्थानमधून ताब्यात घेत मोठे यश मिळविले आहे. यापूर्वी या प्रकरणात ५३.२९ लाख रुपयांचा एमडी, वाहन आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले होते. या कारवाईमुळे शहरातील अंमली पदार्थांच्या रॅकेटला मोठा धक्का बसला आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरात अंमली पदार्थांविरोधात 'झिरो टॉलरन्स पॉलिसी' प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश ☞(पान २ वर)

# राजापेठमधील मोठी व्यावसायिक मालमत्ता बँकेच्या ताब्यात

**२८.६४ कोटींच्या कर्ज थकबाकीमुळे कारवाई**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मोठ्या कर्ज थकबाकीदारांविरुद्ध बँकांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या स्ट्रेस्ड असेट्स मॅनेजमेंट शाखा, मुंबई यांनी राजापेठ भागातील सुमारे २८.६४ कोटी रुपयांच्या कर्ज थकबाकी प्रकरणी एक मोठी व्यावसायिक मालमत्ता ताब्यात घेतली आहे. माहिती नुसार, शहरातील एका कर्जदाराने बँकेचे २८ कोटी ६४ लाख ३९ हजार ४८९ रुपये कर्ज घेतले होते. या कर्जाची परतफेड न केल्यामुळे ते थकबाकीत गेले. त्यानंतर बँकेने सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत कायदेशीर प्रक्रिया सुरू केली.

१३ फेब्रुवारी २०२५ रोजी बँकेने कर्जदाराला ६० दिवसांच्या आत थकबाकी भरण्याची नोटीस बजावली होती. मात्र ठराविक मुदतीत कोणतीही रक्कम न भरल्याने बँकेने ऑगस्ट २०२६ रोजी सरफेसी ॲक्टच्या कलम १३(४) आणि ☞(पान २ वर)

# बेलोरा विमानतळावर आढळला १० फुटांचा अजगर

**तीन तासांच्या सतर्कतेनंतर यशस्वी रेस्क्यू**



**अमरावती/प्रतिनिधीः-** बेलोरा विमानतळ परिसरात मंगळवारी मध्यरात्री सुमारे १० फूट लांबीचा अजगर आढळल्याने काही काळ खळबळ उडाली. विमानतळावरील सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास हा अजगर आल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती तातडीने ☞(पान २ वर)

# हिंगणे मसाला कंपनीतील ५९ हजारांच्या चोरीचा उलगडा

**दोन सुरक्षा रक्षकांसह भंगार व्यावसायिक जेरबंद**



**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील हिंगणे मसाला कंपनीतून चोरीस गेलेल्या चार इलेक्ट्रिक मोटारींच्या प्रकरणाचा नांदगाव पेठ पोलिसांनी यशस्वी उलगडा केला आहे. या प्रकरणी दोन सुरक्षा रक्षक आणि एका भंगार व्यावसायिकाला अटक करून चोरीस गेलेला ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रजत अरुणपंत हिंगणे यांच्या मालकीच्या हिंगणे मसाला कंपनीमधून २३ ते ३० जुलैदरम्यान अज्ञात चोरट्यांनी चार इलेक्ट्रिक मोटारी चोरी केल्या होत्या. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान कोणताही तांत्रिक पुरावा ☞(पान २ वर)

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळांच्या वक्तव्याचा राष्ट्रवादीकडून तीव्र निषेध



**-जिल्हाधिकारी कार्यालयावर राष्ट्रवादीचे जोडे मारो आंदोलन**

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले, त्यांचे हे विधान अशोभनीय असून निंदनीय व सामाजिक सलोखा ☞(पान २ वर)

# मुथूट फिनकॉर्प प्रकरणात गूढ वाढले

**कोट्यवधींच्या सोन्याच्या दागिन्याचा घोळ करणारा पसार**

**-गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बस डेपो रोडवरील विमाको टॉवर्समध्ये असलेल्या मुथूट फिनकॉर्प शाखेतील कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरण अधिकच गडद होत असून, शाखेच्या लेखापरीक्षण (ऑडिट) अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ग्राहकांनी गहाण ठेवलेले सोने परत मिळत नसल्याच्या आणि भरलेली रक्कम कंपनीच्या प्रणालीत दिसत नसल्याच्या तक्रारींनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात आतापर्यंत १३ ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्राथमिक पाहणीत कोट्यवधी रुपयांच्या फसवणुकीची शक्यता दिसून येत आहे. कंपनीकडून अद्याप अधिकृत तक्रार आलेली नसली तरी ग्राहकांच्या तक्रारींच्या आधारे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.'

दरम्यान, ☞(पान २ वर)

# तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** गोपाल नगर परिसरातील अंकुर नगर येथे राहणाऱ्या ३४ वर्षीय शुभम रामनारायण पांण्डेय यांनी आज सकाळी घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती नुसार, शुभम नेहमी प्रमाणे आज सकाळी ६.३० च्या सुमारास मुलांना शाळेत सोडण्याा जाण्याच्या तयारीत होते. त्यानंतर ते खोलीत गेले. बराच वेळ बाहेर न आल्याने कुटुंबीयांनी पाहिले असता ते ☞(पान २ वर)

# IMA चा आज भव्य मोर्चा व बेमुदत कामबंद आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** BHMS डॉक्टरांसाठी CCMP प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल MMC मध्ये नोंदणी देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन IMA अमरावतीच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन पुकारण्यात आले असून आज भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

हा मोर्चा सकाळी ११ वाजता इर्वीन चौक येथून सुरू होईल आणि जिल्हाधिकारी कार्यालय येथे धडकणार आहे. तेथे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे.

IMA ने म्हटले आहे की CCMP हा अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून त्याला MCI किंवा नॅशनल मेडिकल कमिशन ची मान्यता नाही. अपुरे शिक्षण आणि प्रशिक्षण असलेल्या लोकांना आधुनिक वैद्यक शास्त्राची प्रॅक्टिस करण्याची परवानगी मिळाल्यास त्यामुळे रुग्णांच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल.

'हा संप रुग्णांविरोधात नाही; हा संप तुमच्या सुरक्षिततेसाठी आहे' असे सांगत IMA ने नागरिकांना ☞(पान २ वर)